
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २०१३ । किंमत १५ रुपये







## चिरतरुण विनोदवीरास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



डॉ. संजय ढोले यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयीन निर्मितीचा संत तुकडोजी महाराज ललित विज्ञान साहित्य पुरस्कर रविंद्र नाट्य मंदिर, मुंबई येथे २७ फेब्रुवारी २०१३ ला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या अश्मजीव या विज्ञानकथा संग्रहास देण्यात आला आहे. विज्ञानकथा संग्रह 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित करण्यात आला आहे.




श्रीमती मीनल मोहाडीकर यांच्या मुंबईतील ''आम्ही अद्योगिनी'' या संस्थेत लेखिका 'मीरा सिरसमकर' यांनी लेखिका तुमच्या भेटिला या उपक्रमांतर्गत महिलांना मार्गदर्शन केले. मीरा सिरसमकर यांनी नोबेल ललना हे लिहिण्यामागची उदिष्टे, त्यासाठी घेतलेले परिश्रम, त्याला मिळालेला प्रतिसाद याबाबत प्रेक्षकांशी संवाद साधला. या पुस्तकाच्या चवथ्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम झाला. नोबेल ललना हे पुस्तक आता भाग १ व २ अशा नव्या स्वरुपात उपलब्ध आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०१३ ◆ वर्ष तेरावे ◆ अंक चौथा


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १२ |
| स्मृतींची चाळता पाने | ५७ |
| पुरस्कार | ६० |
| पुस्तक परिचय | ७२ |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ९३ |
| दखल | १०० |
| अभिप्राय | १०५ |
| श्रद्धांजली | १०६ |
| बालनगरी | १०९ |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पल्लवी धामणे-रेखी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस


**₹ ५००/- किंवा अधिकच्या नेट खरेदीवर पोस्टेज फ्री !**


मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# प्रकाशन विश्वापुढील आव्हाने

दि फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, नॅशनल बुक ट्रस्ट तसेच प्रकाशक संघाच्या वतीने ग्रंथव्यवहाराशी संबंधित कॉपीराईट आणि पायरसी, ई-बुक्स, अनुवाद प्रक्रिया वगैरे विषयांवर भारताच्या वेगवेगळ्या राज्यातील प्रमुख शहरात परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शने वगैरे कार्यक्रम होत असतात. पुणे येथे मार्च २०१३ मध्ये झालेल्या दीड दिवसांच्या परिषदेमध्ये सुमारे सत्तर प्रकाशक-विक्रेत्यांचा सहभाग होता. मराठी प्रकाशनक्षेत्रात गेली ६० वर्षे सातत्याने दर्जेदार पुस्तके प्रकाशित करणारे पॉप्युलर प्रकाशन, राजहंस प्रकाशन, ललितसारखे ग्रंथप्रसाराला वाहिलेले मासिक ५० वर्षे नियमितपणे चालवणारे मॅजेस्टिक प्रकाशन, पुण्यातील इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, अनुवादित पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करून त्यांना अमाप ग्राहकवर्ग मिळवण्यात यशस्वी ठरलेले मेहता पब्लिशिंग हाऊस यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. हर्ष रामदास भटकळ, उपेंद्र दीक्षित, सुनील मेहता, मिलिंद परांजपे, दत्तात्रय पाष्टे वगैरेंनी ई-बुक्स, कॉपीराईट व पायरसी, ॲकॅडमिक संदर्भग्रंथ आणि विविध प्रकारचे कोशवाङ्मय, अनुवादाचे हक्क आणि करार वगैरे विषयांवर आपले विचार मांडले. त्यासंबंधातले अनुभव सांगितले. प्रतिनिधींच्या शंकांचे निरसन केले. ई-बुक्सच्या क्षेत्राबद्दल अजून बहुसंख्य प्रकाशकांना फारशी कल्पना नाही; मुद्रित स्वरूपातील पारंपरिक पुस्तकांपलीकडे त्यांचे प्रकाशनक्षेत्र अजून विस्तारलेले नाही असेही या वेळी जाणवले. उपस्थितांपैकी फारच मोजक्या व्यक्तींना ई-बुक्स, डिजिटल पब्लिशिंग, त्याचे अर्थकारण, त्यामुळे पारंपरिक प्रकाशन व्यवसायाचे धोक्यात आलेले भवितव्य याची कल्पनाच अजून आलेली नसल्याने आपले प्रकाशक बिनधास्त आहेत. हे चांगलेच आहे. हर्ष भटकळ यांनी या संदर्भात कदाचित् येत्या काही वर्षांत हा पारंपरिक प्रकाशन व्यवसाय उरणारच नाही इतके झपाट्याने तंत्रज्ञान बदलत आहे; मोबाईल, टॅब्लेट, स्मार्टफोन, आयपॉड, किंडल वगैरेंचाच वापर वाचक-ग्राहक करू लागतील. छापील पुस्तकांना ते हातच लावणार

नाहीत. ज्ञानसंपादनाची गरज ही अर्थातच कायम राहणार आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास तयार आणि सक्षम असायला हवे, असा इशारा दिला. तो काल सुसंगतच आहे.

इ.स. २०१२ मध्ये ई-बुक्स आणि पारंपरिक मुद्रित पुस्तके यांच्यात संघर्षापेक्षा सहअस्तित्वाचेच वातावरण प्रभावी राहिले असे इंग्लंड-अमेरिकेमधील आकडेवारीवरून लक्षात येते. नील्सन बुक स्कॅनद्वारे दर आठवड्याला विविध वाङ्मयप्रकारातील पुस्तकांचा होणारा खप आणि त्यांना मिळणारे उत्पन्न यांचे आकडे प्रसिद्ध होतात. त्यावरून नेमकी वस्तुस्थिती आपल्यापुढे येते. २०१२ मध्ये छापील पुस्तकांची विक्री ४.६% घटली. त्यामुळे उत्पन्नात ७ कोटी ४० लाख पौंड घट झाली. २०११ मध्ये एकूण विक्री १.५८८ अब्ज पौंडांची झाली होती. परंतु महत्त्वाची गोष्ट अशी की ग्राहकांनी विकत घेतलेल्या पुस्तकांची संख्या मात्र कमी झाली नाही. कारण ई-बुक्सची विक्री वाढली. २०११च्या तुलनेत ती १७% वाढली. ई-बुक्सच्या किंमती कमी असल्याने संख्येच्या दृष्टीने पुस्तके जास्त विकली गेली. २०१२ मधील सर्वाधिक खप झालेल्या पुस्तकांच्या चार्टवरून हे लक्षात येईल.

## नील्सन बुक स्कॅनच्या ५० सर्वाधिक विक्री झालेल्या पुस्तकांपैकी पहिल्या १५ पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | प्रिंट प्रती | ई-बुक्स | एकूण प्रती |
|---|---|---|---|
| १. फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे | ४५ लाख | १६ लाख | ६१ लाख |
| २. फिफ्टी शेड्स डार्कर | ३२ लाख | १२ लाख | ४४ लाख |
| ३. फिफ्टी शेड्स फ्रीड | २९ लाख | ११ लाख | ४० लाख |
| ४. दि हंग्री गेम्स (सुझान कॉलिन्स) | ८ लाख | ४ लाख | १२ लाख |
| ५. जेमीज् फिफ्टीन मिनिट मील्स | ८ लाख | – | – |
| ६. कॅचिंग फायर | ७ लाख | ३ लाख | १० लाख |
| ७. बेअरड् टूथ | ६ लाख | ३ लाख | ९ लाख |
| ८. मॉकिंग जे | ६ लाख | ३ लाख | ९ लाख |
| ९. गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड्स | ५.५ लाख | ७ हजार | ५.५ लाख |
| १०. दि हेअरी डाएटर्स | ४.४ लाख | २० हजार | ४.६ हजार |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. दि हॉबिट | ४ लाख | ८० हजार | ४.८ लाख |
| १२. दि कॅझ्युअल व्हॅकन्सी | ४ लाख | ६० हजार | ४.६० लाख |
| १३. इज इट जस्ट मी | ३.८ लाख | २४ हजार | ४.१ लाख |
| १४. बीफोर आय गो टू स्लीप | ३.६ लाख | २.८ लाख | ६.४ लाख |
| १५. डायरी ऑफ विम्पी किड | ३.६ लाख | – | – |

नील्सनला ई-बुक्सचे आकडे अजून सर्व प्रकाशकांकडून मिळत नाहीत हे खरे आहे. तरीही वरील तक्त्यावरून छापील पुस्तकांच्या बरोबरीने ई-बुक्सची विक्री होत आहे हे स्पष्ट होते.

या यादीतील पहिली तीन पुस्तके ही ई.एल. जेम्स या नव्याच लेखिकेची आहेत. आधी ती ई-बुक स्वरूपातच उपलब्ध झाली. पहिल्या आठवड्यापासूनच लक्षावधी प्रती विकल्या गेल्याने कॉर्नरस्टोन संस्थेने मुद्रित प्रकाशनाचे हक्क घेतले. अवघ्या ८ महिन्यात या त्रिखंडात्मक कादंबरीने इंग्लंडमध्ये दीड कोटी प्रतींचा टप्पा गाठून १९९८ पासून सुरू झालेल्या नील्सन बुकस्कॅन सर्वेक्षणात सर्वाधिक वेगाने खपणाऱ्या पुस्तकाबाबत नवा विक्रम नोंदवला. लेखिकेला कोट्यवधी पौंडांची कमाई करून दिली. ई.एल.जेम्सच्या फिफ्टी शेड्स त्रिकूटाने नील्सन बुकस्कॅनमध्ये गेल्या पंधरा वर्षातील सर्वाधिक जलद विक्रीचा (१.४० कोटी प्रती) आणि अल्पावधीत म्हणजे फक्त आठ महिन्यात केवळ इंग्लंडमध्ये उत्पन्नाचा (४ कोटी ७३ लाख पौंड) अभूतपूर्व उच्चांक गाठला. तिच्याच पावलावर पाऊल ठेवून सुझान कॉलिन्स या लेखिकेच्या दि हंगर गेम्स, कॅचिंग फायर आणि मॉकिंग जे या जानेवारी २००९ ते ऑगस्ट २०१० दरम्यान प्रसिद्ध झालेल्या कादंबरी त्रिकूटाने २०१२ साली ३१ लाख प्रतींचा विक्रम केला. पहिल्या ८ टॉप विक्रीच्या यादीत ई. एल. जेम्स आणि सुझान कॉलिन्स या दोघींचीच ६ पुस्तके आहेत. सुझान कॉलिन्सची या वर्षातील कमाई १ कोटी २१ लाख पौंडांच्या घरात जाते.

उत्पन्नाच्या दृष्टीने विचार केला तर ई.एल.जेम्स नंतर पाककलेवरील पुस्तके लिहिणारा जेमी ऑलिव्हर (१ कोटी २२ लाख पौंड), कुमार साहित्यकार सुझान कॉलिन्स (१ कोटी २१ लाख पौंड), ज्युलिया डोनाल्डसन ( १ कोटी १७ लाख), जीफ किन्नी (९९ लाख), जेम्स पॅटरसन (८७ लाख पौंड), रिचर्ड पारसन्स (८३ लाख), जॉर्ज आर. आर. मार्टिन (८० लाख), डेव्हिड वालियम्स (७१ लाख), जे.के.रोलिंग (६९ लाख), असे पहिले दहा लेखक ठरतात. (फक्त २०१२ मधील हे उत्पन्न आहे.)

इंग्लंडमध्ये २०१२ सालात ललित पुस्तकांवर– म्हणजे कादंबऱ्यांवर– ३९

कोटी ७० लाख पौंड प्रौढ वाचकांनी खर्च केले. त्यातील २५% वाटा फक्त पहिल्या १० कादंबरीकारांनी पटकावला. जेम्स पॅटरसन या लेखकाच्या नावावरील १४७ पुस्तकांची विक्री ८७ लाख पौंडांच्या घरात जाते. त्याखालोखाल जॉर्ज आर. आर. मार्टिन (एकूण ३९ पुस्तके– आवृत्त्या– ८० लाख पौंड विक्री) हा येतो.

आपल्याला बेस्टसेलर म्हणून परिचित असलेल्या काही लेखकांचे गेल्या वर्षातील उत्पन्नाचे आकडेही बघा. ली चाइल्ड (४९ लाख पौंड), हिलरी मँटेल(मान बुकर प्राइझ– २वेळा– ४३ लाख पौड), रोआल्ड डाल (४० लाख), जे. आर. आर. टोलकिन (हॉबिट–लॉर्ड ऑफ दि रिंग्ज– ३९ लाख), जॉन ग्रिशॅम (३८ लाख), एनिड ब्लायटन (३१ लाख), डॅनिअल स्टील (२४ लाख), स्टीग लारसन (द गर्ल वुइथ ए ड्रॅगन टॅटू– २४ लाख),

`बीफोर आय गो टू स्लीप' या एकाच कादंबरीने एस.जे.वॅटसनला दहा लाख पौंड मिळवून दिले.

‘फिफ्टी शेड्स’च्या यशाने इंग्लंडमध्ये इरॉटिक, उत्तान, पोरनोग्राफिक कादंबऱ्यांचा खप खूपच वाढला आहे. तो ८ लाख पौंडांच्या जवळपास आहे असा अंदाज आहे.

ज्या कांदबऱ्यांवर चित्रपट निघतात, त्यांचा खप एकदम झपाट्याने वाढतो. या अनुभवाची २०१२ मध्ये पुन्हा प्रचीती आली. ‘फिफ्टी शेड्स’चे चित्रपटाचे हक्क घेतले गेल्याची बातमी आल्याबरोबर तिचा खप पुन्हा वाढू लागला. दीड कोटीच्या घरात ही त्रिखंडात्मक कादंबरी विकत घेतली गेल्याने ग्रंथालयात तिच्यासाठी क्लेम लावणारे वाचक फारच अल्प आहेत, असे दिसून आले.

वॉर हॉर्सेस (मोरपर्गो), दि हॉबिट (टोलकिन), दिज फुलिश थींग्ज/ द वेस्ट एक्झॉटिक मेरीगोल्ड हॉटेल (डेबोरा मोगराच) यांच्यावर चित्रपट निघाल्याने, त्यांच्या खपाचा आलेख उंचावत राहिला. जेनीफर वर्थच्या ‘कॉल दि मिडवाइफ’ वर टीव्ही मालिका सुरू झाली आणि तिला सर्वाधिक खपाच्या पहिल्या ५० पुस्तकांत स्थान मिळाले. त्याचीच उजळणी ए गेम ऑफ थ्रोन्स या आर.आर.मार्टिन लिखित कादंबरीबाबत झाली. वन शॉट (ली चाइल्ड), लाइफ ऑफ पाय (यान मार्टिन), दि पर्क्स ऑफ बीइंग ए वॉल फ्लॉवर (स्टिफन चोबस्की), द वुमन इन ब्लॅक (सुसान हिल) यांच्यावर चित्रपट निघणार असे जाहीर झाल्याबरोबर त्यांनी एक लाखावर प्रतींचा टप्पा गाठला.

एखाद्या पुस्तकाला पुरस्कार मिळाला तरी त्याची मागणी एकदम वाढते हाही अनुभव यंदा आला.

हिलरी मेंटेलच्या ‘ब्रिंग अप दि बॉडीज’ला मान-बुकर मानांकन मिळाल्यावर मागणी २०% वाढून २ लाख ३० हजार प्रतींची विक्री झाल्याने तिला जे.के.रोलिंगच्या दि कॅझ्युअल व्हॅकन्सी या हार्डकव्हर कादंबरीनंतरचे स्थान मिळाले.

नील्सन बुक स्कॅनमुळे अशी अचूक आकडेवारी नियमितपणे मिळत असल्याने ग्रंथव्यवहाराची वस्तुनिष्ठ कल्पना येऊ शकते. मराठी पुस्तकांबाबत अशी माहिती मिळू शकत नाही; त्यामुळे प्रकाशक-विक्रेते मोघमपणे बोलत राहतात. लेखकांचेही त्यामुळे नुकसान होते. भारतातील इतर भाषांमध्येही हीच अवस्था दिसते.


आपल्या ग्रंथव्यवहारात पारदर्शकता येण्याची गरज आहे.

इंग्लंडप्रमाणेच अमेरिकेतील नील्सन बुकस्कॅन यंत्रणेमुळे या व्यवसायातील वास्तव समोर येते.

इ.स. २०१२ चा विचार करता ई-बुक्सचा वाढता व्याप हा छापील पारंपरिक पुस्तकांच्या खपाला पूरक ठरत आहे– असा निष्कर्ष निघतो. नव्या तंत्रज्ञानाने एकूण ज्ञानप्रसार आणि रंजनक्षेत्र या दोहोंचीही व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे ही गोष्ट प्रकाशन क्षेत्राला नवचैतन्य देणारी आहे.



**आगामी**




# एक दिवा विझताना...


लेखक : **रत्नाकर मतकरी**

या संग्रहातल्या ‘एक दिवा विझताना’सारख्या कथा न आकळणारी गूढ रहस्ये या सूत्राभोवती फिरतात.
‘चौथी खिडकी’ ही एक अफलातून विज्ञानकथा ‘काळ’ या संकल्पनेभोवती रचली आहे, तर ‘पोरखेळ’सारख्या कथेमधून मानवाचे नियतीच्या हातातले बाहुले असणे हे सूत्र बाळाच्या कळसूत्री बाहुल्यांशी खेळण्याच्या प्रतीकातून सूचित केले आहे.

कलावंत आणि कला यांच्यातला तिढा मांडणारी ‘सुचेता चक्रपाणी आणि तिचा कोकिळकंठ’ ही एक उत्कृष्ट फँटसी; ती जादुई वास्तववादाची आठवण करून देते.

संधिप्रकाशातल्या धूसर वातावरणात एखाद्या अरण्यात शिरावे, तसे मतकरी यांच्या कथा वाचताना वाटते. वास्तव आणि कल्पना यांच्या सीमारेषेवर प्रवास सुरू होतो. वाचकांना या अरण्यातल्या कळलेल्या, न कळलेल्या वाटांकडे नेण्यासाठी मतकरी कथनाचे वेगवेगळे घाट, निवेदनशैली यांचा वापर करतात.
हा प्रवास विलक्षण आकर्षक असतोच; पण तो आत आत खोलातही नेतो.

**आगामी**




# गेटिंग थिंग्ज डन

लेखक : **डेव्हिड ॲलन**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

संपर्क आणि जबाबदाऱ्या वाढलेल्या आजच्या जगात आपल्यासमोरील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी गतकालातील जुन्या सवयींचा उपयोग होत नाही. मग अशा वेळी काय करावे, कार्यतत्परता कशी साधावी आणि उत्पादकता व सर्जनशीलता कशी वाढवावी यांसाठी या पुस्तकात विविध क्लृप्त्या दिल्या आहेत. यातली सर्वांत कळीची आणि आजच्या काळातली अत्यावश्यक गोष्ट म्हणजे तणावमुक्ती!

या पुस्तकातले गृहीतक अगदी साधे आहे – उत्पादकता आणि ताणापासून मुक्त राहण्याची क्षमता, यांच्यामध्ये थेट संबंध असतो.


आपले मन मोकळे असेल आणि विचार सुसंघटित असतील, तरच आपण तणावमुक्त उत्पादकता साध्य करू शकतो आणि आपल्या सर्जनशील क्षमतांचा मुक्तपणे अविष्कार करू देऊ शकतो.

या पुस्तकातल्या साध्यासोप्या पद्धती वापरून पाहा, आणि कार्यस्थळी; तसेच वैयक्तिक जीवनातही नीटनेटकेपणा आणा; कार्यक्षमता आणि सर्जनशीलता वाढवा!

आगामी

**'द चेकलिस्ट मॅनिफेस्टो'**

या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद




## यशप्राप्तीचा जाहीरनामा!

लेखक : **अतुल गवांदे**

अनुवाद : **सुनिती काणे**

चेकलिस्ट म्हणजे काय?

चेकलिस्ट म्हणजे कुठलेही काम नीटपणे पार पाडण्यासाठी ते सुरू करण्यापूर्वी खातरजमा करायच्या गोष्टींची तपशीलवार यादी!

कल्पना अगदी अळणी आणि सुमार वाटतेय का?

परंतु प्रत्येक व्यवसायात ती किती मोलाची ठरते,

ते पाहण्यासाठी डॉक्टरांच्या, वैमानिकांच्या, बिल्डर्सच्या,

आर्थिक गुंतवणूकदारांच्या, हॉटेल मॅनेजर्सच्या, स्टेज आर्टिस्टच्या जगात

फेरफटका मारू या आणि घेऊ या अनेक थरारक अनुभव!




## * संत साहित्य संमेलन

''समृद्धी ही संपत्तीने नाही तर ज्ञानाने येते. त्यामुळे संत साहित्य हे समाजाच्या शेवटच्या स्तरातील माणसापर्यंत पोचविण्यासाठी या संत संमेलनात प्रयत्न व्हावेत,'' असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.

वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने नवी मुंबईतील नेरुळ येथील श्रीगणेश रामलीला मैदानावर अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन शरद पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव पाचपुते, सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे, सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, विठ्ठल पाटील, अभय टिळक, सदानंद मोरे आदी उपस्थित होते. यावेळी पवार म्हणाले, ''वारकरी संप्रदाय हा सर्वांना बरोबर घेऊन जाणारा संप्रदाय आहे. आपल्या राज्यातील शेती आणि शेतकरी कसे संपन्न होतील, या दृष्टीनेही येथे प्रयत्न होणे आवश्यक आहेत. सध्या राज्यात भीषण दुष्काळ आहे. जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. संकटात सापडलेल्या या जनावरांना मदत करण्याबाबतचे प्रबोधन येथील जाणकारांनी करावे.''

## * 'इस्कॉन'च्या 'वेदिक सेंटर'चे उद्‌घाटन

''मानवतावाद, प्रेम, शांती ही भारतीय संस्कृतीची बलस्थाने असून, एका बाजूला द्वेषभावना वाढत असताना 'इस्कॉन'सारख्या संस्थांनी ही बलस्थाने टिकवून ठेवली आहेत.'' असे प्रतिपादन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी केले.

इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्शियसनेसच्या (इस्कॉन) वतीने पुण्यात कोंढवा बुद्रुक येथे बांधण्यात आलेल्या 'न्यू वेदिक कल्चरल सेंटर'चे उद्‌घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले.

राष्ट्रपती म्हणाले, ''सौहार्द, त्याग आणि पुनरुज्जीवन ही भारतीय संस्कृतीची तत्त्वे आहेत. ही सांस्कृतिक मूल्ये जपण्यासाठी 'इस्कॉन'ने जगभरात सहाशेच्यावर मंदिरांची उभारणी केली आहे. आधुनिक राष्ट्रवादाचा स्वीकार करून एकात्मता आणि शांततेची त्यांची शिकवण प्रेरणादायी अशीच आहे. सहकारमंत्री पाटील म्हणाले, ''इस्कॉनचे सांस्कृतिक केंद्र ही पुणे शहराच्या वैभवात भर घालणारी बाब आहे. या केंद्रातून दिले जाणारे शिक्षण नवी पिढी घडविण्यासाठी उपयुक्त ठरेल.''

## * आदिवासी साहित्य आणि समरसता

१५ वे समरसता साहित्य संमेलन जुन्नर येथे ९ व १० फेब्रुवारी २०१३ रोजी पार पडले. या संमेलनाचा विषय होता – 'आदिवासी साहित्य आणि समरसता.' पहिल्या दिवशी जुन्नर वाचनालयापासून शिवरायांच्या स्मृतीला अभिवादन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली.

संमेलनस्थळाला कै. गोविंद मेघाजी गारे या ज्येष्ठ आदिवासी सनदी अधिकाऱ्याचे नाव देण्यात आले होते.

संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य लक्ष्मणराव टोपले होते. आदिवासी विकास विभागाचे आयुक्त संभाजीराव सरकुंडे, मधु जामकर, निमंत्रक चंद्रकांत शहासने, स्वागताध्यक्ष सीताराम जोशी, कार्यवाह अनिल जोगळेकर, ललित गुजराथी, कार्याध्यक्ष अरुण करमरकर आदी मान्यवर उपस्थित होते. परिषदेच्या अध्यक्षा डॉ. घोणस यांनी १४ व्या संमेलनाचा आढावा घेतला.

संमेलनाचे उद्घाटन मा. श्री. संभाजीराव सरकुंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. ते म्हणाले, ''साहित्याचे अनेक प्रवाह असून आदिवासी साहित्य हा या प्रवाहाचा एक भाग आहे. त्याचे जतन आणि संवर्धन झाले पाहिजे. आदिवासींना समजून घेत, त्यांच्या सुखदु:खाशी समरस झाल्यानेच समाजजीवनात समरसता निर्माण होईल. आपल्या साहित्यामधून समाजजीवनाशी नाते जोडल्याने समरसता निर्माण होऊन आदर्श समाजाचे स्वप्न साकार होऊ शकेल.''

सामाजिक समरसता मंचाचे निमंत्रक दादा इदाते यांचे बीजभाषण झाले. संमेलनात तीन परिसंवाद झाले. आदिवासी साहित्य, प्रेरणा व स्वरूप हा परिसंवाद डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. आदिवासी साहित्य, मौलिक परंपरा व देवकहाण्या या विषयांची मांडणी प्रा. काशिनाथ बऱ्हाटे यांनी केली, तर आदिवासी बोलीचे भवितव्य या विषयावर प्रा. प्रज्ञा कुलकर्णी म्हणाल्या, ''आदिवासी आपल्या बोलीभाषेत लिहू लागला आहे. त्या लिहिण्यातून उद्या चांगल्या साहित्याची निर्मिती होईल.''

प्राचार्य टोपले म्हणाले, ''आदिवासी जनजातीतील अनेक संतांनी धर्मजागरण

केले. १५ व्या समरसता साहित्य संमेलनाचे 'आदिवासींनी लिहावे' या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. पूर्वी आदिवासी धनुष्यबाण घेऊन फिरत होता. पाठीवरच्या भात्यात बाण होते. पण आता त्याला नुसते बाण घेऊन चालणार नाही. त्या भात्यात लेखणीही असली, तरच आदिवासी साहित्याची निर्मिती होईल.''

## * अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन

''समाजात अन्याय, अत्याचार, शोषण, विषमता आहे तोपर्यंत साहित्यातून प्रबोधन, स्त्री-पुरुष समानता वर्ज्य करता येणार नाही. हे विषय सोडून केवळ निखळ आनंदासाठी साहित्यिकांनी लेखन करणे समाजाला परवडणार नाही,'' असे मत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले.

अण्णा भाऊ साठे साहित्य परिषद आणि क्रांतिगुरू लहुजी साळवे सामाजिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना साळुंखे म्हणाले, ''परिवर्तनाची भूमिका अण्णा भाऊंनी पानोपानी मांडली. ते भाषेच्या दुनियेतले, शब्दांच्या विश्वातले विलक्षण रसायन होते. ज्या विश्वात त्यांना प्रवेश मिळाला नाही त्याच विश्वात येऊन त्यांनी विपुल लेखन केले. त्यांचे लेखन वरवर विनोदी वाटत असले तरी आतून प्रबोधनाची नवी लाट निर्माण करणारे होते. फक्त आपल्याच जातीतले नव्हे; तर अन्यायाला बळी पडणाऱ्या प्रत्येकाचे प्रश्न त्यांनी साहित्यातून मांडले. हा आदर्श लेखकांनी समोर ठेवायला हवा. अण्णा भाऊ कोण्या एका जातीचे नव्हते; ते सर्वांचे आहेत.''

''परिवर्तनाची चळवळ रुक्ष, बौद्धिक युक्तिवादाने चालवू नका. त्याने परिवर्तन होणार नाही. डोक्याऐवजी चळवळी हृदयाने चालवा. भावनेला स्पर्श करणारे, अंत:करणाला भिडणारे विषय घेऊन चळवळी चालवा. जो दबलेला आहे त्याला वर येण्याची संधी द्या. ज्यांच्याकडे अधिकार आहेत ते किंचित झुकले तरच समतेची पातळी गाठता येईल.''

## * संगीतोन्मेष संस्थेतर्फे वारकरी संमेलन

संगीतोन्मेष संस्थेतर्फे एक ते तीन मार्च दरम्यान वारकरी संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले. राज्याचे जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या संमेलनात भक्तिसंगीत, संतवाणी, भक्तिनृत्य, मृदंग सोलो, अभंगवाणी या कार्यक्रमांचे सादरीकरण झाले. अखेरच्या दिवशी निंबराज महाराज जाधव यांना गीत-नृत्य-वाद्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह, असे त्याचे स्वरूप होते. या कार्यक्रमाला पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे

अध्यक्ष अण्णासाहेब डांगे, उपमहापौर दीपक मानकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी संदीप काटे, पांडुरंग हिंगे, अनिल पवार, धर्मराज महाराज हांडे यांचा सत्कार करण्यात आला.

''आपल्या देशात पंजाबी संगीत, राजस्थानी संगीत, बंगाली संगीत अशा प्रांतिक परंपरा आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत. किंबहुना त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रतिष्ठा लाभली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रालाही स्वत:ची संगीत परंपरा आहे. ती म्हणजे वारकरी संगीत.'' असे ते म्हणाले.

वारकरी संगीताला आठशे वर्षांची पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रात लावणी आणि नाट्यसंगीत या आणखी दोन संगीत परंपरा आहेत; पण त्यांना दीड-दोनशे वर्षांपेक्षा जास्त पार्श्वभूमी नाही. त्या तुलनेत वारकरी संगीताचा मराठी मातीची प्राचीन संबंध आहे. हे समूह संगीत असून, अभंग गायन हे त्याचे मुख्य अंग आहे. काकडा आरती ते शेजारती, गाथाभजन ते भारुड, कीर्तन ते संगीतभजन असे विविध प्रकार या परंपरेत मोडतात. या प्रत्येक प्रकाराचे वैशिष्ट्य वेगवेगळे आहे. संतांनी अंभग रचना केली, त्या रचनेला त्यांनीच चाल लावली, ते नाचून-टाळ वाजवून गायले. म्हणजेच गीतकार, संगीतकार आणि गायक या तिन्ही भूमिका येथे एकच व्यक्ती पार पाडते. या पार्श्वभूमीवर इतर संगीत परंपरांमध्ये गीतकार, संगीतकार आणि गायक वेगवेगळे असतात.

आजही प्रशिक्षण न घेतलेला वारकरी चाल लावूनच अभंग गातो. एका अर्थाने संगीत परंपरा म्हणून वारकरी संगीत सर्वमान्य आहे. वारकरी संगीतात हार्मोनियम वर्ज्य आहे. मृदंग, वीणा, टाळ ही श्रुती वाद्ये वापरली जातात. त्यामुळे वारकरी हे ताल-स्वराला पक्के असतात अशी कबुली जाणकार देतात. धुमाळी ठेक्यात सताई गाणाऱ्याला मोठी मान्यता होती. धुमाळी ठेक्यात गाणे अवघड असते. आलाप, तान, तिहाई, तिपल्ली, चक्रदार अशा सांगीतिक घटकांचा उत्तम वापर त्यात करता येतो. त्यामुळे तालीम घेतलेल्या कलाकारांशिवाय हा आविष्कार शक्य नाही. असे गाणारे कमी होताहेत, हे खरं असलं तरी, ते जतन करून वाढविणे हे परंपरेतील कलाकारांचे आद्य कर्तव्य आहे. धृपद गायन आणि वारकरी संगीत परंपरेत बरेच साम्य आहे. दोन्हीकडे हार्मोनियम वर्ज्य आहे. ईश्वरी उपासनेवर आधारित काव्य, साथीला मृदंग हे साम्य आहे. अभंग गायनाबरोबरच गौळण, भारुड, प्रसंगी हिंदी भक्ती रचना हे प्रकारही गायले जातात. फडाच्या चाली रसाळ आहेत. म्हणून बंकटस्वामी महाराजांच्या जागराला हजारो श्रोते जमत असत. एकूणच या परंपरेने महाराष्ट्राच्या वाड्या-वस्त्यांपर्यंत संगीत नेले. महाराष्ट्राला संगीताचा कान दिला, त्यामुळे रागसंगीत, अभंग गायन हाच मार्ग निवडावा लागला. अशा महान वारकरी संगीत परंपरेला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा

मिळावी, परंपरेतील कलाकारांना मानसन्मान मिळावेत त्यांच्या समस्या सुटाव्यात या उद्देशाने संमेलनाचा उपक्रम सुरू आहे. भगवान श्रीकृष्णाच्या बासरीवादनाने गायी, व्याघ्र एकत्र येत, यमुनेचे जल स्थिर होई आणि सूर्य आपली वाटचाल थांबवे, असे वर्णन संत भानुदास 'वृंदावनी वेणु कवणाचा माय वाजे' या गौळणीत करतात. तोच भगवान श्रीकृष्ण पुढे विठ्ठलाच्या रूपाने पंढरपुरात पुंडलिकासाठी विटेवर उभा राहिला.

'पुंडलिकाच्या भावार्था । गोकुळीहुनी झाला येता.' त्या विठ्ठलाच्या आराधनेसाठी वारकरी संगीत आहे. एका अर्थाने वारकरी संगीताचे अधिष्ठान भगवान श्रीकृष्णच आहेत. त्यामुळे फक्त मनोरंजन एवढाच हेतू येथे नसून, साधकाला साधनेच्या द्वारा परमात्म्यापर्यंत पोचवणे, जीव-शिवाचे ऐक्य घडवणे हा खरा हेतू आहे. म्हणून संगीत साधना करताना साधकाने काही पथ्ये पाळावीत. साधनेत पावित्र्य राहील याची संतांनी काळजी घेतली.

'युक्त आहार विहार, नेम इंद्रियासी सार ।। नसावी बासर, निद्रा बहुभाषण,' अशी आचारसंहिता दिली. आचार, विचार आणि उच्चारात एकवाक्यता असावी. अभक्ष्य भक्षण करू नये, अपेयपान करू नये, परस्त्रीला आई-बहीण मानावे, दुसऱ्याच्या पैशावर डोळा ठेवू नये आणि सतत नामचिंतन करावे, असे संकेत दिले. खरं म्हणजे सद्य:स्थितीत घडणाऱ्या अनेक अघटित घटना पाहता समाजाने वरील नियमांचा अंगीकार केला, तर परिस्थिती सुधारेल असे वाटते. संमेलनाच्या माध्यमातून वारकरी संगीताच्या प्रचार-प्रसाराबरोबर माणसातलं मनुष्यत्व जागवणे हाही उद्देश आहेच.''

## * सांप्रदायिकता विरोधातील संमेलन

'सांप्रदायिकतेमुळे समाजाचर वाटचाल विकासाऐवजी विनाशाकडे होत आहे. ती वेळीच थांबविण्यासाठी सांप्रदायिकतेला आळा घालण्याची गरज आहे,'' असे मत रचना विकास संस्थेने आयोजिलेल्या सांप्रदायिकताविरोधी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केले. या वेळी मासूम संस्थेच्या संस्थापक मनीषा गुप्ते उपस्थित होत्या.


समाजात सांप्रदायिक वाद वाढत आहे. त्याबाबत विचारविमर्श करून तो दूर कसा करता येईल, यासाठी या संमेलनाचे आयोजन केले होते.

महाराष्ट्राबरोबरच ओडिशा, बिहार, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली येथील प्रतिनिधी यात सहभागी झाले होते.

डॉ. अवचट म्हणाले, ''समाजाच्या वाटचालीबाबत विचार करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाटचालीत होणाऱ्या चुका सुधारण्याची गरज

आहे. हिंदू-मुस्लिमांमध्ये निर्माण होणारी अलिप्ततेची भावना हे चिंतेचे कारण आहे. पर्यावरणावर माणसाकडून अत्याचार होत असून या सर्व गोष्टींना सावरण्यासाठी प्रयत्नांनी गरज आहे.''

जातीजातींतीले, हिंदू-मुस्लिमांमधले गैरसमज आणि संकुचित राजकारण यामुळे सांप्रदायिकता वाढत असल्याने, जनचळवळीच्या माध्यमातूनच त्यास उत्तर मिळू शकेल, असे मनीषा गुप्ते यांनी सांगितले.




**११ वी आवृत्ती**

# गंधाली

**रणजित देसाई**

**किंमत : १४०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**

प्रेम आणि वेदना यांच्यातलं नातं जणू पाठीला पाठ लावून जन्माला आलेल्या जुळ्या भावंडांसारखं असतं. हे आशयसूत्र या संग्रहातल्या कथांच्या माध्यमातून उलगडतं.

यात प्रेमासाठी सर्वस्व पणाला लावणारे मेहरुन्निसा आणि सलीम आहेत, बाजीरावांच्या मृत्यूने विष प्राशन करणारी मस्तानी आहे, तर बंदेअलीच्या जीवनाचा सूर असलेली प्राणप्रिय पत्नी चुन्ना निवर्तल्यावर वेदनेने पिळवटलेला अस्सल कलावंत आहे. सती झालेली; पण जाता-जाता इतरांची आयुष्यं उजळणारी पुतळाबाई आहे, तर स्नेहाने मुत्सद्द्यांची हृदयं जिंकणारी, बुद्धिमान कलावंतीण माहेलका आहे.

या कथांमधून प्रेमाचे वेगवेगळे पोत रणजित देसाई आपल्यापुढे ठेवतात. सगळ्या कथांचा बाज हा ऐतिहासिक असला, तरी त्यातल्या भावभावना मात्र कालातीत आहेत.

'रोमँटिक' जातकुळीच्या या कथा व्याकूळ करतात. यातली तपशिलांची, थेट वर्णनात्मक शैली मनाचा ठाव घेते.

## *   पहिले छत्रपती शिवाजीमहाराज साहित्य संमेलन

''छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र वाचताना केवळ भावनिक आंदोलनात गुरफटून न जाता नवनिर्मितीची स्वप्नेदेखील पाहिली पाहिजेत. तलवार आणि लढाई यापेक्षाही त्यांचे व्यक्तित्व वेगळे आहे. शील आणि सामर्थ्य या दोन्हींचा मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. कुशल प्रशासक, बहुजनांचा कैवारी, बहुभाषा पंडित अशा विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणाऱ्या नव्या शिवचरित्र लेखनाची आवश्यकता आहे,'' असे मत पहिल्या छत्रपती शिवाजीमहाराज साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले.

स्वागताध्यक्ष रवींद्र माळवदकर म्हणाले, पुणे महापालिकेने हे संमेलन सुयोग्य होण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषेदला बरोबर घेतले आहे. संमेलनाचे उद्घाटन महापौर वैशाली बनकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. साळुंखे म्हणाले, ''जगातील विविध राजकीय विश्लेषकांनी आणि भाष्यकारांनी शिवाजीमहाराजांचे वर्णन केले आहे. पाच-दहा वर्षांत काळ बदलतो. पण, इतक्या वर्षानंतरही शिवचरित्र कालबाह्य झालेले नाही. समाजातील बहुसंख्य माणसे सज्जन, सद्गुणी आणि चारित्र्य जपणारी असतात. सज्जनांचा प्रभाव वाढून समाजही सज्जन झाला पाहिजे. पण, सज्जन माणसे दुर्जनशक्तीला रोखून धरण्याइतकी सामर्थ्यशाली नसतात. काही मोजकी माणसेच सामर्थ्यशाली असतात. पण, खेदाची गोष्ट म्हणजे त्यांच्याजवळ चारित्र्य नसते आणि सज्जनांचे रक्षण करण्याची बुद्धी नसते. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रजी या पाश्चात्य भाषांबरोबरच मोडी, उर्दू, पर्शियन, अरेबिक अशा भाषांच्या २५ अभ्यासकांनी एकत्र येऊन आंतरविद्याशाखीय अभ्यासाद्वारे शिवचरित्राचे लेखन करणे योग्य ठरेल.''

## *   मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हवा.

भाषेची प्राचीनता, श्रेष्ठता आणि वाङ्मयीन परंपरेची सलगता या निकषांवर मराठी भाषेचे श्रेष्ठत्व स्वयंभू आहे. त्यामुळे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळेल, असा विश्वास हरी नरके यांनी मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मराठी भूषण पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केला. शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांच्या हस्ते यांचा गौरव करण्यात आला. माजी उपकुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर, शिरीष फडतरे, राधिका हरिश्चंद्रे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मराठी भाषेचे श्रेष्ठत्व स्वयंभू असल्यामुळे कन्नड, तमिळ, तेलुगू या भाषांप्रमाणेच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या संदर्भातील दोनशे पानी अहवाल राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. मराठी भाषेचे वय किमान अडीच हजार वर्षे आहे, असे राजारामशास्त्री भागवत यांनी १८७३ मध्ये आपल्या शोधप्रबंधात

सर्वप्रथम सांगितले. मराठी भाषेचा ब्राह्मी लिपीतील पहिला शिलालेख २२२० वर्षांपूर्वीचा आहे. हा शिलालेख जुन्नरजवळच्या नाणेघाटात सापडला आहे. यावरूनच ही भाषा प्राचीन आहे, हे सिद्ध होते,

मराठीत आज ५२ बोलीभाषा आहेत आणि दरवर्षी अडीचशे संमेलने होतात. जगातील वीस हजार बोलीभाषांपैकी सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषात ही दहाव्या क्रमांकाची भाषा आहे.

मराठी माणसेच मराठीचे नुकसान करतात. मराठी माणसांना मराठीतून





**२ री आवृत्ती**

# सुगरणीचं विज्ञान

**डॉ. बाळ फोंडके**

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

माणूस आपलं अन्न शिजवायला लागला तेव्हापासून त्याच्या उत्क्रांतीतील वाटचालीनं एक महत्त्वाचं वळण घेतलं. किंबहुना माणूस आपलं अन्न शिजवायला लागला तेव्हाच 'हन्टर गवरर' हे स्वरूप सोडून त्यानं आपल्या सुसंस्कृत आधुनिक मानव बनण्याच्या वाटचालीला सुरुवात केली. अन्न शिजवून खायला लागल्यामुळे पचनसंस्थेत जसे उत्क्रांतिनुरूप बदल होत गेले तसा माणसाचा सांस्कृतिक विकास होत गेला.

आयुर्वेदात शिजवणं या प्रक्रियेला अन्नावर संस्कार करणं असंच म्हटलं आहे. म्हणजेच शिजवण्याची प्रक्रिया हीही एक वेगळ्या अर्थानं संस्कृतीजन्य प्रक्रिया ठरते. खाण्याजोगं अन्न तयार करणं यासाठी उष्णता देण्याआधीही काही प्रक्रिया कराव्या लागतात. पूर्वतयारी करावी लागते. प्रमाण नेमकं किती असावं याचं व्यवधान राखावं लागतं. ही सगळी अवधानं पार पाडताना आपण एक वैज्ञानिक प्रक्रियाच पार पाडत असतो याची जाणीव सुगरणींना असतेच असं नाही.

स्वाक्षरी करावीशी वाटत नाही. आपणच भाषेचे नुकसान करत आहोत. मराठीसंबंधी आपल्या मनात असलेला न्यूनगंड काढून टाकला पाहिजे, असे आवाहन मनोहर जोशी यांनी केले.

### * शिवराय, शहाजीराजांची पाच नवी पत्रे उपलब्ध

शिवकालीन मोडीचा उत्कृष्ट नमुना, प्रशासकीय कारभार आणि न्यायव्यवस्थेचे धागे उलगडणारी राजश्री महाराजसाहेब शहाजीराजे यांची दोन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची तीन अप्रकाशित पत्रे भारत इतिहास संशोधक मंडळातील अभ्यासक डॉ. अनुराधा कुलकर्णी आणि अजित पटवर्धन यांना मंडळात मिळाली.

शिवछत्रपतींच्या तीन पत्रांपैकी एक पत्र खेडेबारे तर्फेच्या कारकुनांना पाठविण्यात आलेले आहे. १६४७ मध्ये लिहिलेल्या या पत्रात कामथडी गावची मोकदमी मानजी जाखेजी कोंडे यांची असल्याचे पत्रात नमूद केले आहे. दुसरे पत्र मोरोपंत पेशव्यांना २८ डिसेंबर १६६८ रोजी लिहिलेले आहे. हे पत्र पंताजी गोपीनाथ बोकील यांना मांडकी आणि भवाळी या गावांमध्ये असणारे इनाम सुरू ठेवण्याबाबत आहे. तिसरे पत्र १५ ऑक्टोबर १६८७ चे असून पर्वती गावच्या पाटलांना लिहिले आहे. विनायक भट ठाकरांची इनाम जमीन चालू ठेवावी, असा हुकूम त्यामध्ये आहे. या तिसऱ्या पत्राच्या मायन्यात प्रेषकाचे नाव नाही मात्र मोर्तब आणि इतर खुणांवरून हे पत्र शिवरायांचे वाटते. शिवछत्रपतींच्या पत्रात प्रथमच कोंडे-देशमुखांचा उल्लेख मिळाल्याचेही ते म्हणाले.

शिवाजी महाराजांची २४०, तर शहाजीराजांची ५१ पत्रे उपलब्ध होती. या अप्रकाशित पत्रांमुळे आता या संख्येत वाढ झाल्याचे नमूद केले गेले. कुलकर्णी यांनी शहाजीराजांच्या पत्रांचा उलगडा केला. त्यापैकी एक २८ फेब्रुवारी १६४४ रोजी पुणे परगण्याच्या अधिकाऱ्यांना लिहिले आहे. हे पत्र महादभट मुद्‌गलभट पुरंदरे यांना पर्वती येथील इनाम जमीनीबाबत लिहिलेले आहे. दुसरे पत्र १९ ऑक्टोबर १६५२ चे असून त्यात कऱ्हेपठार तर्फेच्या आंबिले (ता. पुरंदर) गावाच्या कुलकर्णपणाविषयी बोकील आणि बेलसरे यांच्या वादाचा निवाडा करण्याबाबत आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. ग. भा. मेहेंदळे यांनीही या पत्रांच्या अस्सलपणावर शिक्कामोर्तब केले.

### * पंडित भीमसेन जोशींची माहिती देणारा 'मॅजिक स्क्वेअर'

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांची माहिती देणाऱ्या 'मॅजिक स्क्वेअर'ची निर्मिती प्रा. सुहास पाकणीकर यांनी केली आहे.

या 'मॅजिक स्क्वेअर'मध्ये ४ ओळी आणि ४ स्तंभ असे १६ चौरस आहेत. यातील प्रत्येक चौरसामध्ये एक आकडा आणि एक अक्षर लिहिलेले आहे. प्रत्येक

चौरसाला एक रंग दिलेला आहे. या मॅजिक स्क्वेअरमधील प्रत्येक ओळ, स्तंभ, कर्ण आणि प्रत्येक रंगाच्या चौरसातील आकड्यांची बेरीज ४७ होते. या 'मॅजिक स्क्वेअर'मधील आकड्यांमध्ये पंडितजींची जन्मतारीख (०४-०२-१९२२) दडलेली आहे. या चौरसातील आकडे आणि अक्षरे यांचा वापर यातून काही समीकरणांची निर्मिती केली आहे. त्या प्रत्येक समीकरणाच्या उत्तरामधून पंडितजींच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्याची तारीख मिळते. याबाबत पाकणीकर म्हणाले, ''गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांनी तयार केलेला स्वत:च्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांचा मॅजिक स्क्वेअर पाहण्यात आल्यानंतर पंडितजींच्या आयुष्यावर 'मॅजिक स्क्वेअर'तयार करण्याची कल्पना सुचली.''

## * अखिल भारतीय कृषी साहित्य संमेलन

वाढता उत्पादन खर्च, शेतीचे आणि खेड्यापाड्याचे विभाजन, पाणीटंचाई, अशा अनेक आव्हानांशी आज शेतकरी झुंजत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढविण्यालाच अग्रक्रम असला पाहिजे. त्यादृष्टीने नव्याने कृषिविकासाची मांडणी करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांनी केले.

नाशिक येथे पहिल्या अखिल भारतीय कृषी साहित्य संमेलनाचे दिंडोरी येथील आध्यात्मिक विकास केंद्राचे प्रमुख अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. पणनमंत्री राधाकृष्ण विखे स्वागताध्यक्ष होते.

श्री. बोराडे म्हणाले की, ''शेती आणि ग्रामीण जीवनविषयक आस्था हाच माझ्या सर्जनशील लेखनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, उत्तर महाराष्ट्र, या विभागातील शेतीचे काही प्रश्न वेगवेगळे असले, तरी त्यात बरेचसे साधर्म्य दिसते. सद्य:स्थितीत शेतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. शेतीसोबत घराचे, खेड्याचे विभाजन हीदेखील चिंतेची बाब आहे. उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी हा क्रम मधल्या काळात चुकल्यामुळे शेती प्रश्न बिकट झाला. शालेय शिक्षणातून तसेच मूल्यशिक्षणातून शेतीचे सखोल ज्ञान रुजविले पाहिजे.

## * १६७५ सालचे देवनागरी मराठीतील शपथपत्र

सोळाव्या शतकात, शिवाजी महाराजांच्या काळात मोडी लिपीतून व्यवहार सुरू होते, हे सर्वज्ञात आहे. पण देवनागरी लिपीचाही वापर तेव्हापासून सुरू झाला होता, या गोष्टीला पुष्टी देणारा दस्तऐवज हाती लागला आहे. वनस्पती अभ्यासक हेब्रिक व्हॅन ऱ्हीड याने १६७५ साली प्रसिद्ध केलेल्या 'हॉर्टस मलबारिकस' या

लॅटिन भाषेतील ग्रंथामध्ये मराठी भाषेत देवनागरी लिपीत लिहिलेले शपथपत्र आहे. हे पहिले मराठी शपथपत्र आघारकर संशोधन संस्थेतील वनस्पती संशोधक डॉ. मंदार दातार यांना मिळाले आहे.

शिवाजी महाराजांच्या काळात मोडी लिपीचा वापर होता. पण बोलीभाषा मराठी होती. या काळात डच मिलिटरी कमांडंट व्हॅन ऱ्हीड यांनी भारतात येऊन महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळमधील वनौषधींचे महत्त्व, त्यांचा वापर आणि इतर माहिती रंगा भट, विनायक पंडित आणि अप्पू भट या तीन वैद्यांकडून घेतली. या अभ्यासातून त्यांनी 'हॉर्टस मलबारिकस' हा बारा खंडांचा ग्रंथ लिहिला.

पुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी मिळालेली सगळी माहिती अधिकृत असल्याचे या तिघांकडून मराठी भाषेतून शपथपत्र लिहून घेतले.

हे शपथपत्र शुक्रवार ९ एप्रिल १६७५ रोजी प्रसिद्ध झाले आहे. या पत्राचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये कोकणी शब्दांचा वापर केला आहे. काही अक्षरे मोडी पद्धतीने लिहिलेली आहेत.

ॲमस्टरडॅमला गेल्यावर त्यांनी १६७८ मध्ये ग्रंथ प्रकाशित केला.

'वेगवेगळ्या गावांत फिरून वनस्पतींची फुले, फळे आणि ऋतुनुसार होणाऱ्या बदलांचा केलेला अभ्यास, या काळात आलेले अनुभव आणि आयुर्वेदीय ग्रंथांतील संदर्भांना अनुसरूनच आम्ही माहिती दिली आहे. या वनस्पतींची रेखाटनेही यासाठी काढली आहेत,' असे या वैद्यांनी शपथपत्रात नमूद केले आहे. 'सोळाव्या शतकातील मराठी भाषेत देवनागरीत लिहिलेले आतापर्यंत सापडलेले हे पहिलेच पत्र असण्याची शक्यता आहे,' अशी माहिती डॉ. दातार यांनी दिली.

## * जप्त 'पायरेटेड' पुस्तकांची शंभर पोती!

मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने 'पायरेटेड' पुस्तकांचा साठा असलेल्या एका गोदामावर टाकलेल्या छाप्यात १३ हजार पुस्तके जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या या पुस्तकांनी समाजसेवा शाखेतील १०० पोती भरली आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून मुंबई शहर आणि उपनगरात विशेषत: फोर्ट, चर्चगेट परिसरात मोठ्या प्रमाणात 'पायरेटेड' पुस्तकांची विक्री केली जात आहे.

विश्वास पाटील, पु. ल. देशपांडे, रणजित देसाई, व. पु. काळे, वीणा गवाणकर आदी लेखकांची पुस्तके विकली जात आहेत. यात 'एक होता कार्व्हर', 'पार्टनर', 'स्वामी', 'मृत्युंजय', 'पानिपत', राजा शिवछत्रपती', 'बटाट्याची चाळ' आणि अन्य पुस्तकांचा समावेश आहे. या संदर्भात मराठी पुस्तकांना 'पायरसी'ची वाळवी अशी बातमी ७ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध झाली होती. लेखिका वीणा गवाणकर यांनीही मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना पत्र पाठवून 'पायरेटेड' पुस्तक

विक्रेत्यांच्या विरोधात ठोस कारवाई करण्याविषयी साकडे घातले होते.

पोलिसांनी शीव, कोळीवाडा इंदिरा नगर येथील एका गोदामावर धाड टाकून सुमारे १३ हजार पुस्तके जप्त केली. या पूर्वी डिसेंबर महिन्यात वर्सोवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत २८ लाख रुपयांची 'पायरेटेड' पुस्तके जप्त करण्यात आली होती. शीव, कोळीवाडा येथे केलेल्या कारवाईत 'संभाजी', 'ययाती', 'स्वामी', 'राऊ' वगैरे 'पायरेटेड' मराठी पुस्तके होती. 'पायरसी' विरोधात यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

## * ई-बुक'चे आव्हान

पुस्तके ठेवायला घरात जागा नाही... दुकानात जाऊन पुस्तक खरेदी करायला वेळ नाही... वाचलेल्या पुस्तकांचा नंतर फारसा उपयोग होत नाही... अशा वेगवेगळ्या कारणांमुळे गेल्या दोन वर्षात 'ई-बुक'चे महत्त्व वाढले आहे. याचा विचार करून सर्वच मराठी प्रकाशकांनी एकत्र येऊन आता 'ई-बुक'चे आव्हान स्वीकारायला हवे. तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केला तरच ग्रंथ अधिकाधिक वाचकांपर्यंत पोचतील, असे मत प्रकाशक परिषदेत व्यक्त आले.

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती. यात भारतीय भाषांमधील ७० प्रकाशक सहभागी झाले होते. परिषदेच्या समारोपाच्या सत्रात 'प्रकाशकांसमोर ई-बुकचे आव्हान' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. पॉप्युलर प्रकाशनाचे हर्ष भटकळ, ज्योत्स्ना प्रकाशनाचे मिलिंद परांजपे, मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, डायमंड पब्लिकेशनचे दत्तात्रेय पाष्टे आणि नरेंद्रकुमार वर्मा यात सहभागी झाले होते.

कागद, छपाई, वितरण असे वेगवेगळे खर्च 'ई-बुक'ला नसतात. तरीही 'ई-बुक'ची किंमत वेगळी असते. त्याचा वापर वाढला तर 'ई-बुक'च्या किंमती वाचकांच्या आवाक्यात येतील. त्यामुळे सर्वच मराठी प्रकाशकांनी 'ई-बुक'चा विचार करायला हवा, असे मत मांडले.

## * गिरीश कर्नाडांचे नाटक मराठीत

नाटककार गिरीश कर्नाड यांच्या लेखणीतून उतरलेले 'उणे पुरे शहर एक' हे नाटक कन्नड रंगभूमीआधी थेट मराठी रंगभूमीवर आले आहे. शहरांचे वास्तव चित्रण करणाऱ्या या आगळ्या-वेगळ्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगासह हिंदी, गुजराती भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण नाटके पाहण्याची संधी प्रेक्षकांना विनोद दोशी स्मृती नाट्य महोत्सवात मिळाली.

विल्यम शेक्सपिअर यांच्या नाटकाचे रूपांतर असलेले 'पिया बहरूपिया', 'आधे अधुरे', 'गाशा' ही हिंदी नाटके; गुजराती भाषेतील 'मारो-पियू गयो रंगून' आणि मराठीतील 'उणे पुरे...' ही नाटके सादर झाली.

प्रदीप वैद्य यांनी 'उणे पुरे...'चे मराठीत रूपांतर केले आहे. ज्योती सुभाष, राधिका आपटे, विभावरी देशपांडे, उमेश जगताप यांच्यासह १९ कलाकारांनी २८ भूमिका साकारल्या.

काश्मिरी पंडित आणि काश्मिरी मुस्लिम यांच्यातील मैत्रीची कथा 'गाशा' मधून उलगडली गेली. 'आधेअधुरे'ने विवाह संस्थेवर प्रकाश टाकला आहे.

### * विजय तेंडुलकरांचे नाटक नव्याने रंगभूमीवर

नाटककार विजय तेंडुलकर यांनी कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेले आणि अरविंद देशपांडे यांनी १९६८ साली रंगभूमीवर आणलेले 'झाला अनंत हनुमंत' हे नाटक नव्याने रंगभूमीवर आले आहे. अनंत अंकुश दिग्दर्शित या नाटकाचा विशेष प्रयोग व्हिजन केअर या संस्थेतर्फे २१ फेब्रुवारी रोजी रवींद्र नाट्यमंदिरामध्ये सादर करण्यात आला.

तेंडुलकरांच्या विनोदी शैलीची ओळख करून देणारे हे नाटक असून 'अनंत हनुमंत कुलकर्णी' ही प्रमुख व्यक्तिरेखा ज्येष्ठ अभिनेते भालचंद्र पेंढारकर यांनी साकारली होती. नव्या रूपातील व्यावसायिक रंगभूमीवरील या नाटकात प्रमुख भूमिका रत्नाकर देशपांडे साकारत असून गीतांजली कांबळी, भाग्यश्री कामत, गिरिजा फडके, योगिता परदेशी, चेतन कुसावत, सचिन सुर्वे, राहुल शेंडे, श्रीकांत हांडे, अवधूत माळी, सतीश बोरये, ओंकार दामले, सुशील वळंजू, विनायक हेरवंडे, या कलावंतांच्या भूमिका आहेत.

नवनाट्यपर्व या संस्थेच्या नाटकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा उड्डाण करते असा रोमांचकारक सीन आहे. १९६८ साली भालचंद्र पेंढारकर यांनी उड्डाण घेण्यासाठी खूप श्रम केले होते.

### * पुस्तके, माहितीच्या लिंकसाठी 'क्यू आर कोड'चा वापर

लायब्ररीत नवीन आलेल्या पुस्तकांची माहिती वाचकांना मोबाइलवर एका कोडच्या माध्यमातून मिळावी यासाठी सध्या कर्वे समाज सेवा संस्थेच्या लायब्ररीचे ग्रंथपाल मंगेश तळमळे एक प्रकल्प राबवत आहेत.

'क्यू आर कोड' अर्थात 'क्विक रिस्पॉन्स कोड' हे 'मेट्रिक्स' प्रकारातील एक सांकेतिक चिन्ह आहे. 'क्यू आर' हे तंत्रज्ञान विविध उत्पादनांच्या जाहिरातींमध्ये वापरले जाते. या जाहिरातींमध्ये काळ्या रंगाच्या छोट्या चौकटीत एक विशिष्ट कोड

छापलेला असतो. इंटरनेटची सुविधा असलेला अँड्रॉइड मोबाईल वापरणाऱ्या व्यक्तींना आपल्या मोबाईलवर हा कोड स्कॅन करून थेट संबंधित उत्पादनाच्या वेबसाईटवर जाऊन त्या उत्पादनाशी संबंधित माहिती मिळवता येते. नवीन पुस्तके, सीडीज, डीव्हीडी, दुर्मिळ ग्रंथ, लायब्ररीची वेळ, नियमावली, सेवा-सुविधांची माहिती, पुस्तकांशी संबंधित वेबसाइट्स, ब्लॉग, चर्चासत्रे, विविध अलर्टची माहिती, पुस्तकांची अनुक्रमणिका 'क्यू आर कोड'च्या माध्यमातून मिळू शकते. परदेशातील अनेक लायब्ररींमध्ये 'क्यू आर कोड' तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतातील लायब्ररींमध्ये मात्र या तंत्रज्ञानाचा वापर अत्यल्प होतो.

## * वर्ल्ड क्लास 'झू'

नागपूर येथील वर्ल्ड क्लास गोरेवाडा 'झू' मिहानकडे 'ड्रीम प्रोजेक्ट' म्हणून बघितले जात आहे. राज्य वनविकास महामंडळ (एफडीसीएम) दोन हजार हेक्टर क्षेत्रात 'निसर्गपथ' निर्माण करीत.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या प्रकल्पासाठी १५ कोटी रुपये दिले आहेत. १६ कोटी रुपये केवळ सुरक्षा भिंतीचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प यशस्वी झाल्यास नागपूर हे देशातील प्रमुख 'टुरिस्ट हब' म्हणून ओळखले जाईल.

'मास्टर प्लॅन'नुसार सुमारे १९१४ हेक्टर क्षेत्रात हा प्रकल्प विकसित केला जाणार आहे. त्यापैकी ८०० हेक्टरमध्ये प्राणिसंग्रहालय राहणार आहे; शिवाय उत्तरेकडील एक हजार हेक्टरमध्ये जंगल सफारी, २५ हेक्टरमध्ये रेस्क्यू सेंटर, १५० हेक्टरमध्ये इंडियन सफारी, १७५ हेक्टरमध्ये आफ्रिकन सफारी व ८० हेक्टरमध्ये गोंडवाना बायोपार्क प्रस्तावित आहे.

## * गोंडी भाषेचा फाँट तयार

आदिवासी गोंड समाजाच्या 'गोंडी' भाषेचा फाँट तयार झाल्यामुळे या लिपीमध्ये मुद्रण करणे शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांना गोंडी भाषेतील पुस्तके मिळाल्याने मातृभाषेत शिक्षण घेणे तसेच गोंडी लेखक– संशोधकांना त्या भाषेत विचार प्रकट करणे शक्य होणार आहे, अशी माहिती स्क्रिप्ट रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. मुकुंद गोखले यांनी दिली.

गोखले म्हणाले, ''गोंडी भाषा आणि लिपी केवळ हस्तलिखित स्वरूपात असल्यामुळे तिचा प्रसार होऊ शकला नव्हता. मात्र, फाँट तयार झाल्यामुळे हा अडथळा दूर झाला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, व ओडिशातील काही जिल्ह्यांमध्ये गोंडी ही व्यवहाराची भाषा आहे. मुंबई-पुण्यातही नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने हा समाज स्थिरावला आहे. त्यांच्या नवीन पिढीला या फाँटमुळे आपली

भाषा समजण्यास मदत होणार आहे. आपल्या राज्यात प्रामुख्याने किनवट, माहूर, यवतमाळ, पांढरकवडा येथे ही भाषा बोलली जाते. गोंडी भाषेलाच 'कोयाबोली' असेही म्हटले जाते. फाँट तयार झाल्याने त्या भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या साहित्यातही वाढ झाली आहे.''

## * 'ग्रेस'चे प्रकाशन

आज भूकंप व अपघातांकडेही माणूस मनोरंजन म्हणून पाहत आहे. कवितेशी एकरूप झाल्यावर आपल्या बोथट झालेल्या संवेदना पुन्हा एकदा जागृत होतील, असे मत समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

सुधाकर गुंजाळ यांनी लिहिलेल्या 'ग्रेस' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन डॉ. अरविंद संगमनेरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी माधवी वैद्य, चित्रकार रविमुकुल उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''आपल्यातील संवेदना हरवत चालल्याची खंत कोणालाही नाही. विविध क्षेत्रांत वावरणारे कवी मुळातच संवेदनशील असल्यामुळे त्यांच्या कवितेतून जीवनाचे दर्शन होते. गुंजाळ यांच्या कवितेतूनही नेमके तेच उमटते. ग्रेस हे अंतर्वर्तुळातील कवी आहेत. रसिकांना झपाटून टाकणारा हा कवी संगीताच्या सुरांमधून आपल्यापर्यंत पोचला. त्यांची कविता नादमधुर व झपाटून टाकणारी आहे.''

डॉ. वैद्य म्हणाल्या, ''काव्यसंग्रहाच्या माध्यमातून कवी ग्रेस यांना आदरांजली वाहण्याचे महत्त्वपूर्ण काम गुंजाळ यांनी केले आहे. ग्रेस यांचे व्यक्तिमत्त्व हे नावाप्रमाणेच 'ग्रेसफुल' होते. म्हणूनच ते आपल्यात नाहीत, हे मान्य करणे आपल्याला त्रासदायक वाटते.'' रविमुकुल यांनी ग्रेस यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा दिला.

## * राज्य सरकारतर्फे मराठी साहित्याच्या ऑडिओ बुकचा उपक्रम

मराठी साहित्याचा ठेवा 'ऑडिओ बुक'च्या माध्यमातून जतन करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतला आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र 'कृष्णाकाठ' पहिल्या टप्प्यात ऑडिओ बुकच्या स्वरूपात २७ फेब्रुवारीला उपलब्ध झाले.

कुसुमाग्रज यांच्या 'प्रवासी पक्षी', 'रसयात्रा', आणि विंदा करंदीकर यांच्या 'संहिता', 'आदिमाया' या संग्रहातील कविता डॉ. श्रीराम लागू, सुलभा देशपांडे, चंद्रकांत काळे, डॉ. गिरीश ओक, सुबोध भावे, अमृता सुभाष, सचिन खेडेकर, किशोर कदम वगैरे नामवंत अभिनेत्यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आल्या आहेत.

राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. अशोक सोलणकर म्हणाले, ''पुढील टप्प्यात तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी आणि ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर यांचे साहित्यही ऑडिओ बुकमध्ये आणण्यात येईल. दासबोध स्वरबद्ध करणे हे अतिशय आव्हानात्मक काम होते. अतिशय स्वच्छ आवाजाच्या गायकाची गरज पं. संजीव अभ्यंकर यांच्या रूपाने पूर्ण झाली. हा दासबोध पारंपरिक चालींतच बांधण्यात आला आहे. हे रेकॉर्डिंग करण्यास नऊ महिने लागले.''

* **डिजिटल तंत्रज्ञानात महिला मागे**

जनसंपर्काचे प्रभावी माध्यम म्हणून इंटरनेटचा वापर सध्याच्या काळात 'मस्ट' मानला जात असतानाच, विकसनशील देशातील स्त्रिया इंटरनेटच्या वापराबाबत मागे राहिल्याचे 'इंटेल'ने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले आहे.

आफ्रिका, मध्यपूर्व आणि अन्य विकसनशील देशांमध्ये इंटरनेट वापरणाऱ्या महिलांचे प्रमाण खूपच कमी आहे. या देशांमधील इंटरनेट वापरणाऱ्या पुरुषांशी तुलना केल्यास महिलांची संख्या २५ टक्क्यांनी कमी आहे. इजिप्त, भारत, मेक्सिको, आणि युगांडा या देशांमधील सुमारे २२०० महिलांच्या मुलाखतीमधून ही बाब समोर आली आहे. या देशांमधील महिलांना इंटरनेटच्या माध्यमातून पैसे कमावणे, नोकरी शोधणे अथवा नोकरीचा अर्ज करणे कठीण जाते आहे.

उत्पादनक्षमता वाढवणे आणि नवनव्या संधी शोधणे यामध्ये महिला मागे राहिल्यामुळे एकप्रकारची डिजिटल दरीच निर्माण झाली आहे. भारतातील ११ टक्के पुरुष आणि महिला इंटरनेटचा वापर करतात. अमेरिकेमध्ये हेच प्रमाण ७९ टक्के आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क आयोगानेही प्रगतीसाठी इंटरनेट प्रभावी असल्याचा उल्लेख कला होता. परंतु इंटरनेटचा खर्च, निरक्षरता आणि जनजागृतीची कमतरता उदासीनतेला कारणीभूत ठरते. इंटरनेटशी जोडले गेल्यास महिलांचे जीवनमान सुधारून जागतिक अर्थव्यवस्थेलाही उभारी येईल, असा विश्वास इंटेलला वाटतो.

* **तंत्रज्ञानाय नमो नमः**

थ्रीडी सिनेमासह व्हीएफएक्स (व्हिज्युअल इफेक्ट) सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा ट्रेंड सुरू झाला आहे.

'आई मला मारू नको' या पहिल्या थ्रीडी सिनेमा पाठोपाठ आता 'जय शंकर' आणि 'झपाटलेला २' हे दोन थ्रीडी सिनेमे सध्या तयार होत आहेत. त्यापैकी 'आई मला मारू नको' आणि 'जय शंकर' या दोन्ही सिनेमांचा 'टूडी टू थ्रीडी' असा प्रवास

झाला असून, 'झपाटलेला २' हा पूर्णत: थ्रीडी कॅमेऱ्याने चित्रित होत आहे. यासाठी 'येस थ्रीडी' हे तंत्रज्ञान वापरले आहे. 'झपाटलेला २'चे सिनेमॅटोग्राफर सुरेश देशमाने म्हणाले, ''थ्रीडी सिनेमाचं तंत्र पूर्णत: वेगळं असल्याने दिग्दर्शक महेश कोठारे यांनी थ्रीडीचा पूर्ण सेटअप स्पेनमधून आणला आहे. तज्ज्ञ एनिके क्रियाडो हाही आमच्यासह काम करत आहे. थ्रीडी सिनेमा आणि मूळ थ्रीडी सिनेमांत मोठा दृश्यात्मक फरक असल्यानं आम्ही थ्रीडी कॅमेऱ्याने चित्रीकरण करत आहोत. त्यामुळे हा सिनेमा प्रेक्षकांना थ्रीडीचा खराखुरा फील देईल. हे सगळं तंत्रज्ञान बरंच खर्चिक असलं, तरी त्यानं मिळणारा परिणाम महत्त्वाचा ठरतो.''

याशिवाय व्हीएफएक्स (व्हिज्युअल इफेक्ट) हे अत्याधुनिक तंत्रज्ञान 'काकस्पर्श', 'शर्यत' 'पुणे ५२', 'आजोबा', 'रेगे', अशा काही सिनेमांतही पाहायला मिळणार आहे. विजू माने म्हणाले, ''गेल्या दशकातल्या मराठी सिनेमांच्या कथा कौटुंबिक किंवा नात्यांचे पट उलगडणाऱ्या होत्या; पण टीव्ही मालिकांच्या माऱ्यामुळे आता वेगळे विषय हाताळले तरच प्रेक्षक थिएटर्समध्ये येतील. मराठी सिनेमाला जागतिक बाजारपेठ खुली झाली आहे. पण इंग्रजी आणि हिंदी सिनेमांच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी व्हीएफएक्सचा वापर आवश्यक आहे.''


### * कार्यालयात स्वत:ची 'आयटी' उपकरणे

माहिती तंत्रज्ञानामुळे कामाचा वेग वाढत असून तरुण कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी अधिक ताण जाणवत आहे. 'व्हीएम वेअर' या संस्थेने 'न्यू वे ऑफ लाइफ स्टडी २०१३' नावाचा हा अभ्यासक्रम 'आशिया पॅसिफिक' विभागातील १२ देशांमध्ये सुरू केला आहे.

भारतामध्ये या सर्वेक्षणांतर्गत प्रश्न विचारण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ७५ टक्के कर्मचारी हे १९८० ते १९९५ या कालखंडात जन्म असणारे, म्हणजेच 'जनरेशन वाय' मधील आहेत. यातील ४० टक्के भारतीय कर्मचाऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित अडचणींमुळे ताण जाणवत असल्याचे समोर आले आहे. नोकरशाहीशी संबंधित प्रश्नांमुळे ३५ टक्के तर कामाचा बोजा पडल्याने ३१ टक्के कर्मचारी तणावग्रस्त असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारतातील ८५ टक्के कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी संगणक आणि इतर साधने पुरविली जात असली, तरी 'जनरेशन वाय' मधील ८१ टक्के कर्मचारी स्वत:ची लॅपटॉप, टॅब्लेट, अशी उपकरणे कार्यालयात आणतात. कार्यालयात आवडीचे उपकरण वापरण्याची परवानगी मिळाल्यास ७८ टक्के कर्मचारी अधिक कार्यक्षम होऊ शकतील. मात्र, कर्मचाऱ्यांना आज कार्यालयात 'आयटी'संदर्भात मदत मिळत नाही. कार्यालयीन आणि वैयक्तिक जीवन झपाट्याने एकत्र होत

८ वी आवृत्ती




# थैलीभर गोष्टी

**सुधा मूर्ती**

अनुवाद : **लीना सोहोनी**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.**

राजे राजवाडे, महाराण्या, राजपुत्र, राजकन्या, कंजूष माणसं, जवळ फुटकी कवडीही नसलेली दरिद्री माणसं, शहाणी माणसं, विद्वान माणसं, चतुर माणसं, मूर्ख आणि अडाणी माणसं, चमत्कारिक स्त्रिया व पुरुष, चित्रविचित्र घटना या सुरस कथांमधून जिवंत होऊन आपल्या भेटीला येतात.

एका कथेतील बुद्धिमान राजकन्येला आपल्यापेक्षा हुशार पती हवा असतो, म्हणून ती सर्व विवाहोत्सुक तरुणांना प्रत्येकी नऊ प्रश्न विचारण्याची संधी देते, पण अखेर तिलाही निरुत्तर करणारा कोणीतरी भेटतोच... एक अनाथ मुलगा आपल्या दुष्ट काकांना चांगली अद्दल घडवतो... आणि संकटात सापडलेल्या एका वृद्ध जोडप्याला उपयोगी पडतो तो एक ढोल!

यातील काही कथा लेखिका सुधा मूर्ती यांनी आपल्या बालपणी आजी-आजोबांकडून ऐकल्या... तर काही कथा देशोदेशी केलेल्या भ्रमंतीच्या दरम्यान त्यांना ऐकायला मिळाल्या... काही कथा त्यांच्या स्वत:च्या कल्पनाशक्तीतून कागदावर उतरल्या...

या सर्वच्या सर्व सुरस, कालातीत अशा लोककथा गेली कित्येक वर्षं लेखिकेच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत. वेळोवेळी आपल्या सहवासात आलेल्या लहान मुलामुलींना, आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या सांगितल्या आहेत. आज या कथासंग्रहाच्या रूपाने या सर्व कथा लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वच वाचकांना वाचनासाठी उपलब्ध होत आहेत.

असल्याचा निष्कर्ष या अभ्यासातून पुढे आला आहे. यात ८१ टक्के कर्मचारी घरी असतानाही कार्यालयातील काम करीत असतात. कार्यालयात तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य मिळणे प्रगतीसाठी अधिक पोषक असल्याचे ८० टक्के कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे.

## * 'व्हॉट्सॲप' ॲप्लिकेशनवर फसवे संदेश

'व्हॉट्सॲप' या लोकप्रिय मेसेंजर ॲप्लिकेशनवर सध्या फसवे संदेश फिरत असल्याचे उघड झाले आहे. अँडी आणि जॉन या नावाने येणारा एक संदेश आणखी दहा जणांना न पाठविल्यास तुम्ही अकार्यरत (इनॲक्टिव्ह यूजर) असल्याचे समजण्यात येईल, अशी धमकी या संदेशातून देण्यात येत आहे. अशा संदेशांना बळी न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'एमएसएन' आणि 'व्हॉट्सॲप'चे संचालक असल्याचे भासवून फसव्या संदेशाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न होत आहे. ''आमच्याकडे नवीन फोनकरिता आता फक्त ५३० अकाउंट उपलब्ध आहेत. आमच्या सर्व्हरमध्ये नुकताच बिघाड झाल्यामुळे 'ॲक्टिव्ह युजर्स'ची माहिती संकलित करण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येकाने हा संदेश किमान दहा जणांना पाठवावा.


संदेश पाठविल्यानंतर 'व्हॉट्सॲप'चा हिरव्या रंगाचा लोगो, डिझाइन बदलेल. तसे न केल्यास तुमचे संपर्क क्रमांक गमावून बसाल आणि तुम्हाला 'इनॲक्टिव्ह युजर' समजण्यात येईल,'' अशी धमकी या फसव्या संदेशांतून देण्यात येत आहे. दुसरीकडे, संपर्क क्रमांकांच्या यादीतून नऊ जणांना संदेश पाठविल्यास 'फ्री, लाइफटाइम ब्ल्यू लूक' दिसू लागेल असेही आमिष दाखविण्यात येत आहे.

क्रिएटिव्ह फाउंडेशनचे संदीप खर्डेकर म्हणाले, ''व्हॉट्सॲप'चा वापर करणाऱ्या नेटिझन्सची फसवणूक होऊ नये, यासाठी या फसव्या संदेशांच्या विरोधात 'व्हॉट्स ॲप'च्या अधिकृत प्रतिनिधींशी संपर्क साधण्यात येत आहे. दरम्यान, फसवे संदेश मित्र-मैत्रिणींमध्ये प्रसारित करू नयेत, असे आवाहन करण्यात येत आहे.''

## * 'गाथा सप्तशती'चे प्रकाशन

'गाथा सप्तशती' या प्राकृत भाषेतील ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते झाले.

''पती-पत्नीच्या सहजीवनासह आधुनिक काळातील अनेक प्रश्नांची उत्तरे सातवाहन काळातील गाथा सप्तशतीच्या (लौकिक काव्यात) अभ्यासातून मिळू




आगामी

# 'ची' रनिंग

मूळ लेखक :

**डॅनी ड्रेयर आणि कॅथरिन ड्रेयर**

अनुवाद : **डॉ. मीना शेटे-संभू**

धावपटूंच्या दुनियेत खळबळ माजवणारे रोमहर्षक आणि क्रांतिकारक पुस्तक –टोडी टान्सर, 'ट्रेन हार्ड, विन ईझी' या पुस्तकाचे लेखक

सध्या हजारो धावपटू दुखापतीरहित आणि वेदनारहित धावण्याचे 'ची रनिंग' हे तंत्र स्वीकारत आहेत. तुम्हीही त्यात सहभागी व्हा. या पुस्तकात कित्येक नवे दृष्टिकोन आणि प्रशिक्षण तंत्रे आहेत. डॅनी ड्रेयर हे क्रीडा क्षेत्रातील एक आघाडीचे नाव असून वेदनांना कसा प्रतिबंध करावा आणि आधीच्या वेदनांपासून कशी मुक्ती मिळवावी, याविषयी त्यांनी या पुस्तकात माहिती दिली आहे. कोणत्याही वयात किंवा तुमची क्षमता कितीही कमी-जास्त असली तरीही कमी श्रमात, अधिक गतीने, अधिक अंतर कसे पार करावे याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

या पुस्तकाच्या दीड लाखांहून अधिक प्रतींचा खप झाला असून या प्रकारच्या धावण्याच्या कार्यक्रमामुळे आता धावणे सुरक्षित बनले आहे. नवोदित आणि अनुभवी धावपटूंसाठी तो एक आनंददायी क्रीडाप्रकार बनला आहे. शिवाय ज्यांना स्पर्धांत भाग घ्यायचा आहे, त्यांना त्या प्रकारचे प्रशिक्षणही दिले जाते. ची रनिंगमध्ये शरीराच्या मध्यभागातील स्नायूंच्या सामूहिक शक्तीद्वारे धावण्यास शिकवले जाते. योग, पायलेट्स आणि या ताय ची प्रकारात अशा प्रकारचा दृष्टिकोन पाहायला मिळतो.

शकतात. या गाथा भावनांची कदर आणि निराशावादी दृष्टिकोन दूर करण्यास शिकवतात,'' असे मत प्राकृत भाषेच्या अभ्यासक डॉ. राजश्री मोहाडीकर यांनी व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, ''गाथा सप्तशतीमध्ये विषयाची बांधिलकी सापडते. प्रत्येक गाथा ही स्वतंत्र आहे. याचा मुख्य विषय माणसाचे मन, प्रेमभावना समजावून घेणे ही आहे. टीकाकारांनी मात्र प्रत्येक गाथेतून शृंगारिक अर्थ काढण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु यात पती-पत्नीचे प्रेम व सहजीवन यावर अधिक भर देण्यात आला आहे.''

*** अनुजा पंडित ईबीसी रेडिओ जॉकी**

अमेरिकेत राहणाऱ्या परदेशी लोकांमध्ये भारतीयांचा तिसरा किंवा चौथा क्रमांक लागतो. मराठी संस्कृती आणि अस्मितेचा कायम पुरस्कार करणारी माणसेही आहेत. या यादीमध्ये अनुजा समीर पंडित (पूर्वाश्रमीच्या अनुजा कर्नाड) हे नाव लक्ष वेधून घेणारे ठरले आहे.

कोल्हापूरनिवासी किरण कर्नाड आणि माधवी कर्नाड यांची अनुजा ही धाकटी मुलगी. न्यू जर्सीमध्ये काम करणाऱ्या समीर पंडित यांच्याशी डिसेंबर २००३ मध्ये विवाह झाल्यानंतर ती अमेरिकेला गेली. 'ईबीसी' वर 'रेडिओ जॉकी' म्हणून निवेदिकेचे काम तिने मिळवले. श्रीधर भावे यांच्या सहकार्याने 'बेधुंद मराठी' नव्या जुन्या मराठी गाण्यांचा कार्यक्रम आठवड्यातून एकदा प्रसारित करण्यास आरंभ केला. अमेरिकेतील मराठी माणसांना त्या कार्यक्रमाने वेड लावले. अश्विनी भावे आणि अर्चना जोगळेकर या मराठी तारकांच्या मुलाखती सादर केल्या. 'एडिसन' हे न्यू जर्सीमधील भारतीय लोकसंख्या सर्वाधिक असलेले शहर आहे. येथे स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन साजरे होतात. 'ईबीसी' रेडिओच्या माध्यमातून अनुजाने महत्त्वाच्या लोकांच्या मुलाखती घेतल्या.

अमेरिकेतील 'असोसिएटेड डिग्री ऑफ टी.व्ही. मीडिया' ही पदवी घेऊन तिने आंतरराष्ट्रीय सामाजिक प्रश्नांवर माहितीपट बनविले. पददेशस्थांना येणाऱ्या अडचणी, कायद्यातील त्रुटी व आवश्यक सुधारणा याबाबत अनेक सूचना या माहितीपटात केल्या आहेत. अमेरिकेतील वकिलांनी आणि कायदेतज्ज्ञांनी त्यांची विशेष दखल घेतली. बिझनेस फिल्म फेस्टिवलमध्ये या माहितीपटाला 'बेस्ट फीचर कॅटेगरी'चे नामांकनही मिळाले.

दुर्धर रोगांनी ग्रस्त तसेच अनेक गरीब, निराश्रित अमेरिकनांना तिने काही एनजीओंच्यामार्फत अर्थसाह्यही मिळवून दिले.

मूर्तिमंत पुरुषार्थ, दानशूर चैतन्य, सूर्यपुत्र कौंतेय
मृत्यूच्या महाद्धारातही जो राहिला 'मृत्युंजय!'




# मृत्युंजय

**शिवाजी सावंत**

**किंमत : ३७५/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

असा हा कर्ण, भीष्माचं पतन होईपर्यंत समरांगणात पायच टाकणार नव्हता! इंद्रानं पूर्वीच त्याची कवच-कुंडलं आपल्या पुत्रासाठी – अर्जुनासाठी म्हणून दानाच्या मिषानं त्याच्यापासून हस्तगत केलीच होती. परशुरामांनी, 'तुला ऐन युद्धप्रसंगी ब्रह्मास्त्र स्फुरणार नाही.' असा मर्मभेदी शाप त्याला दिला होता. महेंद्र पर्वतावरच्या ब्राह्मणाचे 'तुझ्या रथाचं चक्र, भूमीही युद्धात अशीच रुतवून ठेवील!' हे उद्‍गार कोणीही विसरू शकत नव्हतं.

जगात अनेकांनी दान केलं असेल पण – पण मरणाच्या दारातील एवढं चित्तथरारक, उत्तुंग एकनिष्ठ, अजोड दान तो एकटाच करू जाणत होता – पहिला पांडव!
ज्येष्ठ कौंतेय! अजोड दानवीर, सूर्यपुत्र!

## *  युवा नाटककारांना विनोद दोशी स्मृती फेलोशिप

''नव्या मुलांनी त्यांच्या पद्धतीच्या नाटकांसाठी स्वत:चा प्रेक्षकवर्ग तयार केला ही मोठी कामगिरी आहे. आता यापेक्षा रंगभूमीसाठी वेगळे काय करायचे? नव्या मुलांमुळेच नव्या कल्पना येऊ लागल्या. रमणीयार्थम् प्रतिपादनम् हे नाटकाचे मुख्य कर्तव्य दिले; पण हेच रमणीय कधीतरी कडवट असू शकते, हे त्यांनी दाखवून दिले याचे समाधान वाटते.'' अशी भावना ज्येष्ठ नाटककार गो. पु. देशपांडे यांनी व्यक्त केली. साहित्य रंगभूमी प्रतिष्ठानतर्फे युवा रंगकर्मी ओम भूतकर, पर्ण पेठे, उमेश जगताप, श्रुती व्यास आणि गगन रिअर यांना विनोद दोशी स्मृती फेलोशिप देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर, दिग्दर्शक सुनील शानबाग, उपस्थित होते. देशपांडे म्हणाले, ''मराठी नाटकांना पांढरे केस आणि काळे केस असे दोन प्रकारचे प्रेक्षक असतात. त्यात नव्या मुलांच्या नाटकांना पांढऱ्यापेक्षा काळे केस असलेले लोक जास्त असतात ही चांगली गोष्ट. नाटक कधी कधी कालबाह्य होतेच. त्यामुळे पर्यायाने आमच्यासारख्या कालबाह्य होणाऱ्या मंडळींना या नव्या दमाच्या कलाकारांशी शेकहँड तरी करता आला याचा आनंद वाटतो. रंगभूमीवर नव्या कल्पना मांडल्या जाणे आवश्यक आहे. तेच काम हे तरुण रंगकर्मी उत्साहाने करत आहेत.''

''गेल्या काही वर्षांत रंगभूमीवर बरीच हालचाल होऊ लागली आहे. नवे रंगकर्मी नव्या धाटणीचे काम करू बघत आहेत, या फेलोशिपमुळे त्यांना एक ऊर्जा मिळेल. आतापर्यंत फेलोशिप मिळालेले रंगकर्मी चांगले काम करत आहेत याचा आनंद वाटतो,'' असे शानबाग यांनी नमूद केले.

## *  मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय : १७ नव्या शाखा

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या शहर आणि उपनगरात २९ शाखा आहेत. या सर्व ग्रंथालयांची मालकी बृहन्मुंबई महापालिकेकडे आहे. महापालिका या सर्व शाखांना वार्षिक अनुदान देते. मात्र सभासद संख्या कमी झाल्याने वा अन्य कारणाने काही शाखा बंद पडल्या आहेत. म्हणून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने आणखी २२ शाखा सुरू करण्याचे ठरवले आहे. यापैकी १७ शाखांना मान्यताही मिळाली आहे.

या संदर्भात ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह कृष्णकांत शिंदे यांनी सांगितले, की महापालिकेने ग्रंथसंग्रहालयाला 'आम्ही तुम्हाला जागा देतो, तुम्ही नवीन शाखा सुरू करा.' असा प्रस्ताव दिला आहे. या जागा खासगी निवासी संकुलात वा खासगी मालकीच्या आहेत. त्यांचे भाडे व देखभाल हा सर्व खर्च महापालिकेने करावा अशी सूचना आम्ही महापालिकेला केली आहे.

## * राजनीतीसाठी पंचोपाख्यान, शब्दकोशाची निर्मिती

मराठी भाषेच्या प्रचारासाठी आणि प्रतिष्ठेसाठी इंग्रजी राजवटीतील प्रशासकांनी प्रयत्न केले. माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी मुंबईतील छापखान्यात 'पंचोपाख्यान' वगैरे पुस्तके आणि शब्दकोश छापले. तेही १८०५ मध्ये.

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटिश राजवटीतच १८०५ मध्ये मराठीत पहिल्यांदा पुस्तक प्रसिद्ध झाले. मराठी व्याकरण आणि बायबल यांची छपाई बंगाल प्रांतात झाली होती. त्यानंतर मुंबईत निघालेल्या छापखान्यातून एलफिन्स्टन यांनी काही पुस्तके छापून घेतली.

एलफिन्स्टन यांनी सरदार त्र्यंबकराव बापू दाभाडे यांना पाठविलेले एक पत्र नुकतेच भारत इतिहास संशोधक मंडळात मिळाले आहे. १० डिसेंबर १८२२ रोजी हे पत्र पाठविण्यात आले. मोडी लिपीतील पत्रावर सोन्याचा वर्ख आणि त्यांची स्वाक्षरी आहे. पुस्तक छपाईचा चमत्कार इतरांना समजावा, यासाठी पत्रप्रपंच असल्याचा उल्लेखही आहे. मराठीतील पहिली पुस्तके महाराष्ट्राबाहेर छापली गेली आहेत. परंतु, 'पंचोपाख्यान' हे पुस्तक महाराष्ट्रात मराठी देवनागरीत छापण्यात आले होते.

या पुस्तकाची पुढील आवृत्ती पुण्यातच 'ज्ञानप्रकाश'मध्ये छापण्यात आली.

## * मराठी युवापिढी आणि मराठी साहित्य - एक सर्वेक्षण

'महाराष्ट्र टाईम्स'ने मुंबईसह पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर या सहा प्रमुख शहरांत एक सर्वेक्षण केले. त्यासाठी १६ ते २५ या वयोगटातील मुला-मुलींच्या मराठीबाबतच्या माहितीचा, ज्ञानाचा २० प्रश्नांच्या माध्यमातून कानोसा घेण्यात आला. मातृभाषा मराठीवर सगळ्यांचेच मनापासून प्रेम असले तरी त्याबाबतच्या काही महत्त्वाच्या गोष्टींविषयी आजच्या तरुणाईला कितपत माहिती आहे, हे त्यातून जाणून घेण्यात आले.

आळंदी हे गाव संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांसाठी प्रसिद्ध आहे. हे ७९ टक्के मुला-मुलींना पक्के ठाऊक असल्याचे दिसले, साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक आपण वाचल्याचे ७३ टक्के मुला-मुलींनी सांगितले. नाटकावर प्रेम करणाऱ्या मराठी तरुणाईने पाच मराठी नाटकांची नावे झटपट सांगितली खरी; पण नाटककरांची नावे सांगण्यात मात्र ती कमी पडली. भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवणारे दादासाहेब फाळके यांच्यापासून ते ऑस्करवारी करणाऱ्या श्वासपर्यंत मराठी चित्रपटांबाबतची चांगली माहिती त्यांना असल्याचे दिसून आले.

तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करणाऱ्या आजच्या पिढीला 'युनिकोड'विषयी मात्र फारशी माहिती नाही, ही आश्चर्यजनक बाब या पाहणीतून समोर आली. मराठी

ब्लॉग्ज आम्ही आवर्जून वाचतो, असे सांगणाऱ्यापैकी फारच थोड्या जणांना ब्लॉग्जची नावे सांगता आली.

शिवकालात मराठी लिखाणासाठी मोडी लिपी वापरली जात असे, हे ५० टक्के मंडळींनी अचूक सांगितले असले, तरी आजच्या मराठीच्या तीन बोलीभाषा केवळ २६ टक्के मंडळींनाच सांगता आल्या. 'तळे राखेल तो पाणी चाखेल...' या म्हणीचा योग्य तो अर्थ फक्त १९ टक्के तरुणाईला सांगता आला.

चिं. वि. जोशी यांची चिमणराव-गुंड्याभाऊ ही जोडी सहा टक्के तरुणाईलाच ठाऊक असल्याचे, तसेच भा. रा. भागवतांचा 'फास्टर फेणे' केवळ सात टक्के मुला-मुलींनीच वाचला असल्याचे लक्षात आले. 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळविणाऱ्या तिन्ही मराठी लेखकांची नावे फारच थोड्या मुलामुलींना ठाऊक होती.

## * माधुरीची 'ऑनलाइन' नृत्यशाळा

माधुरी दीक्षित यांनी 'ऑनलाइन' नृत्यशाळेचा शुभारंभ केला आहे.

माधुरीच्या या ऑनलाइन नृत्यशाळेचा लाभ कोणालाही, कुठेही सहजपणे घेता येणार आहे. माधुरीकडून नृत्याचे धडे गिरवायचे असतील तर्ि्हमैगू्र्प्ल्ि.म्दस् या संकेतस्थळावर जायचे आणि तुमचे प्रोफाईल तयार करायचे.मग माधुरी स्वत: तुम्हाला नृत्य शिकवताना दिसणार आहे.

'माझ्या आयुष्यात तीन गोष्टींना महत्त्वाचे स्थान राहिले आहे, ते म्हणजे स्वादिष्ट पदार्थ, कपडेलत्ते आणि नृत्य. आपल्या देशात अगदी जनरेटरच्या आवाजाच्या तालावरही नृत्य करणारे लोक आहेत. 'मला इतकी वर्षे नृत्य करताना तुम्ही पाहिलेले आहे. आता तुम्हीही संकेतस्थळावर माझ्याबरोबर या आणि नृत्यकलेचा आस्वाद घ्या. हे सारे जगच आपल्या नृत्यासाठी रंगमंच व्हावे,' असे आवाहन तिने केले आहे.

या संकेतस्थळावर माधुरीने सध्या आपल्या दोन गाण्यांवरचे नृत्य उपलब्ध केले आहे. येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या नृत्यदिग्दर्शकांचे सादरीकरण, नृत्याच्या विविध शैलीही या संकेतस्थळावर अभ्यासता येतील. मोबाईल, आयपॅड अशा कुठल्याही साधनांच्या माध्यमातून नृत्य शिकता येईल.

## * स्मरणरंजनासाठी जुन्या नाटकांची क्रेझ

'सध्याच्या युगात कोणतीही गोष्ट टिकाऊ नाही. नाटकाचा वेळ आणि त्याच्या लोकप्रियतेचा कालखंड कमीच होत जाणार. त्यामुळे रंगभूमी पूर्वीच्या स्वरूपात आता राहणार नाही.' असे मत डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केले.

'अमेय इन्सपायरिंग बुक्स' तर्फे डॉ. वि. भा. देशपांडे लिखित मराठी

नाट्यकोशाच्या हिंदी भाषांतराच्या दोन खंडांचे प्रकाशन डॉ. आगाशे यांच्या हस्ते झाले. रंगभूमीत कालानुरूप बदल होणे अपेक्षित असल्याने भविष्यात प्रेक्षकांना प्रयोग पाहण्यासाठी कदाचित नाट्यगृहात जाण्याचीही आवश्यकता भासणार नाही. त्याऐवजी आयपॉड, इंटरनेटवर नाटकाचे प्रयोग पाहता येतील. 'जुनी नाटके आजकाल पुन्हा नव्याने रंगभूमीवर दाखल होत आहेत. ज्येष्ठ नागरिकांकडे सध्या बऱ्यापैकी पैसा उपलब्ध आहे. त्यामुळे जुन्या नाटकांच्या नव्याने होणाऱ्या प्रयोगांतून त्यांना 'नॉस्टॅल्जिया'चा अनुभव येतो. तर नव्या पिढीला ही नाटके का लोकप्रिय ठरली, हे दाखविता येते,' असे ते म्हणाले.

### * 'नितळ' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

औरंगाबाद येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. स्वाती दंडे यांच्या 'नितळ' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन मराठी विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड यांच्या हस्ते झाले. महिन्याभरात दुसरी आवृत्ती व ब्रेल आवृत्ती असा योग आला. 'या कवितांमुळे इंदिरा संत यांच्या कवितांची आठवण होते.' असे मत डॉ. वाड यांनी व्यक्त केले.

### * 'साहित्य वैभव' दिनदर्शिकेचे प्रकाशन

'गमभन' प्रकाशनातर्फे साहित्यिकांची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे. ग्रेस, जी. ए. कुलकर्णी, दत्ता हलसगीकर, कृ. प्र. खाडिलकर, विद्याधर पुंडलिक , श्री म. माटे यांची छायाचित्रे आणि मागील बाजूस या साहित्यिकांची ग्रंथसंपदा, जन्मदिनांक, पुण्यतिथी यासह माहितीपूर्ण लेख असे 'साहित्य वैभव'चे स्वरूप आहे. या दिनदर्शिकेचे यंदा बारावे वर्ष असून संपादन डॉ. मेधा सिधये यांनी केले आहे.

### * 'एका सत्याचा प्रवास'चे प्रकाशन

ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार यांच्या 'एका सत्याचा प्रवास' या कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर मा. आनंदराव पाटील (उपाध्यक्ष, कृष्णा खोरे प्रकल्प), संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे वगैरे मान्यवर उपस्थित होते. याआधी पोतदार यांचे 'गुंजेचा पाला' आणि 'आक्रीत' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. मुंबई दूरदर्शनचे निवृत्त उपसंचालक भगवंत इंगळे, नेहरू युवा केंद्राचे समन्वयक यशवंत मानखेडकर, कवी धनंजय सोलंकर, न्यायाधीश सुनील वेदपाठक, जयवंत गुजर, प्रभाकर गळंगे, सुभाष दीक्षित इत्यादि मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. सुजित

शेख यांनी सूत्रसंचालन केले.

## * 'लेगसी' पुस्तकाचे प्रकाशन

''मुलगी 'स्पेशल' असते आणि तिच्याबरोबरचे नाते प्रत्येक बापाने 'सेलिब्रेट' केले पाहिजे,'' असे मत झेन्सार टेक्नॉलॉजी कंपनीचे उपाध्यक्ष गणेश नटराजन यांनी व्यक्त केले.

कमिन्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप भार्गव, नारायण मूर्ती, चंदा कोचर, के. व्ही. कामत, माल्लिका साराभाई, शाहीन मिस्त्री, संजीव कपूर, जतीन दास, प्रकाश पदुकोण वगैरे 'सेलिब्रेटी' व्यक्तींनी आपल्या मुलींना लिहिलेल्या पत्रांचे संकलन सुधा मेनन यांनी केले आहे.

नटराजन म्हणाले, ''इंटरनेटद्वारे मी माझ्या मुलीशी दैनंदिन संवाद साधत असतो; पण पत्र लिहिण्याची मजा त्यातून येत नाही. मुलीला पत्र लिहिल्यामुळे त्यांना अधिक समजून घेता येते असा माझा अनुभव आहे. माझी मुलगी मला रोज काहीतरी नवीन शिकवते. तिला समजून घेताना ती सध्याच्या प्रश्नांकडे, जगाकडे कसे पाहते, याची जाणीव मला होते. त्यामुळेच मुलगी 'स्पेशल' असते आणि तिच्याबरोबरचे नाते प्रत्येक बापाने सेलिब्रेट केले पाहिजे, असे वाटते.''

भार्गव म्हणाले, ''कॉर्पोरेट जगतामध्ये पॉवरपॉईट आणि मेमो लिहिण्याची सवय असते; पण आपल्या मुलीला पत्र लिहिताना आयुष्यातील अनेक प्रसंग प्रामाणिक व खंबीरपणे आणि तितक्याच तळमळीने लिहावे लागतात. वडील म्हणून काही प्रसंगी मी विचित्र का वागलो, हे माझ्या मुलीला सांगण्याची संधी पत्रातून मिळाली.''

मेनन म्हणाल्या, ''सध्याची पिढी अनिश्चित वातावरणात वाढत आहे. सोशल नेटवर्किंग साईटवर कोणी आपल्याबरोबरची मैत्री संपुष्टात आणली तर आपला 'हार्ट ब्रेक' होतो. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर इतक्या प्रमाणात वाढला आहे की त्यापलीकडे एक विशाल जग आहे हे आपल्या पाल्याला सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळेच पत्र लिहून आपण आपली काळजी, प्रेम उत्कटतेने व्यक्त करू शकतो.''

## * डॉ. सबनीस यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या 'प्रतिभा संगम', 'विद्रोही काव्य समीक्षा,' 'उपेक्षितांची पहाट,' या पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमाला माजी आमदार उल्हास पवार, 'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रकाश इंगोले, प्राचार्य भाऊसाहेब जाधव, लक्ष्मीकांत देशमुख, प्रा.

एल. जी. सोनावणे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, ''डॉ. सबनीस यांनी मराठवाड्यातील बंडखोर स्वातंत्र्यसेनानी मोहनराव सबनीस पाटील यांच्या शस्त्रसज्ज बुरुजाचा व रझाकाराशी केलेल्या संघर्षाचा इतिहास मांडला आहे.''

## * पर्यावरण पत्रकारितेतील अनुभव

जैवविविधता, भारतीय जंगले, जमिनींचे प्रश्न, वन्य जीवन, हवामान बदल अशा विविध विषयांची माहिती देणारे 'भारतीय निसर्ग-पर्यावरण पत्रकारिता : माध्यमे, सामाजिक संस्था आणि नागरिकांसाठी' हे 'सकाळ प्रकाशना'चे नवे पुस्तक संतोष शिंत्रे यांनी लिहिले आहे. मराठी व इंग्रजी भाषांत हे पुस्तक असून त्यात देशभरात पर्यावरणविषयक चळवळी, जंगले वाचविण्यासाठी महिलांनी केलेले कार्य, 'स्त्रिया आणि पर्यावरण', तसेच पर्यावरणविषयक कायदे, धोरणे आणि शासकीय नियम याबद्दल माहिती दिली आहे. जंगलांविषयीची दुर्मिळ छायाचित्रे, नकाशे आणि इन्फोग्राफिक्समुळे जंगल समजून घेणे रंजक होते. निसर्ग पर्यावरणविषयक शब्दकोशही पुस्तकात आहे.

## * लातूरकर सिद्धार्थची 'ऑस्कर' भरारी

''लाइफ ऑफ पाय' चित्रपटाला ऑस्कर पुरस्कार मिळाला.

'लाइफ ऑफ पाय' चित्रपटातील व्हिज्युअल इफेक्ट ज्या कंपनीने बनविले, त्या 'ऱ्हिदम ॲण्ड ह्यूज'मध्ये सिद्धार्थ लहरीकांत शहा टीम लीडर म्हणून काम करतो.

सिद्धार्थ मूळचा लातूरचा. वडील लहरीकांत शहा प्रसिद्ध चित्रकार आणि हौशी छायाचित्रकार. सिद्धार्थलाही कलेचे बाळकडू घरातच मिळाले. पहिली ते दहावीपर्यंत तो बंकटलाल इंग्लिश स्कूलमध्ये शिकला. शाळेत असताना चित्रकलेची पारितोषिके त्याने पटकावली. पाचवीत असताना सिद्धार्थ हा अतुल देऊळगावकरांबरोबर महाबळेश्वर येथे ट्रेकिंगला गेला. तेव्हापासून त्याला ट्रेकिंगचा छंद जडला.

बारावीनंतर पुणे येथे इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंगला असताना त्याला व्हिज्युअल इफेक्टच्या शिक्षणाची गोडी लागली. त्याने ॲनिमेशनचा 'टूडी' हा अभ्यासक्रम पूर्ण केला. इंटरनेटवरून 'थ्रीडी' अभ्यासक्रमाची माहिती मिळविली आणि चेन्नईच्या इमेज संस्थेची ऑनलाइन परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढचा अभ्यास केला. परिणामी त्याला 'ऱ्हिदम ॲण्ड ह्यूज' या कंपनीत नोकरी मिळाली.

आत्तापर्यंत ४० पेक्षा अधिक चित्रपटांमधील ॲनिमेशन त्याने केले आहे. यापूर्वी 'गोल्डन कंपास' या चित्रपटात दृश्य परिणाम याच श्रेणीत त्याच्या टीमला

ऑस्कर पुरस्कार मिळाला होता.

***     आगळेवेगळे साहित्य संमेलन**

अभिनव कल्पना लढवीत नवनवीन उपक्रमांचे आयोजन करणारे नाट्य व्यवस्थापक अशोक मुळे यांनी एका आगळेवेगळे साहित्य संमेलन गुरुवार, ७ मार्च रोजी दादर येथील शिवाजी मंदिरात भरवले. ज्येष्ठ साहित्यिक ह मो. मराठे या संमेलनाचे अध्यक्ष होते.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत जे उमेदवार अपयशी ठरतात त्यांची साहित्यविषयक भूमिका रसिकांना समजावी ही या संमेलनामागील कल्पना आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रा. प्रतिमा इंगोले, तर उद्घाटक म्हणून न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी उपस्थित होते. साहित्य संमेलनाच्या निवडणुकी दरम्यान मराठे यांनी केलेल्या काही विधानांमुळे बराच वाद झाला होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांची भूमिका समजून घेण्यासाठी 'बोला हमो बोला' मुलाखतीचा कार्यक्रम झाला. विशेष म्हणजे रामदास पाध्ये व अपर्णा पाध्ये यांच्या बोलक्या बाहुल्यांनी हमोंना बोलते केले.

उत्तरार्धात कवी राजा बढे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'किती गोड गोड' हा सांगीतिक कार्यक्रम झाला. श्रीरंग भावे, नीलिमा गोखले, अद्वैता लोणकर, जयंत पिंगुळकर आणि बकुल पंडित यांनी गाणी सादर केली.

***     सर्वांत श्रीमंत भारतीय**

भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्तीचा मान मुकेश अंबानी यांनी सलग सहाव्यांदा मिळविला आहे. त्यांची संपत्ती २१.५ अब्ज डॉलर आहे. मेक्सिकोतील कार्लोस स्लिम हे ७३ अब्ज डॉलरची संपत्ती असणारे उद्योगपती जगात सर्वांत श्रीमंत ठरले आहेत.

'फोर्ब्ज' मासिकाने दिलेल्या सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत स्लिम यांच्या खालोखाल बिल गेट्स (६७ अब्ज डॉलर), स्पेनचे आर्मान्सिओ ऑर्टेगा (५७ अब्ज डॉलर), वॉरन बफे (५३.५ अब्ज डॉलर) आणि लॅरी एलिसन (४३ अब्ज डॉलर) यांचे क्रमांक आहेत. अझिम प्रेमजी, कुमारमंगलम बिर्ला, सुनील मित्तल, शशी रुईया, शिव नाडर, के. पी. सिंह, अनिल अंबानी यांच्यासह भारतातील एकूण ५५ अब्जाधीशांचा 'फोर्ब्ज'च्या यादीत समावेश आहे.

***     प्रा. रामनाथ चव्हाण नाबाद ६०**

'भटक्या विमुक्त जमाती या आपल्या समाजाचाच एक भाग आहेत. परंतु

आपणच त्यांना वेगळे समजून उपेक्षित ठेवले आहे. त्यांचा डोंबाऱ्याचा खेळ आपण पाहतो, मात्र, त्यांना जवळ करत नाही. भटक्यांचेही जग मोठे आहे, त्यांच्यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे,' असे मत भटक्या विमुक्त जमातींचे अभ्यासक प्रा. रामनाथ चव्हाण यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते चव्हाण यांचा एकसष्ठीनिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच 'भटक्या विमुक्तांचे मुक्तचिंतन' या डॉ. बाळासाहेब सोनावणे संपादित पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. ज्येष्ठ विचारवंत मा. प. मंगुडकर, डॉ. रावसाहेब कसबे, या वेळी उपस्थित होते.

'माझ्या सुरुवातीच्या वाटचालीत भटक्या विमुक्तांनी मला खूप मदत केली. त्यांच्या घासातला घास त्यांनी मला दिला. त्यांच्याविषयी मी खूप कमी लिखाण केले आहे,' असे प्रा. चव्हाण यांनी सांगितले.

## * घाशीरामची चाळिशी

नाटककार विजय तेंडुलकर लिखित 'घाशीराम कोतवाल' या नाटकाला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मित्र फाउंडेशनने 'घाशीरामची चाळिशी' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात नाटकाच्या मूळ संचातील डॉ. मोहन आगाशे, चंद्रकांत काळे, रवींद्र साठे, आनंद मोडक, नंदू पोळ, दिलीप जोगळेकर, श्रीराम रानडे, उदय लागू, रमेश मेढेकर, प्रकाश अर्जुनवाडकर, यांच्यासह ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर आणि दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल सहभागी झाले होते. या सर्वांशी सुधीर गाडगीळ यांनी संवाद साधला. नाटकाच्या दुर्मिळ चित्रफिती, गाणी आणि आठवणींची उजळणी झाली या नाटकाच्या यशामध्ये सांघिक कामगिरीबरोबरच तेंडुलकरांच्या लेखणीचा सिंहाचा वाटा असल्याचे नमूद केले.

डॉ. पटेल म्हणाले, 'परदेशात जाण्यावेळी मुख्यमंत्री अतुलेंना भेटण्यासाठी आम्ही गेलो. त्या वेळी सर्वांची ओळख करून देताना हे नानांची भूमिका करणारे मोहन आगाशे असे म्हणताच अंतुले खुर्चीतून उठून उभे राहिले आणि म्हणाले, 'काय हो तुमची ती नजर आणि देहबोली... पहिल्या रांगेत बसलेली माझी बायको घाबरली ना...' पटेलांनी ही आठवण सांगताच प्रेक्षकांत हास्यस्फोट झाला.

'मराठी नाटक परदेशी जाण्याचा पहिला मान 'घाशीराम'ला मिळाला. तत्कालीन मंत्री वसंत साठे यांनी हे नाटक परदेशी जाऊ नये अशी भूमिका घेतली होती; पण कालांतराने परवानगी मिळाली. तीन प्रयोगांसाठी हे नाटक परदेशी गेले आणि पंचवीस प्रयोग करून आले. या नाटकानंतर कोणत्याही अनैतिहासिक नाटकाला असा इतिहास घडवता आला नाही,' असे आगाशे म्हणाले.

## * ‘पारंगत’ सन्मान

मराठी एकांकिका विश्वात मानाचा समजला जाणारा ‘पारंगत’सन्मान महाविद्यालयीन गटात यंदा पुण्याच्या स. प. महाविद्यालयाला ‘प्राणिमात्र’ या एकांकिकेसाठी मिळाला आहे. आरोह वेलणकर (अभिनय), गिरीश दातार (लेखन) व क्षितीश दाते (दिग्दर्शन) हे पुणेकर वैयक्तिक पुरस्कारांचे मानकरी ठरले आहेत.

खुल्या गटात हा मान रंगसंगती कला मंच, मुंबई या संस्थेच्या ‘एकुटसमूह’ या एकांकिकेस मिळाला. अभिनय, कल्याण या संस्थेने सादर केलेली ‘वेडिंग ॲनिवर्सरी’ ही एकांकिका विशेष परीक्षक सन्मानाची मानकरी ठरली. विपुल महागावकर (खुला गट) व क्षितीश दाते (महाविद्यालयीन गट) यांचा ‘पारंगत दिग्दर्शक’ म्हणून गौरव करण्यात आला.

**इतर निकाल**

**खुला गट** : पारंगत लेखक : प्रसाद खांडेकर (जजमेंट डे), पारंगत अभिनेता : आरोह वेलणकर (अनेस्थेशिया),

पारंगत अभिनेत्री भक्ती देसाई (रिश्ता वहीं, सोच नयी).

**आंतरमहाविद्यालयीन गट** - पारंगत लेखक : गिरीश दातार (अनेस्थेशिया), पारंगत अभिनेता : रामचंद्र गावकर (जल्लाद), पारंगत अभिनेत्री : तेजश्री सावंत (एकुटसमूह).

**तांत्रिक :** पारंगत प्रकाशयोजनाकार : अमोघ फडके (कोंडी) पारंगत नेपथ्यकार : रणजित पाटील (रिश्ता वहीं, सोच नयी).

## * कुतूहलापोटी लेखन

‘‘चौदा वर्षांच्या वित्तीय सेवेनंतर मी लेखनाकडे वळलो. कुटुंबात धार्मिक वातावरण असल्यामुळे इतिहास, पुराण आणि त्यातील तत्त्वज्ञानाविषयी मनात कुतूहल होते. भगवान शंकराविषयी पुस्तक लिहावे, असे ठरविले.’’ असे लेखक अमिश त्रिपाठी यांनी सांगितले.

भगवान शिव आणि दैत्य यांच्यावर आधारित या मालिकेतील ‘द इम्मॉर्टल्स ऑफ मेलुहा’ आणि ‘सिक्रेट ऑफ नागाज् ’ ही दोन पुस्तके यापूर्वीच प्रकाशित झाली आहेत. द ओथ ऑफ द वायुपुत्राज हे शिव ट्रायलॉजीतील शेवटचे पुस्तक आहे. त्याच्या सुमारे ४ लाख प्रतींचा खप झाला आहे.

## * ९१४ ग्रंथालयांची मान्यता रद्द

राज्यातील १२ हजार ८६१ ग्रंथालयांच्या तपासणीत पाच हजार ७८४ ग्रंथालये राज्य सरकारच्या अनुदानास पात्र ठरली असून, पाच हजार ७८८ ग्रंथालयांमध्ये

त्रुटी आढळल्या आहेत. तर ९१४ ग्रंथालयांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने ६ मार्च रोजी घेतला.

सरकारी मान्यता असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वंकष पडताळणीचे आदेश राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली राज्यातील सरकारी मान्यता असलेल्या ग्रंथालयांची पडताळणी करण्यात आली. त्याचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे ठेवण्यात आला. सर्व अटी आणि शर्तींची पूर्तता करीत असलेल्या पाच हजार ७८४ ग्रंथालये चालू वर्षीच्या नियमित अनुदानासह ५० टक्के वाढीव अनुदानास पात्र ठरली आहेत. पाच हजार ७८८ ग्रंथालयांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला. त्यांना पुन्हा अनुदान सुरू होईल.

९१४ ग्रंथालयांनी सरकारी अटी आणि शर्तींचा भंग केलेला आहे, त्यांत पुरेशी पुस्तके नाहीत, वाचक ग्रंथालयांकडे फिरकत नाहीत. त्यामुळे त्यांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

पाच हजार ७८८ ग्रंथालयांच्या त्रुटींची पूर्तता झाल्याशिवाय कोणत्याही नवीन ग्रंथालयाला मान्यता; तसेच दर्जात बदल करता येणार नाही. यापुढे प्रत्येक ग्रंथालयाला यूआरडीचा वापर करणेही बंधनकारक राहील.

## * महिलांचा मेंदू पुरुषांपेक्षा सामर्थ्यवान!

महिलांचा मेंदू पुरुषाच्या तुलनेत लहान असला, तरी तो निर्धारित काम पूर्ण करण्यास अधिक सक्षम असल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे.

महिलांचा मेंदू आकाराने पुरुषाच्या मेंदूपेक्षा लहान असतो. या नव्या निष्कर्षामुळे स्त्री-पुरुषाचे वेगळेपण समजण्यास मदत होणार आहे. 'कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी', 'लॉस एंजेलिस युनिव्हर्सिटी' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ माद्रिद' (स्पेन) येथे संशोधकांनी केलेल्या अभ्यासात ही माहिती नव्याने समोर आली आहे.

अभ्यासादरम्यान महिला आणि पुरुषांना समान काम देण्यात आले होते. त्यात महिलांच्या गटाने संबंधित काम पुरुषांच्या तुलनेत मेंदूला पर्यायाने मेंदूतील चेतापेशींना कमी ताण देत, कमी वेळात पूर्ण केल्याचे दिसून आले. या चाचणी प्रक्रियेत १८ ते २७ या वयोगटातील ५९ महिला आणि ४५ पुरुषांनी सहभाग नोंदवला. याशिवाय विशिष्ट प्रकारच्या कामांमध्ये अथवा जबाबदारी पेलण्यामध्ये महिला पुरुषांपेक्षा अधिक सक्षम असल्याचेही दिसून आले.

बदलत्या परिस्थितीची जाणीव ठेवत काम करण्यात महिलांचा हातखंडा असतो. दैवगतीवर विश्वास ठेवून काम उरकण्यात महिलांपेक्षा पुरुष अग्रेसर असतात असे दिसून आले.

३ री आवृत्ती




# ॲडम

**रत्नाकर मतकरी**

**किंमत : २८०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**

'ॲडम' चा नायक वरद याचा जीवनप्रवास थोड्याफार फरकाने बहुसंख्य पुरुषांचा असतो, तसाच आहे. लहानपणी वाटणारे स्त्री देहाविषयीचे कुतूहल, ते नीटसे न शमणे, पुढे असमाधानी स्त्रियांकडून वापरले जाणे, नंतर खरेखुरे प्रेमात पडणे. त्याच्याविषयी प्रेम नसतानाही 'श्यामले'ने सोयीसाठी त्याच्याशी लग्न करणे. आणि कालांतराने आपल्या पहिल्या प्रियकरांशी संबंध ठेवून वरदचे जिणे उद्ध्वस्त करणे, जिला तिच्या मुलांसह विनाअट आधार दिला त्या 'प्रेमा'ने पुढे घरामध्ये वाटा मागणे आणि ज्या 'निर्मले'कडून किंचित्काल प्रेम मिळाले तिलाही अखेर दुरावणे असा वरदच्या प्रेमाचा आलेख आहे.

३ री आवृत्ती




# खेळणी विज्ञानाची

**डी. एस. इटोकर**

**किंमत : ९०/-रु.**
**पोस्टेज : २०/-रु.**

अगदी हसत खेळत व ताण-तणाव बाजूला ठेवून मुलांना विज्ञानाचे शिक्षण देता देता विज्ञानातले सिद्धांतही माहीत करून देण्याच्या उद्देशाने श्री. डी.एस.इटोकर यांनी या पुस्तकाची रचना केली आहे.

विज्ञानविषयक सुमारे पन्नास खेळणी स्वत: तयार करून त्यांच्याबरोबर खेळणे व मित्रांना दाखविणे यात मुलांना आनंद तर मिळेलच, पण त्याचबरोबर त्यांच्या विज्ञानविषयक ज्ञानात भर पडून विज्ञानाची अभिरुचीही वृद्धिंगत होईल.

## * अंटार्क्टिकावर तिरंगा फडकला

'पृथ्वी ग्रह वाचवी' असा संदेश घेऊन गेलेल्या जागतिक अंटार्क्टिका मोहिमेत तरुण भारतीयांनी अंटार्क्टिकावर तिरंगा ध्वज फडकावला.

या पथकातील सदस्य सोनल असगोत्रा हिने म्हटले आहे की,''अंटार्क्टिकाची भूमी परीकथेत शोभावी अशीच आहे.''

पंधरा दिवसांच्या या मोहिमेचे नेतृत्व ब्रिटिश ध्रुवीय संशोधक रॉबर्ट स्वान यांनी केले. अंटार्क्टिका मोहिमेतील एक सदस्य अनुराग मालू यांनी सांगितले की, ''आमच्या पथकात आठ भारतीय होते. आठव्या दिवशी आम्ही भारताचा ध्वज अंटार्क्टिकावर फडकावला. आमच्यासाठी हा महान दिवस होता. ड्रीडफूल ड्रेक पॅसेंज हा खरोखरच कसोटी पाहणारा आहे. आम्ही खुल्या आकाशाच्या खाली पहुडलो होतो. खाली बर्फ होते. वरून तंबूचे आच्छादनही नव्हते. आजूबाजूला सीलचा वावर होता.''

## * गुलजार यांच्या 'देवडी'चे प्रकाशन!

'मैं रिफॉर्मर नहीं, मेरे गीत रेकॉर्डर और रिमाईन्डर का काम करते है' अशी भावना गुलजार यांनी अक्षरधारा बुक गॅलरीत आयोजित अंबरीश मिश्र अनुवादित 'देवडी' या त्यांच्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करताना व्यक्त केली. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक पी. एन. देशपांडे, प्रकाशक अरुण शेवते, अक्षरधाराचे रमेश राठिवडेकर वैगैरे उपस्थित होते. यानिमित्ताने अंबरीश मिश्र यांनी गुलजार यांची मुलाखत घेतली.

एखादी घटना, जाणीव कथेतून व्यक्त करावी की कवितेतून, हे ठरविण्याचे निश्चित निकष नाहीत. अचंबित करणारी बाब कथेतून व्यक्त होते. ठरवून लेखन करणे मला जमत नाही. घुसळत घुसळत मला जे नेमके म्हणायचे ते नवनीत वर आले की मी लिहिण्यासाठी बसतो. कथेचा साचा आणि डोक्यामध्ये साठून राहण्यास वेळ लागतो. ती कथा कागदावर उतरवून काढण्यास वेळ लागत नाही. कवितेसाठी संवेदनशीलता उस्फूर्त असते.

कविता आणि गीत यात भेद करता का, असे विचारताच 'माझ्यामागे चित्रपटांच्या गीतलेखनाचे वलय नसते तर तुम्ही इतक्या संख्येने मला ऐकण्यासाठी आला असता का,' असा प्रतिसवाल त्यांनी केला. 'मी चित्रपटाखेरीजचे जगदेखील पाहतो. चित्रपट गीतांचा दर्जा कमी की जास्त हे सांगता येणे अवघड आहे. कवितेमध्ये माझे विधान, माझे तत्त्वज्ञान. माझे मत आणि बांधिलकी (कमिटमेंट) असते. तर, चित्रपटगीत हे कथा, दृश्य, व्यक्तिरेखा आणि कधी संगीतावरदेखील लिहिले जाते. प्रयत्न, मेहनत आणि कुसर ध्यानात घेता गीतलेखन श्रेष्ठ आहे. पण,

माझे विधान आणि माझी बांधिलकी लक्षात घेतली तर कवितालेखन श्रेष्ठ आहे.'

'कलाकाराचे जीवन हे त्याचे स्वत:चे कधीच नसते. तोही समाजाचाच एक भाग असतो. त्यामुळे तो कोणत्या तरी विचारधारेचा असतो. पण, विचारधारा असणे आणि राजकीय पक्षाची बांधिलकी असणे यामध्ये भेद आहे. मला कोणत्याही पक्षाचा झेंडा हाती घ्यावासा वाटला नाही. प्रसूती वेदना भोगल्या नसल्या तरी मी मातृहृदयी आहे. चित्रपटातून क्रांती होत नाही. त्यामध्ये समाजातील घटनांचेच प्रतिबिंब दिसते. मी तुमच्याच व्यथा, वेदना, आपल्या कविता आणि गीतांतून मांडतो.

### * 'डोंगरापल्याड' सर्वोत्कृष्ट

पायल तिवारी फाउंडेशनतर्फे आयोजित लघुपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ एस. एम. जोशी सभागृहामध्ये पार पडला. या वेळी व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, माजी राज्यमंत्री कृपाशंकर सिंह, काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. अभय छाजेड, दिग्दर्शक महेश मांजरेकर, अभिनेते मनोज तिवारी, शैलेश लोढा, आमदार दीप्ती चवधरी व फाउंडेशनच्या अध्यक्षा संगीता तिवारी वगैरे उपस्थित होते.

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री वर्षा गायकवाड म्हणाल्या, ''मुलींना जगण्याचा हक्क योग्य पद्धतीने शिकविण्याबरोबर समान संधी उपलब्ध करून दिल्यास त्या आई-वडिलांचे नाव मोठे करतील. युवा पिढीमधील सर्जनशीलतेला फाउंडेशनने योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. महोत्सवात महिलांच्या समस्यांवरील काही लघुपट सादर करण्यात आले. हे सर्व लघुपट राज्यभरात दाखवण्याचा प्रयत्न करण्यात येईल.''

तेंडुलकर म्हणाले, ''समाजातील घटनांचा वेध युवावर्गाने लघुपटांमधून घेतला आहे. त्या दृष्टीने सकारात्मक बदल माणसांमध्ये होतात का, हे पाहण्याची गरज आहे. समाजात चांगली माणसे निर्माण करण्याचे काम कलाकारांचे आहे.''

महोत्सवामध्ये अक्षय वारे दिग्दर्शित 'डोंगरापल्याड'ने सर्वोत्कृष्ट लघुपटाचे पारितोषिक पटकाविले; तर द्वितीय पारितोषिक दीपक पाठक दिग्दर्शित 'उमज'ने मिळविले. ॲनिमेशन विभागात प्रकाश शर्मा दिग्दर्शित 'गिफ्ट-द मिसप्लेस्ड'ने बाजी मारली. मोबाईल विभागात 'सेव्ह द गर्ल चाइल्ड' (दिग्दर्शक लोचन शर्मा), 'एन्ड ऑफ पेशन्स' (अनुप देशपांडे) व 'एम विनंती' (धर्मेश जहागीरदार) या लघुपटांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

### * साहित्य संमेलनाची पद्धत बदलणार

''अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पद्धतीत बदल करण्याच्या दिशेने पावलेही उचलली जातील.'' असे मत साहित्य महामंडळाच्या नव्या अध्यक्षा

डॉ. माधवी वैद्य यांनी व्यक्त केले.

साहित्य महामंडळाचे फिरते कार्यालय एक एप्रिलपासून पुण्यात (मसाप) येत आहे. या पार्श्वभूमीवर, गोव्यात झालेल्या महामंडळाच्या बैठकीत डॉ. वैद्य यांची एकमताने महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. प्रा. मिलिंद जोशी यांच्याकडे कार्यवाहपद, तर सुनील महाजन यांच्याकडे कोशाध्यक्षपद सोपविण्यात आले.

## * नेहा रामूचा आयक्यू आइन्स्टाइनपेक्षा अधिक!

ब्रिटनमधील एका बारा वर्षांच्या मुलीच्या हुशारीने भल्याभल्यांना तोंडात बोट घालायला लावले आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे ती मुलगी भारतीय वंशाची असून तिचा आयक्यू (इंटेलिजन्स कोशंट) १६२ आहे. म्हणजे आइनस्टाइन आणि स्टीफन हॉकिंग यांच्यापेक्षाही अधिक आहे.

एका भारतीय डॉक्टर दाम्पत्याची नेहा रामू ही मुलगी. ती सात वर्षांची असताना तिचे आई-वडील ब्रिटनमध्ये स्थयिक झाले. मेन्सा आयक्यू टेस्टमध्ये तिचा आयक्यू तिच्या वयोगटातील सर्वोच्च आहे. या स्कोअरमुळे ब्रिटनमधील सर्वांत हुशार असलेल्या एक टक्का नागरिकांच्या गटात नेहाचा समावेश झाला आहे, असे 'ब्रिटिश मेन्सा'च्या प्रवक्त्याने सांगितले. मेन्सा ही उच्च आयक्यू असलेल्या नागरिकांची संघटना आहे. नेहाची शाळेतील कामगिरी कायमच अत्यंत चांगली आहे. तिने शाळेच्या प्रवेश परीक्षेत २८० पैकी २८० मार्क मिळविले, तेव्हा तिच्यातील वेगळ्या क्षमतेची तिच्या आई-वडिलांना जाणीव झाली.

## * पतीचे वा वडिलांचे नाव लावण्याची सक्ती नको


समाजात अर्धी लोकसंख्यो महिलांची असली तरी त्यांना अजून पाव टक्काही अधिकार मिळालेले नाहीत. मात्र आता महिलांना पतीचे वा वडिलांचे नाव लावण्याची सक्ती करता येणार नाही. तसे केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूद नवीन कायद्यात असणार आहे.

राज्याचे तिसरे महिला धोरण तयार झाले असून ८ मार्चला जागतिक महिला दिनी त्याचा मसुदा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सादर करण्यात आला. परंपरा आणि प्रस्थापित व्यवस्थेला सौम्य धक्के देणारे हे महिला धोरण आहे. शाळेचा दाखला, नोकरीसाठी करावयाचा अर्ज, सरकारी कागदपत्रे यात नावाची नोंद करताना फक्त पती किंवा वडील यांचाच पर्याय दिलेला असतो. त्याला महिला धोरणाने आता छेद दिला आहे.

महिलांना व मुलींना पतीचे की वडिलांचे नाव लावायचे अशी मुभा असली

पाहिजे. सरकारी कागदपत्रांमध्ये तसा नवीन रकाना ठेवला पाहिजे. महिलांना कुठले नाव लावायचे याचे स्वातंत्र्य नाकारल्यास त्याबद्दल थेट जिल्ह्याधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची व त्यावर कारवाई करण्याची शिफारस महिला धोरणात आहे. तंटामुक्ती गाव योजनेत स्त्रियांवरील हिंसाचाराच्या व अत्याचारांच्या गुन्ह्यांचा समावेश करू नये, अशी स्पष्ट सूचना महिला धोरणाने केली आहे. गर्भवती महिलेची एचआयव्ही चाचणी करणे बंधनकारक करावे, असेही सुचविले आहे.


**२ री आवृत्ती**




# मीरेच्या प्रेमतीर्थावर

मूळ लेखक : **ओशो**

अनुवाद : **स्वाती चांदोरकर**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.**

मीरा म्हणजे भक्ती. भक्तीने परमात्मा साध्य करणारे अनेक आहेत आणि तरीही मीरा वेगळी आहे. का?

ओशो सांगतात की भक्तिसाराची इतकी पारदर्शकता मीरामध्ये आहे, की ही पारदर्शकताच तिचं वेगळेपण सिद्ध करते. मीरा कृष्णमय आहे हे कुणी नव्याने सांगायला नको. पण आपण तिची भक्ती बघून मीरामय होऊन जातो हे निश्चित. भक्तिमार्ग हा सर्वांत कठीण मार्ग. न दिसणाऱ्या परमात्म्यावर तन, मन, भान विसरून प्रेम करणं, स्वत:ला त्याच्यावर सोपवून देणं हे कठीणच आणि म्हणूनच मीराचं कृष्णासाठी केलेलं समर्पण अनमोल आहे.

## * अमर चित्रकथांचा खजिना आता मराठीत

अमर चित्रकथा आणि नवता बुक वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने लहान मुलांसाठी मराठीत चित्रकथांचा खजिना आता खुला होणार आहे. पहिल्या टप्प्यात संपूर्ण रंगीत स्वरूपात १२ चित्रकथा प्रकाशित होणार आहेत.

अमर चित्र कथा प्रकाशन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय संपत आणि नवता बुक वर्ल्ड यांच्यात नुकताच करार झाला असून येत्या वर्षभरात शंभरहून अधिक चित्रकथा मराठीत येणार आहेत, अशी माहिती नवता बुक वर्ल्डचे कीर्तीकुमार शिंदे यांनी दिली.

## * स्त्री शक्तीचा सन्मान केल्यास समाजात चांगले बदल

स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे तत्त्व स्वीकारल्यास समाजात चांगले बदल होतील, असे मते राज्याचे सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी महिलादिनी झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.

या वेळी भूलतज्ज्ञ डॉ. संजीवनी इनामदार, पत्रकार राही भिडे, शमा भाटे, किर्तनकार नलिनी कुलकर्णी, ॲड निश्चला जोशी, लेखिका मंगला गोडबोले, विजया वेले यांचा सत्कार करण्यात आला.

राज्य सरकारने महिलांसाठी तिसऱ्या महिला धोरणाचा मसुदा तयार केला आहे, महिलांनी त्याबाबत अभिप्राय नोंदवण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारने त्यासाठी वेबसाइट तयार केली आहे. असे पाटील यांनी नमूद केले.


## * जयमाला शिलेदार यांचा सत्कार

''नाट्यसंगीत क्षेत्रात मौल्यवान कामगिरी करूनही प्रसिद्धीच्या मागे न लागणारं आणि अत्यंत अलिप्त राहणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे जयमाला शिलेदार! त्यांनी कायम कार्य 'सिद्धीस' नेण्याची धडपड केली, 'प्रसिद्धी'ची नाही. यातच त्यांचं मोठेपण आहे.'' असे मत माजी आमदार उल्हास पवार यांनी व्यक्त केलं.

संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका जयमाला शिलेदार यांचा पद्मश्री सन्माना निमित्त कलाद्वयी संस्थेतर्फे चांदीची नटराजाची आणि मोरगावच्या मोरयाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. मंचावर सुनीता खडिलकर, कीर्ती शिलेदार, दीप्ती भोगले आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे महाप्रबंधक पद्माकर देशपांडे उपस्थित होते.

यानंतर जयमाला शिलेदार यांच्या शिष्यांनी सादर केलेली 'मधुमधुरा तव गिरा' ही नाट्यसंगीताची मैफल रंगत गेली. 'जय जय शिव शंकर' या नांदीनंतर 'खरा तो प्रेमा', 'येती कधी यदुवीर', अरे वेड्या मना तळमळसी' वगैरे नाट्यगीतं

आगामी




# उगवतीच्या दिशेला

मूळ लेखिका

**ज्युलिया ग्रेगसन**

अनुवाद

**श्यामल कुलकर्णी**

१९२८

तीन तरुणी भारतात यायला निघतात. प्रत्येकीचे येण्याचे कारण वेगवेगळे असते. नव्या आयुष्याबद्दलच्या अपेक्षा, इच्छा आणि आकांक्षा भिन्न असतात.

रोझचं लग्न बॉम्बेला एका इंग्रज अधिकाऱ्याशी होणार असतं, पण सोबत आई-वडील नसल्याने एका अनोळखी माणसाशी अनोळखी प्रदेशात लग्न करायचा ताण तिच्या मनावर येतो.

इंग्लंडमध्ये लग्न जमत नाही म्हणून व्हिक्टोरियाची आई जोडीदार शोधण्यासाठी तिला रोझसोबत भारतात पाठवते, तर लेखिका होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी विवा आपल्या भूतकाळाची मुळे शोधायला भारतात येते.

बॉम्बेमधील उच्चभ्रू समाज, गरीब वस्त्या, भारतातले इंग्रज, त्यांची भारताबद्दलची मते, तत्कालीन भारतीय समाजाची इंग्रजांबद्दलची मते, भारतीय स्वातंत्र्यलढा अशा व्यापक पार्श्वभूमीवर विणलेला हा कादंबरीचा पट खिळवून ठेवतो.

अतुल खांडेकर,अश्विनी गोखले,मानसी खांडेकर,धनश्री खरवंडीकर यांनी सादर केली.

### *  अध्यक्षपदाची निवडणूक

'साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभा राहिलो, हाच अयुष्यातील सर्वांत मोठा गाढवपणा केला', अशी प्रांजळ भावना ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक ह. मो. मराठे यांनी 'असेही एक साहित्य संमेलन' या कार्यक्रमात व्यक्त केली. गचाळ पद्धतीने होणाऱ्या या निवडणुकीला कायमचा रामराम ठोकत असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

'अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी मी ब्राह्मण आहे. म्हणून मला मतदान करा, असे कधीही म्हटले नव्हते. परशुरामाचा विषय मी उकरून काढला नाही. मीडियानेच त्याबाबत नकारात्मक चर्चा घडवून मी भयंकर जातीवादी असल्याचे माझ्याविरुद्ध कुभांड रचले,' अशी टीका मराठे यांनी केली.

साहित्य महामंडळाच्या निवडणूक प्रक्रियेतील दोषांचाही त्यांनी समाचार घेतला. सध्याची साहित्य संमेलनाची पद्धत बदलून निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपाती व्हवी, असेही ते म्हणाले.

### *  'समज-गैरसमज' पुस्तकाचे प्रकाशन

सुनंदन लेले उत्तम पत्रकार आहेत, तेवढेच उत्तम 'कुक देखील आहेत. माणसे जोडणे हा लेलेंचा स्वभाव आहे. पाकिस्तानातील क्रिकेटच्या सामन्यांचे वार्तांकन करण्यासाठी त्यांनी तेथे एवढी माणसे जोडली, की त्यावर एक पुस्तक लिहावे लागत आहे... असे सांगत क्रिकेटपटू इरफान पठाण याने लेले लिखित 'समज-गैरसमज' या पुस्तकाचे प्रकाशन केले. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे म्हणाले, ''भारत व पाकिस्तानमधील नागरिकांमध्ये शत्रुत्व नाही. दोन्ही देशांतील सरकार राजकीय स्वार्थापोटी शत्रुत्वाचे वातावरण निर्माण करीत आहेत. दोन्ही देशांतील नागरिकांना, सैन्यांना युद्ध नको आहे. कारण युद्ध फक्त जखमा व दु:ख देते. राजकारणाची गरज म्हणून युद्धाच्या विषयावर वाद घातले जातात.''

### *  महिला खेळाडूंचा 'संवाद'तर्फे सत्कार

'सातत्य, प्रामाणिकपणा आणि स्वत्व हे क्रीडापटूचे वैशिष्ट्य असते. दुसऱ्याची नक्कल केली, की स्वत्व हरवते. सरकारने दिलेल्या सुविधांचा पुरेपुर वापर करून स्वत:चा खेळ उंचावण्याचा प्रयत्न करा,' असा सल्ला ज्येष्ठ क्रिकेटपटू' चंदू बोर्डे यांनी तरुण क्रीडापटूंना दिला.

जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला 'संवाद' या संस्थेतर्फे युवा महिला खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. बास्केटबॉलपटू शिरीन लिमये, बुद्धिबळपटू सौम्या स्वामीनाथन, जिम्नॅस्टिकपटू ऋचा दिवेकर, कब्बडीपटू दीपिका जोसेफ, जलतरणपटू आरती घोरपडे, बॅडमिंटनपटू रेवती देवस्थळे, टेबल टेनिसपटू दिव्या देशपांडे, व्हॉलिबॉलपटू ज्योस्त्ना पवार, कुस्तीपटू अंकिता गुंड, ॲथलेटिक्सपटू सोनिया शिंदे आणि अंकिता गोसावी, गोल्फपटू रक्षा फडके, क्रिकेटपटू सोनिया डबीर आणि रोलर स्केटिंगपटू श्रुतिका सरोदे यांचा त्यात समावेश होता. श्री प्रतिष्ठानने २०२४ ची ऑलिपिंक स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून त्यात शालेय स्तरावरील गुणवान खेळाडूंसाठी कार्यक्रमाची आखणी केली आहे. त्याबाबतची माहिती मधुकर तापीकर यांनी दिली. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. नंतर स्त्री भ्रुण हत्येवरील योगेश सोमण लिखित 'स्त्रीसूक्त' नाट्यप्रयोग सादर झाला.

## * 'ग्यान की' (ज्ञानाची किल्ली) ग्रंथालय

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रुजविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या 'रूरल रिलेशन्स' संस्थेतर्फे सुरू करण्यात आलेला 'ग्यान की' ग्रंथालय हा उपक्रम एक हजार गावांमध्ये पोहोचला आहे. देणगीदार महिलांच्या दातृत्वावर बेतलेला हा उपक्रम खेडोपाडी शालेय विद्यार्थिनींच्या माध्यमातून राबविण्यात येतो. या उपक्रमाचा विस्तार आता राज्यातील पाच हजार शाळांपर्यंत करण्याचा मानस प्रदीप लोखंडे यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागातील मुलांमध्ये वाचनाची भूक आहे. पण, त्यांच्यापर्यंत पुस्तके पोहोचत नाहीत हे वास्तव आहे. त्यामुळे 'ग्यान की' म्हणजेच ज्ञानाची चावी या नावाने हा उपक्रम सुरू केला आहे.

या विधायक उपक्रमाला समाजातील अनेकांनी उदार हस्ते मदत केली. त्यामुळे या माध्यमातून किमान तीन लाख विद्यार्थ्यांना वाचन आनंदाचा लाभ होत आहे. प्रदीप लोखंडे म्हणाले, मुलांच्या मनात असलेल्या नाटक, संगीत, कथा, कविता, कादंबरी, इतिहास अशा प्रत्येक विषयाचे किमान एक तरी पुस्तक असावे हा दृष्टिकोन आहे. पाच हजार रुपये देणारा दाता भेटला की त्यातून सहा हजार ४०० रुपये किमतीची पुस्तके मिळू शकतात. 'अग्निपंख', 'बटाट्याची चाळ', 'नापास मुलांची गोष्ट', 'बोक्या सातबंडे', 'श्यामची आई' वगैरे १८२ पुस्तकांचा संच तयार केला असून शाळेसाठी देवघेव वहीदेखील दिली जाते. प्रत्येक पुस्तकामध्ये एक पोस्ट कार्ड घालून हे वाचनालय शाळांपर्यंत पोहोचविले जाते. पुस्तकांचे वाचन करून विद्यार्थ्यांनी ही पुस्तके देणाऱ्या देणगीदाराला पत्र पाठवायचे आहे.

केवळ राज्यातील नव्हे तर, ऑस्ट्रेलिया, इस्त्रायल, फ्रान्स, जर्मनी येथूनही या

उपक्रमासाठी आश्रयदाते लाभले आहेत. मुलांनी वाचावे, लिहावे आणि बोलावे हाच या उपक्रमागचा मुख्य उद्देश आहे.

### * विद्यार्थ्यांना मोफत संगणक

विद्यार्थ्यांना अडीच हजारात संगणक देण्याची योजना महाराष्ट्र सरकारची घोषणा अजून चाचपडत आहे, पण तामिळनाडू, उत्तर प्रदेश, सरकारने त्याप्रमाणे प्रत्यक्ष वाटप सुरू केले आहे.

उत्तर प्रदेश सरकारने बारावी उत्तीर्ण झालेल्या आणि पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १४ इंचाचा डिसप्ले आणि २ जीबी अंतर्गत स्मृती असणाऱ्या एचपी पॅव्हिलियन नोटबुक टॅब्लेट संगणक देण्याचे ठरवून एचपी (ह्युलेट पॅकार्ड) या संगणक प्रिंटर क्षेत्रातील अग्रण्य उत्पादक संस्थेला २८०० कोटी रुपयांची दणदणीत ऑर्डर दिली आहे. प्रत्येक टॅब्लेटची किंमत १९ हजार ५८ रुपये आहे. सात महिन्यांत पूर्ण पुरवठा करण्याचे बंधन आहे. कुठल्याही राज्यसरकारने एवढी मोठी ऑर्डर एकाच वेळी आजवर संगणक पुरवठ्यासाठी नोंदवलेली नव्हती. तामिळनाडूमध्ये गेल्या वर्षी लेनोव्हा या कंपनीला ९ लाख लॅपटॉप्सची २०० कोटींची ऑर्डर देण्यात आली होती. हे संगणक पदवीधर तरुणांना वितरित करण्यात आले. या संगणकांच्या देखभालीसाठीही वेगळा करार केलेला आहे. लेनोवा, एसर, एचसीएल, एच पी, इन्फोसिस्टिम्स वगैरे कंपन्यांमध्ये याबाबत तीव्र स्पर्धा आहे.

उत्तर प्रदेशात या योजनेद्वारे संगणक वाटप सुरू झाले असून काही लाभार्थी हे संगणक सात हजार रुपयांना विकून टाकत आहेत अशा बातम्या आल्याने विद्यार्थ्यांना तसे करण्यास मज्जाव करण्यात येत आहे. तसे प्रतिज्ञापत्र भरून देण्याची सक्ती असून त्याबाबत वेळोवेळी तपासणी करण्यात येणार आहे.

एचपी कंपनी ही संगणक प्रिंटर क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था असून प्रिंटरच्या किमतीवर विशेषत: त्यासाठी लागणाऱ्या टोनरवर नियंत्रण ठेवते. प्रिंटरच्या क्षेत्रात मोजक्याच कंपन्या असल्याने एक प्रिंट काढण्यासाठी एक रुपया खर्च व्हावा अशा प्रकारे टोनरची किंमत राहावी असे त्यांचे मक्तेदारीचे अलिखित धोरण राहिलेले आहे. ३००० ए-फोर प्रतींना पुरेल एवढ्या टोनरची किंमत तीन हजार रुपयांच्या आसपास असते. रिफिलसाठी ३०० रुपये लागतात. प्रिंटरच्या टोनरच्या किंमती या आधीपासूनच चढत्या राहिल्या आहेत.

उत्तर प्रदेशाच्या मोठ्या ऑर्डरमुळे यंदा एचपीला दणदणीत फायदा अपेक्षित आहे. महाराष्ट्र सरकारचा स्वस्तातील टॅब्लेट अजून तरी अपेक्षेप्रमाणे तयार झालेला नाही. डॉ. विजय भटकर वगैरे त्याबाबत काही चमत्कार करतील या आशेवर

अधूनमधून वक्तव्ये करून तेवढेच नाव पेपरात छापून आल्याची संधी घेण्यात काही नेते खूष आहेत एवढेच!

### * शक्तिमान संपादक : अरनॉल्ड श्वात्झनेगर

गेली चार दशके आपल्या दरएक चित्रपटागणिक जगभरातील व्यायामशाळांमध्ये तरुणांची गर्दी उभारणारा, नेत्रदीपक शरीरसौष्ठवाची स्वप्ने पाहणाऱ्यांना आदर्श ठरणारा आणि अभिनेता ते नेता अशी बलदंड कारकीर्द गाजवणारा हॉलीवूड स्टार अरनॉल्ड श्वात्झनेगर आता वास्तव आयुष्यातील आणखी एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. 'मसल अ‍ॅण्ड फिटनेस' व फ्लेक्स मॅगझिन' या मासिकांच्या व्यवस्थापकीय संपादकपदाची धुरा आता त्याने स्वीकारली आहे.

या शरीरसाधना मासिकांच्या मुखपृष्ठवर ६० हून अधिक वेळा झळकलेला आरनॉल्ड शरीरसौष्ठवासंबंधी लेख, सदर आणि सल्ला आदींचा खजिना उपलब्ध करून देणार आहे. या मासिकाने त्याच्या मनात शरीरसौष्ठवाचे वेड रुजवले.

सहा वेळा मिस्टर ऑलम्पिया हा किताब पटकावणाऱ्या ऑस्ट्रियाच्या अरनॉल्ड श्वात्झनेगरने १९७६ मध्ये शरीरसौष्ठव स्पर्धांना रामराम ठोकून हॉलीवूडचा रस्ता धरला. इंग्रजी समस्येवर माते करून केवळ आपल्या देखण्या शरीरसंपदेच्या बळावर हॉलीवूडमध्ये ताग धरत त्याने अ‍ॅक्शनपटांना नवे परिमाण प्राप्त करून दिले. तो अर्थशास्त्रामध्ये उच्चविद्याविभूषित आहे. हॉलीवूड गाजविल्यानंतर कॅलिफोर्नियात सलग दोन वेळा तो गव्हर्नर होता.

### * डॉ. आनंदीबाई जोशी पुण्यतिथी

राजा केळकर संग्रहालयात दि. २६ फेब्रुवारी रोजी डॉ. आनंदबाई जोशी यांची १२६ वी पुण्यातिथी साजरी झाली. अमेरिकेला जाऊन एम. डी. डॉक्टर होऊन आलेली पहिली मराठी स्त्री म्हणून त्या ओळखल्या जातात. श्याम भुर्के यांनी त्यांची माहिती दिली. प्रा. सरोज देशमुख आणि अश्विनी पटवर्धन यांनीही आपले विचार मांडले.

### * मराठी लेखकाची इंग्रजी कादंबरी

पुण्यात राहणारे मराठी लेखक श्रीनिवास शारंगपाणी यांच्या 'अवर डिस्टंट कझिन्स' या इंग्रजीतील वैज्ञानिक कादंबरीचे नुकतेच जर्मनीमध्ये प्रकाशन झाले.

गेली १५ वर्षे या कादंबरीचे लेखन चालू होते. या कालखंडात रशियाचे विघटन आणि जर्मनीचे एकत्रीकरण झाले. विज्ञानविषयक संकल्पना बदलत गेल्या. अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना जर्मनीतील प्रकाशनाने 'आपले लेखन पाठवावे',

असे सुचविले. त्यानुसार ३० जानेवारी रोजी त्यांनी कादंबरीची संहिता पाठविली १६ फेब्रुवारी रोजी कादंबरी प्रकाशितही झाली. 'षड्यंत्र' या आपल्या पहिल्या मराठी कादंबरीचा त्यांनीच 'मॅनिप्युलेशन' हा इंग्रजी अनुवाद केला होता.

अश्विनी या भारतीय वीरांगनेसह सहा देशांमधील अंतराळवीर मंगळावर शोधमोहिमेसाठी जातात. तेथील गुहांमध्ये राहणाऱ्या लोकांशी संवाद साधत जुळवून घेतात. माणसामाणसांतील नातेसंबंध, भावबंध, हेवेदावे, निसर्ग आणि उत्क्रांतीमधील टप्पे, पृथ्वीवरील लोकांची कट-कारस्थाने, राजकारण अशा बारकाव्यांनिशी ही कादंबरी फँटसीसोबतच संभाव्य वैज्ञानिक शक्यता वर्तविते.

***   कित्येक आठवडे चार्ज राहणाऱ्या 'स्मार्ट फोन'**

फोन कितीही 'स्मार्ट' असला तरी चार्जिंग संपून तो निकामी होण्याची भीती कायम राहते. काही तास, काही दिवस नाही तर चक्क काही आठवडे अखंडित चालत राहणाऱ्या 'स्मार्ट' बॅटरीच्या स्मार्ट फोनची निर्मिती करण्यात आली आहे. बार्सिलोना येथे भरलेल्या जागतिक मोबाइल परिषदेमध्ये या स्मार्ट फोनने सर्वांना सुखद धक्का दिला. इलेक्ट्रॉनिक पेपर बनविणाऱ्या 'ई इंक' या कंपनीने 'अॅण्ड्राईड ऑपरेटिंग सिस्टीम (टच स्क्रीन) वर चालणारे दोन स्मार्ट फोन सादर केले.

❐


नवे कोरे


**फ्रँकलिनची नवीन पुस्तके**




**फ्रँकलिन आणि हॅरिएट**





**फ्रँकलिनचा गुप्त क्लब**




**फ्रँकलिनची ख्रिसमस भेट**



# वपुंनी दिलेला कथाकथनाचा मंत्र

'व. पु. काळे' नावाचं लखलखीत झळाळीचं नाणं. जनतेचं, खास करून मध्यमवर्गीयांचं लाडकं. वाचक आणि श्रोते यांच्याकडून पसंतीच्या अगणित पावत्या मिळालेलं. 'प्लेझर बॉक्स'मधेही न मावणारं.

वपु असं नाव काढलं तरी खडा मारून मधमाशांचं मोहोळ उठवावं अशा आठवणी रुंजी घालतात. वपुंच्या आठवणींची अनेक पिसं माझ्या हातांत आहेत. पण एक पीस मात्र मोरपिसांहूनही अधिक मोहक आहे. मखमलीपेक्षा हळुवार. चंदनापेक्षाही सुगंधी. आणि त्याच्या एकमेव साक्षीदार आहेत माधुरी भागवत.

चौदा वर्षांपूर्वीची संध्याकाळ. गडकरी रंगायतनला वपुंचा कथाकथनाचा कार्यक्रम होता. नेहमीप्रमाणेच कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी त्यांना भेटले. त्यावेळी ते म्हणाले, ''मी सध्या ठाण्यातच आहे. उद्या चार वाजता माधुरीच्या घरी ये. मी निवांत आहे. काय ते उद्याच बोलू.'' तो दिवस होता. दि. ४ एप्रिल १९९९.

मी ठरल्यावेळी ठाण्यांत पोचले. माधुरीनं दार उघडलं. मी अधीरतेने विचारलं, ''बापू कुठं आहेत?''

''आत तर ये आधी. ठाण्यातच ईस्टला गेलेत. ओशोंवरच्या पुस्तकाचं काम चाललंय ना! येतीलच. त्यांना तुझी वेळ माहीत आहे.''

मी पाणी घेईपर्यंत बापू आले. वेळेचे पक्के. म्हणाले, ''फार वेळ बसावं लागलं का? लोकांनी वेळ पाळावी असं जर मला वाटतं तर मी वेळ पाळायलाच हवी. आमचे अण्णा (पु. श्री. काळे) नेहमी म्हणत, 'लोक घड्याळ घालतात पण वेळ पाळत नाहीत. आम्ही घड्याळ घालत नाही पण वेळ पाळतो. आता बोला.'

मी म्हटलं, ''बापू, काय काय सांगू? पण एक गोष्ट खरी की तुम्ही मला लिहितं केलंत.''

''मी नाही समजलो.''

''चार वर्षांपूर्वी मी तुम्हाला म्हटलं होतं की तुमच्या काही कथा मला कथाकथनासाठी लेडी ओरिएंटेड करून देता का? तुम्ही स्वच्छ सांगितलंत की आपली कथाच आपण सांगावी. आज लोक इतरांच्या कथा सांगतात. चूक नाही ते. पण शक्यतो कथाकथनकारानं आपलीच कथा सांगावी असा 'अलिखित' नियम आहे. तुला लिहिता येतं. मग तुझ्याच कथा सांग. कालमानाप्रमाणे बदल करून, समोरचा प्रेक्षकवर्ग पाहून आपण आपली कथा गाभा तोच ठेवून बदलून सांगू शकतो. हा फायदा दुसऱ्या लेखकाला मिळत नाही. म्हणून तू स्वत: लिही.''

ते शब्द मनात पक्के बसले आणि जिद्दीने लेखन सुरू केले. आज बऱ्यापैकी यश लेखनात आणि कथाकथनात जे मिळालंय ते वपु यांच्या मुळे. (चार कथासंग्रह आणि ६०० हून अधिक कथाकथनाचे देश-परदेशात कार्यक्रम.)

''बापू, निदान लेखनाच्या, कथनाच्या काही टिप्स तरी द्या.''

त्यावर ते त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनं हसून म्हणाले, ''अगं ती काय अक्षता आहे का हातावर ठेवायला! विचार उत्स्फूर्त असतात. उपजत असतात. लेखन ही कृती असते. घटना दिसली, कथानक सुचलं अथवा बीज मिळालं की घारीसारखं टिपायचं आणि मोर पिसारा फुलवतो तसं ते फुलवायचं. पण लक्षात ठेव की, लेखन फुलोरा वेगळा आणि कथन फुलोरा वेगळा.''

'आपल्या कथेचे नाव आपण आधी सांगू नये. कारण ते बीज मनात ठेवून लोक कथा ऐकतात.'

'उद्या आपली कथा कुणीही सांगो, कशीही सांगो. त्या कथेचं मूळ घट्ट असलं पाहिजे.'

'लोक काहीही म्हणोत, त्यांच्याकडे लक्ष द्यायचे नाही. करायचं ते करा. लिहायचं ते लिहा.'

'कथेचा प्रारंभ आणि शेवट नीट लक्षात ठेवा.'

अशा अनेक गोष्टी सांगितल्या आणि म्हणाले, ''आता १०० कार्यक्रम झालेत ना तुझे? तुझी एक कथा सांग. मी आणि माधुरी दोन श्रोते आहोत. बोल.''

मी गांगरले. या 'एव्हरेस्ट' समोर आपण कथा सांगायची? माझा अर्जुन झाला होता. पण आता पळ काढणं शक्य नव्हतं. मी माझी 'कळत-नकळत' कथा नाव न सांगता २५ मिनिटं सांगितली. कथा सांगत असताना एका गोष्टीचं प्रत्यक्ष शिक्षण त्यांनी दिलं आणि ते म्हणजे 'कथा ऐकावी कशी!'

कथा पूर्ण करून मी त्यांच्यासमोर बसले. माझ्या घशाला कोरड पडली होती. तोंडी परीक्षा झाल्यावर निकालासाठी बसलेल्या मुलासारखी माझी स्थिती झाली होती. मी तणावपूर्ण आणि समोरच्या खुर्चीत दोन्ही पाय वर घेऊन उजव्या हाताच्या मुठीवर आपली हनुवटी टेकून मिश्किल हसत वपु बसलेले. ''ही बर्फी खा. माधुरीनं केलीय. निकाल कळला ना! आता मी सांगतो ते ऐक.''

''कथाकथन सवयीनं चांगलं करायला येऊ लागतं. आत्मविश्वासानं फुलत जातं. प्रसंगावधानानं त्यात बदल करता येतात. ती जाण मात्र असावी लागते. आणि लक्षातच ठेवायचं असेल तर हे लक्षात ठेव की चेहऱ्यावरची गंभीरता हटली तरी फारसं काही बिघडत नाही, पण चेहरा हसरा हवा. हास्य गमावलं की माणूस आयुष्यात बरंच काही गमावून बसतो. हा माझा संदेश नाही. हा ओशोंचा संदेश आहे.''

त्या क्षणी मला जाणवलं की लोकांच्या मालावर आपलं लेबल चिकटवून माल विकणारा हा व्यापारी नव्हता. तर निखळ चिंतन आणि कमालीची प्रामाणिकता हाच तर यांच्या लेखनाचा आणि कथनाचा पाया होता.

इतरही गप्पा झाल्या. मी निघाले तशी म्हणाले, ''जरा बस. तू सांगितलेली तुझी कथा आता मी कशी सांगतो ते ऐक.''

मी जागच्याजागी उडालेच. माझी कथा यांच्या मुखातून ऐकायची? ताबडतोब?...

माझी कथा वेगळ्याच रंगात रंगत गेली. आजुबाजूला काय चाललंय कळत नव्हतं. कथेच्या गाभ्याला धक्का न लागता मोरपिसाऱ्यासारखी कथा फुलत होती. जिन्यातून उतरताना, रस्त्यावर चालताना आणि शेवटी समर्थभांडारच्या कोपऱ्यावर उभं राहून कथा त्यांनी पूर्ण केली. आतून मी इतकी फुलले होते की माझा गुलमोहोर झाला होता. माझी २५ मिनिटांची कथा त्यांनी ३५ मिनिटं फुलवली, खुलवली होती.

हे भाग्य कितीजणांना मिळालं असेल या विचारात मी घरी आले.

आपलीच कथा संपूर्ण ऐकल्यावर वेगळ्या टिप्सची गरज नव्हती.

नाट्य हवं पण नाटक नको.  अभिनय हवा पण अभिनेता नको.

स्मरण हवं पण पाठांतर नको हे त्यांचेच तीन मूलाधार त्यांनी मला शिकवले. आज जे काही थोडंफार यश मिळालंय त्यामागे संपूर्ण प्रेरणा वपुंचीच आहे...

१० जूनला तुम्हाला भेटले. ३० जूनला येण्यासाठी मला आमंत्रण दिलंत. पण तो दिवस उगवलाच नाही. विधात्याने तुम्हाला २६ जूनचं निमंत्रण दिलं होतं. 'नियती तिला हवे तेच करते' या वाक्यावर तुमचा गाढ विश्वास. तो सार्थ झाला. तुमच्या फोटोतील तुमचे नुसते डोळे पाहिले तरी पाडगावकरांच्या ओळींचे स्मरण होते. तेच एक सत्य आहे.

आत आपुल्या झरा झुळझुळे निळा निळा स्वच्छंद<br>
जगणे म्हणजे उधळीत जाणे हृदयातील आनंद!

**माधवी घारपुरे**

'ट्यूलिप' १४०१. बिल्डिग नं. ८, एव्हरेस्ट वर्ल्ड, कोलशेत रोड,<br>
ठाणा - पश्चिम, मो. - ९८१९०३५७१२




***   सुगतकुमारी यांना सरस्वती सन्मान**

ज्येष्ठ मल्याळी कवयित्री सुगतकुमारी यांना प्रतिष्ठेचा 'सरस्वती सन्मान' पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्यातील मानाचा समजला जाणारा के. के. बिर्ला फाउंडेशनचा हा पुरस्कार सुगतकुमारी यांना 'मनलेझुथू' या कविता संग्रहासाठी मिळाला आहे. घटनेच्या आठव्या परिशिष्टात नमूद केलेल्या कोणत्याही भाषेत गेल्या १० वर्षातील उल्लेखनीय साहित्यासाठी दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. १० लाख रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. भारताचे माजी सरन्यायाधीश आर. सी. लाहोटी हे या वर्षीच्या निवड समितीचे अध्यक्ष होते.

***   ज्येष्ठ समीक्षक डॉ. रसाळ यांना साहित्य संस्कृती मंडळाचा पुरस्कार**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे दिला जाणारा 'गौरवमूर्ती' पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर नरहर रसाळ यांना देण्यात आला. ५० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

यापूर्वी डॉ. रसाळ यांनी साहित्य अकादमीमध्ये मराठी भाषेचे प्रतिनिधित्व केले. मराठवाडा साहित्य परिषदेचा पहिला जीवनगौरव पुरस्कार त्यांना देण्यात आला. त्यांना पद्मजा बर्वे साहित्य समीक्षा, चारठाणकर प्रतिष्ठान, राज्य शासनाचा आदर्श शिक्षक, प्रा. रा. श्री. जोग आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

गेल्या ५६ वर्षांपासून ते मराठी वाङ्मयाची समीक्षा करीत आहेत. साहित्यविषयक लेखन, समीक्षा लेखन, संपादनात त्यांचा हातखंडा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात त्यांनी विभागप्रमुख म्हणून काम केले आहे.

## * सीतांशू यशश्चंद्र यांना 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार'

गुजरातचे ज्येष्ठ साहित्यिक सीतांशू यशश्चंद्र यांना नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार १० मार्च रोजी प्रदान करण्यात आला. कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे यांनी सांगितले की, या पुरस्काराचे यंदाचे हे चौथे वर्ष असून रुपये एक लाख, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यशश्चंद्र यांचे ओडिसीएसू हलेसू, जटायू, वखार आणि मोहेनजोदाडो हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. यशश्चंद्र यांनी प्रायोगिक आधुनिकतावादाची भूमिका स्वीकारून गुजराती कवितेला नवे परिमाण मिळवून दिले आहे. उपरोधिक, तल्लख लेखणीचा शिडकावा असलेली यशश्चंद्र यांची शैली गुजरातेत लोकप्रिय आहे. ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके, लोकवाङ्मय गृह प्रकाशनचे संपादक सतीश काळसेकर, प्रा. डॉ. दिलीप धोंडगे यांची निवड समिती होती. या आधी कन्नड भाषेतील कवी जयंत कैकीनी, हिंदीतील ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत देवताले, मल्याळी साहित्यिक डॉ. के. सच्चिदानंदन या साहित्यिकांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पुरस्कार सोहळ्याच्या पूर्वसंध्येला झालेल्या कविसंमेलनात वसंत डहाके, सतीश काळसेकर, प्रा. दिलीप धोंडगे, ऐश्वर्य पाटेकर, विलास पगार, प्रशांत केंदळे हे सहभागी झाले होते. 'समकालीन गुजरातील कविता' आणि 'समकालीन मराठी कविता' या विषयावरील परिसंवादात सुषमा करोगल, वसंत पाटणकर आणि रणधीर शिंदे यांनी भाग घेतला.

## * मराठी चित्रपटांना 'प्रभात पुरस्कार'

मराठी चित्रपटांतील कामगिरीसाठी या वर्षापासून 'प्रभात' कुटुंबियांच्या वतीने कलाकार व तंत्रज्ञांना 'प्रभात पुरस्कारां'नी गौरविले जाणार आहे. मुंबई येथे झालेल्या समारंभात या पुरस्कारांच्या व निवडप्रक्रियेच्या स्वरूपासह या वर्षाच्या कार्यक्रमांची घोषणा करण्यात आली. प्रभात फिल्म कंपनीचे संस्थापक विष्णुपंत दामले यांचे पुत्र पंडितराव दामले व यशवंतराव दामले यांच्या हस्ते सन्मानचिन्हाचे अनावरण या वेळी करण्यात आले. ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पुरस्कारांच्या ठै.ज्रैूज्लै ठ्ठ.म्दस्त्र या संकेतस्थळाचा अधिकृत आरंभ केला, तर ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकरांच्या हस्ते 'प्रभातगीता'चे लोकार्पण करण्यात आले.

१ जानेवारी १२ ते ३१ डिसेंबर १२ या कालावधीत सेन्सॉरसंमत झालेले मराठी चित्रपट या पुरस्कारांसाठी पात्र आहेत. पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा व वितरण १ जून या 'प्रभात'च्या वर्धापनदिनी पुण्यात नृत्यसंगीत सोहळ्यात होणार आहे.

भारतीय चित्रपटांच्या शताब्दी वर्षापासून 'प्रभात' परंपरेतल्या नव्या प्रतिभावंतांना प्रोत्साहन देण्याचा यामागे हेतू आहे. प्रभात चित्रपटांप्रमाणेच 'प्रभात पुरस्कार'ही मराठी माणसाला आपले वाटावेत, अशी अपेक्षा आहे.

## * महाराणी ताराबाई पुरस्कार

''जातीयतेच्या अस्मिता फणा काढत आहेत. युद्धखोरी, चंगळवाद आपल्याला भयग्रस्त परिस्थितीत ढकलतो आहे. त्यामुळे संवेदनशील माणसांनी एकत्र येऊन हे प्रश्न समजावून घेतले पाहिजेत,'' असे मत कामगार नेत्या मुक्ता मनोहर यांनी व्यक्त केले.

शिवस्फूर्ती प्रतिष्ठानतर्फे 'शिवस्पर्श दशकस्फूर्ती महोत्सव' साजरा झाला.

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते मुक्ता मनोहर यांना 'महाराणी तारामणी पुरस्कार'; तसेच शाहीर संभाजी भगत यांना शिवपुत्र छत्रपती शंभूराजे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबा आढाव, संपतराव साबळे, ज्ञानेश्वर मोळक, त्यांच्या पत्नी शैलजा, आई सरस्वती उपस्थित होत्या.

## * किशोरी आमोणकर यांना भीमसेन जोशी पुरस्कार

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने देण्यात येणारा पहिलाच भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार गानसरस्वती किशोरी आमोणकर यांना जाहीर करण्यात आला आहे.


भारतीय शास्त्रीय गायन व वादन क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतास हा पुरस्कार देण्यात येणार असून, ५ लाख रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री संजय देवतळे यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक कार्य प्रधान सचिव, पं. प्रभाकर कारेकर, पं. सुरेश तळवलकर, पं. उल्हास बापट, शशी व्यास आणि अमर धनेश्वर यांच्या समितीने आमोणकर यांची निवड केली आहे.

## * विद्या बाळ यांना 'समाज शिक्षक पुरस्कार'

''शिक्षणक्षेत्राचे रूपांतर उद्योगात झाले आहे. त्यामुळे हल्ली पदव्या विकत देता-घेता येतात. शिक्षण पद्धतीसुद्धा केवळ परीक्षांभोवती फिरत आहे. अशा प्रकारच्या शिक्षणातून 'जगावे कसे' हे विद्यार्थ्यांना शिकवलेच जात नाही,'' अशी खंत सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी व्यक्त केली.

कृ. ब. ऊर्फ अण्णा तळवलकर मेमोरिअल ट्रस्टतर्फे देण्यात येणारा 'समाज शिक्षक पुरस्कार' सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते बाळ यांना प्रदान

**४ थी आवृत्ती**




# केल्याने होत आहे रे...

**संजीव परळीकर**

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.**

नशीब आणि प्रारब्ध हे नेहमीच वादातीत विषय मानले जातात. बरेच प्रयत्न करूनसुद्धा जेव्हा एखादी गोष्ट मिळत नाही तेव्हा नशिबाला आपण खुशाल दोष देऊन मोकळे होतो. पण खरंच नशीब घडवता येतं का?

नशिबाला दोष देणं योग्य आहे का? यशस्वी लोकांच्या नशिबातच यश लिहिलेलं असतं का? ह्या प्रश्नांची उत्तरं मला माहीत नाहीत, पण नशीब घडवण्यासाठी काय करायला पाहिजे, कोणता दृष्टिकोन अंगीकारायला पाहिजे, कशावर श्रद्धा ठेवायला पाहिजे, कोणत्या ठिकाणी धाडस करायला पाहिजे, कोणती कौशल्यं शिकायला पाहिजेत हे मला कळलेलं आहे.

ते मी ह्या पुस्तकात माझ्या अनुभवावरून लिहिलेलं आहे.

तुम्ही जर हे वाचलंत, तर तुमचंही नशीब त्यामुळे बदलून जाईल.

करण्यात आला.

स्वत:च्या अंधत्वावर मात करून इतर अंध मुलांना शिक्षण देणाऱ्या सकिना बेदी यांना 'सेवाव्रती पुरस्कार', डॉक्टरांना उपयोगी पडणारी उपकरणे तयार करणारे मुधकर गोखले यांना 'अनुकरणीय उद्योजक पुरस्कार', पत्रकार अभिजित घोरपडे यांना 'अवनी मित्र पुरस्कार' या वेळी देण्यात आले.

बाळ म्हणाल्या, ''स्त्री-पुरुष समानता, जातिअंत, शिक्षण यासंदर्भातील विचारधन लोकांपर्यंत पोचविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. या कार्यात मला अनेकांचे सहकार्य मिळत आहे. त्या सर्वांचा हा गौरव आहे, याचा मला आनंद आहे.'' प्रभुणे म्हणाले, '' स्त्री-पुरुषांची वाटचाल बरोबरीने व्हायला हवी. पण, तशी ती होताना दिसत नाही. अन्याय, अत्याचारासंदर्भात पुरुषांची मानसिकता फारशी बदललेली नाही. स्त्रियांवरील अत्याचार वाढतच आहेत. अशा स्थितीत एकत्र येऊन गांभीर्याने विचार व्हायला हवा.'' श्रीकांत कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

## * पं. रामनारायण यांना ओ. पी. नय्यर पुरस्कार

केवळ औदासीन्य आणि दु:ख व्यक्त करणाऱ्या गीतांमधील वाद्य एवढीच सारंगीची ओळख आहे. पण, वास्तव तसे नाही. रसिकांना शतपटीने सुरांचा आनंद देणारे हे वाद्य सारंगी नाही तर 'सौ-रंगी' आहे, अशी भावना शास्त्रीय संगीताच्या मैफलीमध्ये सारंगीला स्वतंत्र स्थान मिळवून देणाऱ्या ज्येष्ठ सारंगीवादक पं. रामनारायण यांनी व्यक्त केली.

'श्रुती' संस्थेतर्फे पं. रामनारायण यांना ३ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ओ. पी. नय्यर पुरस्काराने गौरविण्यात आले.

पं. रामनारायण म्हणाले, ''संगीताला सीमा नसते. त्याचप्रमाणे संगीत ही कोणत्याही देशाची मक्तेदारी नाही. संगीत ही आध्यात्मिक स्वरूपाची जागतिक भाषा आहे. ही भाषाच मी आयुष्यभर अबोलपणे बोलतो आहे. उस्ताद अब्दुल करीम खाँ, उस्ताद बडे गुलाम अली खाँ, उस्ताद आमीर खाँ यांसारखे दिग्गज गायक हे सारंगीवादक होते. सारंगीवादक हा मनातून गात असतो. ४० तास जुळवून घेणारा कलाकार हा सुरातच असतो. शास्त्रीय संगीताची अन्य कोणत्याही संगीताशी तुलना होऊ शकत नाही. आपल्या चित्रपट संगीतामध्येही शास्त्रीय संगीतावर आधारित उत्तम गीतांची निर्मिती झाली आहे. आता दुर्दैवाने तसे चित्रपट आणि शास्त्रीय संगीताचा उत्तम वापर करणारे संगीतकारही उरलेले नाहीत. वादनामध्ये गायकाला साथसंगत करणे एवढेच माझे काम होते. आकाशवाणीकडून मिळणाऱ्या मानधनामध्ये गुजराण न झाल्यामुळे मला चित्रपट संगीत क्षेत्राकडे वळावे लागले. त्याचा एक

फायदा झाला. चित्रपटसृष्टीला सारंगी या वाद्याची ओळख झाली. आजही मी विद्यार्थीच आहे. जे शिकण्यासाठी येतात त्यांना सारंगीवादन शिकविताना मीदेखील त्यांच्याकडून शिकत असतो. माझ्यापरीने जमेल तेवढे काम मी करतच आहे. पण, हे वाद्य भविष्यामध्येही राहावे असे वाटत असेल सरकारने सहकार्य करावे एवढीच अपेक्षा आहे.''

## * दलित अस्मिता पुरस्कारांचे वितरण

आप्पासाहेब विश्वासराव भालेराव प्रतिष्ठानतर्फे दलित अस्मिता पुरस्काराचे वितरण भैय्यासाहेब गंधे सभागृहात झाले. भटक्या विमुक्त जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष बाळकृष्ण रेणके, आमदार शिरीष चौधरी उपस्थित होते.

क्रांतिबा ज्योतिबा फुले पुरस्काराने रूपा कुलकर्णी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने अमर हबीब आणि राजर्षी शाहू महाराज पुरस्काराने आयबीएन-लोकमत वृत्तवाहिनीस सन्मानित करण्यात आले.

वृत्तवाहिनीचे एडिटर व चीफ आशिष दीक्षित यांनी म्हटले की, वृत्तवाहिनीला आजवर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. मात्र ज्या प्रेक्षकांसाठी आम्ही काम करतो त्यांच्यातर्फे मिळालेल्या या पुरस्काराचे महत्त्व जास्त आहे.

दलित समाजाने जातीचा अंत करण्यासाठी लढणे आवश्यक आहे. समतेची लढाई जातीची होते तेव्हा तिचा अंत होतो. त्यामुळे समतेच्या लढाईला जातीचे स्वरूप देऊ नका असे हबीब यांनी आवाहन केले. ''अप्रतिष्ठित लोकांसाठी मी काम करत आहे. मात्र या पुरस्काराने त्या हजारो महिलांचा सन्मान झाला आहे. पुरस्कारामुळे अजून पुढे काम करण्याची प्रेरणा मिळेल,'' असे कुलकर्णी यांनी सांगितले.

## * ऑस्कर ॲवार्डमध्ये 'लाइफ ऑफ पाय'चा चौकार

एकाच चित्रपटाने सर्वाधिक पुरस्कार पटकावत संपूर्ण सोहळा खिशात घालण्याची परंपरा यंदाच्या ८५व्या ऑस्कर समारंभाने खंडित केली. बेन अफ्लेक दिग्दर्शित 'आर्गो' या चित्रपटाने मानाच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटासह तीन पुरस्कार पटकावले, तर १२ नामांकनांचा गाजावाजा झालेल्या 'लिंकन' या चित्रपटाला केवळ सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार लाभला. तर सर्वोत्कृष्ट पटकथेचा पुरस्कार क्वेन्टीन टेरेन्टिनो (जंगो अन्चेण्ड) याला मिळाला.

इराणमधील कॅनडाच्या दूतावासामध्ये अडकलेल्या सहा अमेरिकी नागरिकांना सोडविण्यासाठी सीआयएने केलेली व्यूहरचना रंगविणारा 'आर्गो' यंदाचा सर्वोत्कृष्ट सिनेमा ठरला. 'लिंकन', 'झीरो डार्क थर्टी', आणि 'बीस्ट ऑफ द सदर्न वाइल्ड' या तगड्या दावेदार स्पर्धकांवर 'आर्गो'ने मात केली. रूपांतरीत पटकथा आणि

संकलन या आणखी दोन गटातील पुरस्कारही 'आर्गो'च्या वाट्याला आले.

स्टीव्हन स्पिलबर्ग दावेदार मानल्या जाणाऱ्या दिग्दर्शनाच्या पुरस्कारावर अँग ली या तैवानी-अमेरिकी दिग्दर्शकाने नाव कोरले आणि आपल्या आभारप्रदर्शक भाषणाची अखेर 'नमस्ते' या शब्दाने करून 'लाइफ ऑफ पाय' मधील भारतीयत्वाची आठवण जागविली.

'ल मिझरेबल' या चित्रपटासाठी ॲन हॅथवे व 'जंगो अन्चेण्ड' साठी ख्रिस्तोफर वॉल्ट्झ यांना सहाय्यक अभिनेत्री-अभिनेत्याचे अपेक्षित पारितोषिक मिळाले. सर्वोत्तम अभिनेत्याचे पारितोषिक डॅनियल डे लुईस याला मिळाले. सर्वोत्तम अभिनेत्याचे त्याला मिळालेले हे तिसरे पारितोषिक होते.

सर्वोत्तम अभिनेत्रीच्या तुल्यबळ गटामध्ये जेनिफर लॉरेन्स हिने -सिल्व्हर लायनिंग्ज प्लेबुक'साठी पुरस्कार मिळविला. सर्वोत्कृष्ट परभाषिक चित्रपट म्हणून ऑस्ट्रियाच्या 'आमोर'ला आणि सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपटम्हणून पिक्झारच्या 'ब्रेव्ह'ला पुरस्कार लाभला.

## * 'निर्भया'ला अमेरिकेचा शौर्य पुरस्कार जाहीर

दिल्लीतील सामूहिक बलात्कार प्रकरणातील पीडित तरुणीला अमेरिकेचा सन्माननीय 'आंतरराष्ट्रीय महिला साहस पुरस्कार' मरणोत्तर जाहीर झाला आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात लढण्याची प्रेरणा मिळण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो.

अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या पत्नी मिशेल आणि परराष्ट्रमंत्री जॉन केरी यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण आठ मार्चला झाले. या पुरस्काराची घोषणा करताना अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने 'निर्भया' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या दिवंगत तरुणीच्या साहसाचा गौरव केला आहे.

अमेरिकेचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर 'निर्भया'च्या कुटुंबियांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. 'या पुरस्काराला ती खरोखरच पात्र आहे. तिच्या धाडसाची पावती मिळाल्यामुळे मला समाधान वाटत आहे.' पुरस्कारासंबंधात आपल्याला अमेरिकेच्या दूतावासाकडून फोन आला होता, असे तिच्या भावाने म्हटले आहे.

## * चंद्रकांत दळवी यांना उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार

संपूर्ण राज्यात 'झिरो पेन्डन्सी'चा पॅटर्न राबविणारे राज्याचे जमाबंदी आयुक्त चंद्रकांत दळवी यांना पुण्यातील त्यांच्या कामाची दखल घेऊन नागपूर येथे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते २६ फेब्रुवारीला राज्य सरकारचा उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार दिला गेला. जिल्हाधिकारी म्हणून काम करताना दळवी यांनी 'झिरो

पेन्डन्सी' उपक्रम राबविला. राज्य सरकारने त्याची दखल घेत संपूर्ण राज्यात हा पॅटर्न राबविण्याचा अध्यादेश काढला.

### * 'स्त्री शक्ती अभियान' पुरस्कार

डॉ. निशिगंधा वाड शैक्षणिक आणि सांस्कृतिक विश्वस्त निधीतर्फे विविध क्षेत्रांतील महिलांना 'स्त्री शक्ती अभियान पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

वेणूताई यांच्या जीवनावरील 'मी वेणू बोलतेय' या लघुपटाचे प्रकाशनही या वेळी झाले. सुजाता मोरे यांनी या लघुपटाची निर्मिती केली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, नगरविकास राज्यमंत्री भास्कर जाधव, आमदार प्रकाश बिनसाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे, मुख्य निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख, निर्मात्या रश्मी शर्मा, शिक्षणतज्ज्ञ कल्पना परब, पत्रकार प्रगती बाणखेले आणि स्त्री कार्यकर्त्या रागिणी चंद्रात्रे यांचा तसेच विविध अडचणींवर मात करून शैक्षणिक यश मिळविलेल्या पंधरा बालिकांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

### * 'श्रीगमा' पुरस्काराचे वितरण

''पर्यावरणाच्या समस्या सोडविण्यासाठी तांत्रिक उपायांप्रमाणेच मूलभूत परिवर्तनाची आवश्यकता आहे. नागरिकांची जीवनदृष्टी, जीवनध्येय आणि जीवनशैली यात परिवर्तन घडणे आवश्यक आहे,'' असे मत पर्यावरणवादी कार्यकर्ते व लेखक दिलीप कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

'माणूस' प्रतिष्ठानतर्फे 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृत्यर्थ कुलकर्णी यांना ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ श्री. द. महाजन यांच्या हस्ते 'श्रीगमा विधायक कृतिशीलता' पुरस्काराने गौरविण्यात आले. माजी खासदार प्रदीप रावत, विनय सहस्रबुद्धे, वंदना भाले वगैरे या वेळी उपस्थित होते. ''आपली विकासाची संकल्पना, नीती बदलण्याची आवश्यकता आहे. आपण नैसर्गिक संपत्तीचा प्रचंड वापर करून भावी पिढ्यांच्या उपजीविकेच्या साधनांचा व नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश करत आहोत. नागरिकांना अंधारात ठेवून सरकार अणु ऊर्जा प्रकल्प लादण्याचे काम करत आहे,'' असे कुलकर्णी यांनी सांगितले.

### * 'कुसुमाग्रज पुरस्कार'

घेणार भरारी कशी, पंख तुटलेले पक्षी...
कोणत्या हातांवर कोरणार ग्लोबल मेंदीची नक्षी...

जगण्याच्या वणव्याला कविता ही सावलीची रसद पुरवणारी असते. कुसुमाग्रज पुरस्कार हा याच जगण्याला लाभलेला परिसस्पर्श आहे, अशी भावना कवी अझीम नवाज राही यांनी व्यक्त केली. राही यांच्या अक्षरमानव प्रकाशित 'कल्लोळातील एकांत' आणि अजय कांडर यांच्या 'हत्ती इलो' या शब्द पब्लिकेशन्स प्रकाशित काव्यसंग्रहाला 'कवी कुसुमाग्रज' पुरस्कार देण्यात आला. दीड हजार रुपये आणि प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. गझलकार रमण रणदिवे, डॉ. माधवी वैद्य, आसावरी काकडे आदी यावेळी उपस्थित होते. बुलढाण्याच्या छोट्याश्या मोहल्ल्यात राहताना काव्य आणि पुस्तकांचा वारसा नव्हता. मात्र कवितेने जगण्यातली दु:खे शोषून घेतली, असे राही म्हणाले.

## * सात महिलांना सावित्री पुरस्कार

भुलतज्ज्ञ आणि वैद्यकीय संशोधक डॉ. संजीवनी इनामदार (पुणे विभाग) नेत्रतज्ज्ञ डॉ. रागिणी पारेख (मुंबई विभाग), वृत्तनिवेदक ज्योती अंबेकर (मराठवाडा विभाग) वगैरे सात महिलांना राज्यस्तरीय सावित्री पुरस्कार सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील आणि उल्हास पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

मानचिन्ह, साडी-चोळी आणि २१ हजार रुपये, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. उद्योगिनी मोहिनीताई कोठारे (कोकण विभाग), सामाजिक व शैक्षणिक कार्यकर्त्या दुर्गाताई तांबे (नाशिक विभाग), आयुर्वेदावर विशेष संशोधन करणाऱ्या डॉ. सरिता डावरे (नागपूर विभाग) आणि शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्रांतील अरुणा कुल्ली (अमरावती विभाग) यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला पुण्याचे पोलिस आयुक्त गुलाबराव पोळ, अतिरेकीविरोधी पथकाचे उपमहानिरीक्षक संजय लाटकर, राजीव गांधी मिलिटरी संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ माळी आणि कोशाध्यक्ष विद्याताई माळी वगैरे उपस्थित होते.

## * अभिजितदादा कदम मानवता पुरस्कारांचे वितरण

घटनेने निर्माण केलेल्या संस्था आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावू शकत नाहीत. त्यामुळे या संस्थांच्या माध्यमातून समाजातील प्रश्न मार्गी लागणे आवश्यक असतानाही आज जनआंदोलने आणि चळवळी कराव्या लागत आहेत. हा लोकशाहीचा पराभव असल्याची खंत माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी २७ फेब्रुवारी रोजी अभिजितदादा कदम मानवता पुरस्कार वितरण प्रसंगी व्यक्त केली. डॉ. पतंगराव कदम, डॉ. मोहन आगाशे, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. उत्तम भोईटे वगैरे उपस्थित होते.

संस्था गटात हा पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या नर्मदा

नवनिर्माण अभियानास, तर वैयक्तिक गटातील पुरस्कार मीना कुर्लेकर यांना देण्यात आला.

या पुरस्काराचे स्वरूप अनुक्रमे एक लाख रुपये आणि पंचवीस हजार रुपये असे आहे. ''समाजातील प्राधान्यक्रम बदलल्याशिवाय सकारात्मक परिवर्तनाची अपेक्षा करणे चुकीचे आहे. आपल्याकडे सामाजिक सुरक्षा नाही. कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा करताना पतीला घरातून बाहेर काढण्याचा अधिकार न्यायालयाला दिला; परंतु याची अंमलबजावणी कशी करायची? महिलांना आश्रयगृहात पाठविण्याची तरतूद केली. परंतु विश्वासाने संरक्षण देणारी आश्रयगृहे आहेत कुठे?''

उच्च स्वप्न पाहून ती साकार करण्यासाठी सर्वसामान्यांना परवडेल अशी शिक्षणव्यवस्था आणि आरोग्यव्यवस्था आवश्यक असल्याचे सांगून डॉ. मोहन आगाशे यांनी सांगितले. ते म्हणाले, ''रुग्णांनीच मला मानवता हे मूल्य शिकविले; परंतु आज समाजातील वाढती असंवेदनशीलताच समाजाच्या दुर्दशेस कारणीभूत ठरत आहे.''

आंदोलन हीच आदिवासींची जीवनशाळा असून, विकासासोबतच पुनर्वसनही महत्त्वाचे असल्याचे मेधा पाटकर यांनी सांगितले, तर भाजीविक्रेतीपासून वेश्या व्यवसायापर्यंतच्या समाजाच्या सर्वच गटांतील महिलांच्या प्रश्नाचे दाहक वास्तव मीना कुर्लेकर यांनी मांडले.

*** तालयोगी तळवलकर यांचा 'सा' व 'नी' संस्थेतर्फे सत्कार**

''आजपर्यंतच्या प्रवासात अनेकांसोबत वादनाचे कार्यक्रम केले. त्यातून मिळणारा आनंद लुटत राहिलो. त्यात कधी व्यावसायिकता येऊ दिली नाही,'' अशी भावना तालयोगी सुरेश तळवलकर यांनी व्यक्त केली.

तळवलकर यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल 'सा' व 'नी' सूरसंगीत संस्थेतर्फे 'एमआयटी'चे संस्थापक संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तळवलकर म्हणाले, ''भारतीय संगीतात लय-तालाची भूमिका महत्त्वाची आहे. ती तबला आणि पखवाजाने सिद्ध केली आहे. अनेक परदेशी वादक उत्तर भारतात व कर्नाटकात वाद्ये शिकत आहेत. हल्लीचे गुरू शिष्यांना केवळ शिकवतात. त्यांनी शिष्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत. तसेच तो योग्य पद्धतीने कला सादर करतो आहे का याकडेही लक्ष दिले पाहिजे.'' डॉ. कराड म्हणाले, ''ज्ञान, कर्म आणि भक्तियोगातून ईश्वरदर्शन होते. त्याचप्रमाणे संगीताच्या साधनेतूनही ईश्वरदर्शन होते. सुरेश तळवलकरांची संगीत क्षेत्रातील अनुभूती बोलकी आहे.''

## * ४० प्रकाशकांना उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे २००८ व २००९ सालातील 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती' पुरस्कारांचे वितरण फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, दिल्ली आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रकाशकांच्या परिषदेत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यात ललित विभागात काव्य, कथा, कादंबरी, बालकुमार साहित्याबरोबरच ललित साहित्यात वैचारिक, संदर्भकोश, उपयुक्त, कला, क्रीडा इत्यादी विषयांसाठी तसेच उत्कृष्ट मुखपृष्ठासाठीदेखील पुरस्कार देण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊस, मॅजेस्टिक, राजहंस, रोहन, ज्योत्स्ना, दिलीपराज, पुणे विद्यार्थी गृह, डायमंड, राजा, लोकवाङ्मय गृह, मनश्री इत्यादी पुणे, मुंबई, ठाणे विभागातील प्रकाशकांना, तसेच साकेत, मुक्ता, गौतमी, शब्दवेल साहित्य प्रसार केंद्र, सोनल इत्यादी उर्वरित महाराष्ट्रातील प्रकाशकांना सन्मानित करण्यात आले.

## * टाइम्स समूहाचे विनीत जैन-आंत्रप्रेन्युअर ऑफ दि इयर

टाइम्स समूहाचे व्यवस्थापकीय संचालक विनीत जैन यांना संपादन क्षेत्रातील सर्वोत्तम साहसी उद्योजक आंत्रप्रेन्युअर ऑफ दि इयर ॲवार्ड देऊन गौरविण्यात आले. टाइम्सने गेल्या काही वर्षात रेडिओ, टेलिव्हिजन, डिजिटल माध्यमे या सर्व क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून संज्ञापन माध्यमांना नवे रूप आणि चैतन्य दिले. दैनिकांना मंदीच्या अवस्थेतून बाहेर काढून नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे वाचकाभिमुख आणि चैतन्यशाली बनवण्यात खूप कल्पकता दाखवली. दैनिक आणि स्मार्टफोनचा मेळ घालणारा अलाइव्ह हा अभिनव उपक्रम सध्या खूपच लोकप्रिय झाला आहे.

## * डॉ. सदाशिव शिवदे यांना पुरस्कार

महाराष्ट्र सेवा संघाच्या न. चिं. केळकर ग्रंथालयाचा साहित्य साधना पुरस्कार डॉ. सदाशिव शिवदे यांच्या 'ज्वलज्वलनतेजस संभाजी राजा' या पुस्तकाला देण्यात आला. पाच हजार रुपये रोख आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

❐


**ऑनलाईन वाचकांसाठी सुवर्णसंधी!**


**मेहता ग्रंथजगत आता डिजिटल स्वरूपात..**

**१ वर्षासाठी - रु.१००/- ३ वर्षासाठी - रु. ३००/- ५ वर्षासाठी - रु. ४००/-**

ग्रंथजगत वाचा हवा तेव्हा आणि हवा तिथे आणि सवलतीत पुस्तके मिळवा.

अधिक माहितीसाठी www.mehtapublishighouse.com या संकेतस्थळाला भेट द्या.

२ री आवृत्ती




# कन्टेजन

**मूळ लेखक - रॉबिन कुक**
**अनुवाद - प्रमोद जोगळेकर**

**किंमत : २९०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

'कन्टेजन' ही डॉ. रॉबिन कुक यांची वैद्यकीय पार्श्वभूमीवरील एक यशस्वी रहस्यमय कादंबरी. विज्ञानाच्या क्षेत्रातील प्रतिष्ठित 'इंटेलिजंट' गुन्हेगारांची टोळी, त्यांची असाधारण गुन्हेगारी व एका बुद्धिमान, निष्ठावंत व्यक्तीनं ती हाणून पाडण्यासाठी जिवाच्या करारानं घेतलेला त्याचा शोध, या पद्धतीनं गुंफलेलं हे कथानक अत्यंत उत्कंठावर्धक मांडणीमुळे वाचकांच्या मनाचा ठाव घेते. न्यूयॉर्कच्या मॅनहटन जनरल हॉस्पिटलमध्ये कोणत्यातरी अज्ञात संसर्गजन्य रोगानं एकापाठोपाठ एक माणसं मरू लागतात.


मुख्य वैद्यकीय तपासनीस ऑफिसातील गुन्हाअन्वेषण विभागातील निष्णात डॉक्टर जॅक स्टेपलटन शवविच्छेदन केल्यावर चक्रावून जातो...!

हा घातक संसर्गजन्य रोग कोणता? इन्फ्ल्युएंझा?... प्लेग?... टुलरेमिया?... रॉकी माउंटन स्पॉटेड फिव्हर?... ७०-७५ वर्षांपूर्वी नामशेष झालेल्या या रोगांचे विषाणू पुन्हा या काळात आणि तेही न्यूयॉर्कमधल्या इतक्या अत्याधुनिक हॉस्पिटलमध्ये? हे विषाणू नैसर्गिकपणे उद्‌भवले, की कोणा माथेफिरू दहशतवाद्याचं हे कृत्य?

## पुस्तक परिचय

# आइन्स्टाइनचे संशोधन पुढे नेणारा हरहुन्नरी संशोधक

**नॅनो टेक्नॉलॉजीची संकल्पना मांडून तिच्या विविध क्षेत्रातील संभाव्य उपयुक्ततेची शक्यता मांडणारा भौतिक शास्त्रज्ञ**




**सुधा रिसबुड**

पृष्ठे **१३२**। १४० रु. पोस्टेज २५रु./ सभासदांना सवलतीत

'रिचर्ड फाईनमन' या पुस्तकात सुधा रिसबूड यांनी भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेत्या शास्त्रज्ञाची ओळख करून दिली आहे. हे नाव आपल्याला तेवढेसे परिचित नाही.

काही शास्त्रज्ञ सतत प्रसिद्धीच्या झोतात वावरत असतात; वेगवेगळे मानसन्मान मिळवत असतात. माध्यमांना प्रिय असतात. परंतु काही शास्त्रज्ञ क्रांतिकारक शोध लावून, नोबेल पुरस्कार वगैरे अत्त्युच्च सन्मान मिळवूनही सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अज्ञात, अपरिचितच राहतात. रिचर्ड फाइनमन या दुसऱ्या वर्गात मोडतात.

खरे तर, १९५९ साली अणुपेक्षाही सूक्ष्म कणांचा अभ्यास करून त्यांनी शोधलेल्या डायग्रॅमला त्यांचेच नाव देण्यात आले. नॅनो टेक्नॉलॉजीची संकल्पना मांडून तिचा संभाव्य वापर संगणक, जैविकशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे क्षेत्रात कशाप्रकारे होऊ शकेल हे रिचर्ड फाइनमन यांनी त्यावेळी स्पष्ट मांडले होते.

सापेक्षता सिद्धांत मांडणारे शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन यांनी $E = mc^2$ हे सूत्र मांडून ऊर्जा आणि वस्तुमान यांचे एकमेकात रूपांतर करता येते हे दाखवून दिले. त्या सूत्राचा वापर करून अणुबॉम्ब बनविण्याचे प्रयत्न जर्मनीत हिटलरकडून आणि यूरोप-अमेरिकेत सत्ताधीशांकडून चालू होते. अणुबाँब जर हिटलरच्या हाती पडला तर संपूर्ण युरोप बेचिराख होईल अशी भीती मित्र राष्ट्रांना भेडसावत होती. तेव्हा अमेरिकेने या क्षेत्रातील देशोदेशींच्या शास्त्रज्ञांना एकत्र आणून ओपेनहायमरच्या नेतृत्वाखाली नेवाडातील लॉस अलमॉसला अण्वस्त्र निर्मितीची मोठी प्रयोगशाळा उभारली. त्यात रिचर्ड फाइनमन यांनाही सहभागी करून घेण्यात आले. गटप्रमुख नेमले. (१९४२) जगातील पहिल्या अणुबाँबची चाचणी गॉगल न वापरता नुसत्या डोळ्यांनी बघणारा एकमेव शास्त्रज्ञ म्हणून रिचर्ड फाइनमन यांचा उल्लेख केला जातो. त्यावेळी फाइनमन हे केवळ तेवीस-चोवीस वर्षांचे तरुण होते.

रिचर्ड फाइनमन यांचा जन्म ११ मे १९१८ रोजी न्यूयॉर्क येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला.

वडील मेलव्हिल हे सेल्समन म्हणून काम करीत. आई ल्यूसिल फिलिप्स. चतुरस्र, मिस्किल, हजरजबाबी. विक्री कौशल्यामुळे वडील आपला प्रभाव समोरच्या माणसावर सहजपणे पाडत. इतरांवर आपला प्रभाव पडायला हवा, इतरांचा प्रभाव आपल्यावर पडू द्यायचा नाही, मग ते उच्चपदस्थ का असेनात, प्रत्येक गोष्टीकडे डोळसपणे बघायचे, बाबा वाक्यं प्रमाणम् असे मानायचे नाही. याचे बाळकडूच छोट्या रिचर्डला मिळाले. रिचर्ड लहानपणापासूनच अत्यंत हुशार होता. कोणतीही वैज्ञानिक संकल्पना असो, ती त्याला सहजपणे आकलन होई. त्यामुळे पदार्थविज्ञानाबद्दल त्याला आकर्षण होते. वयाच्या पंधराव्या वर्षी त्याने डिफरन्शिअल अँड इंटेग्रल कॅलक्युलसमध्ये प्रावीण्य संपादन केले. १९३६ साली बॉस्टन येथील मॅसॅच्युसेट्स

इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये त्याने प्रवेश घेतला आणि १९३९ मध्ये बीएस्सी पदवी मिळवली. प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीतून १९४२मध्ये डॉक्टरेट पूर्ण केली.

नॅनो टेक्नॉलॉजी हा त्यांचा विषय होता. अणूपेक्षाही लहान कणावर त्यांनी संशोधन केले. डॉक्टरेट चालू असतानाच आपली बालपणापासूनची मैत्रीण अरलीन ग्रीनब्राऊन हिच्याशी त्यांनी लग्न केले. पीएच.डी झाल्याबरोबर त्यांना अमेरिकेच्या अणुबॉम्ब प्रकल्पासाठी लॉस अलमॉस येथे पाचारण करण्यात आले.

ओपेनहायमरच्या नेतृत्वाखाली या निर्मनुष्य वाळवंटात या प्रकल्पाचे काम अत्यंत गुप्तपणे चालू होते.

१६ जुलै १९४५ रोजी अणुबाँबचा चाचणी स्फोट करण्यात आला. पहाटे पाच वाजून दहा मिनिटांनी या स्फोटाचा प्रचंड आवाज झाला आणि अग्नीचा एक प्रचंड गोल क्षितिजावर अवतरला. हा अग्निगोल सरसरत अवकाशात वेगाने उंचउंच जात होता. तो बघताना शास्त्रज्ञ ओपेनहायमरला भगवद्‌गीतेतील विश्वरूपदर्शनाचे स्मरण झाले.

**अनेकवाक्यनयनं अनेकाद्‌भूत दर्शनम्**
**अनेक दिव्याभरणं दिव्यानेकोद्यता युधम् ।।**
**दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।**
**सर्वाश्चस्वर्गमयं देवं अनन्तं विश्वतोमुखम् ।।**
**दिविसूर्यसहस्त्रस्य भवेद्युगपुदुत्थिता**
**यदि भाः सदृशी सा स्याद्‌भासस्तय महात्मनः ।।**

हजारो सूर्यांचा तेजस्वी प्रकाश एकदम उजळावा असा तो `सूर्यकोटी समप्रभ ' अनुभव विलक्षण होता. त्यानंतर हिरोशिमा या जपानी शहरावर ६ ऑगस्ट रोजी १० हजार पौंड वजनाचा अणुबाँब सोडण्यात येऊन १८६० फूट उंचीवर त्याचा स्फोट करण्यात आला. १ लक्ष ४० हजार नागरिक मृत्युमुखी पडले. ७० हजार इमारतींपैकी फक्त सहा हजार इमारती कशाबशा जागेवर राहिल्या.

९ ऑगस्ट रोजी नागासाकी शहरावर दुसरा अणुबाँब टाकला. तेव्हा जपानने युद्धविराम केला. २ सप्टेंबर रोजी जपानची अधिकृत शरणागती जनरल मॅकआर्थर यांनी मिसुरी युद्धनौकेवर स्वीकारली.

रिचर्ड फाइनमन यांना या नृशंस संहाराने भयंकर दु:ख झाले.

लॉस ॲलमॉसचा प्रकल्प संपला. भौतिक शास्त्रज्ञ हॅन्स बेथे यांच्या आग्रहामुळे संशोधनाला प्राधान्य मिळाले. फावल्या वेळात त्यांनी जीवशास्त्राचा अभ्यास करून प्रोजेक्टही पूर्ण केला.

१९६५मध्ये ज्युलियन श्र्विंगर आणि टोमोंगा या दोघांबरोबर डॉ. रिचर्ड फाइनमन यांना फिजिक्सचा नोबेल पुरस्कार विभागून मिळाला. विद्यार्थ्यांना शिकविण्यात

त्यांना खरा आनंद मिळे. फिजिक्स या विषयात त्यांना खूपच स्वारस्य होते. विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी भौतिकशास्त्राच्या अभ्यासातूनच नियमांचा शोध लावावा लागेल असे ते मानत. भौतिक शास्त्राचे नियम, गुरुत्वीय चुंबकीय बलाचे नियम, पदार्थांतील अणूरेणूंची रचना, त्यातील सौंदर्य आणि नीटनेटकेपणा, निसर्गात घडणाऱ्या एकूण एक घटनांमागची नियमबद्धता आणि शिस्त– हे सर्व थक्क करणारे आहे, पण अजून ते आपल्या आकलनाच्या कक्षेबाहेरच आहेत. भौतिकशास्त्राची मूलभूत तत्त्वे एक दिवस नक्की उलगडतील असे त्यांचे ठाम मत होते.

**आइनस्टाइन नंतर भौतिकशास्त्र ज्या वळणावर थांबले होते, त्या वळणावरून पुढे जाण्याला फाइनमन डायग्रॅममुळे दिशा मिळाली.** क्वान्टम फिजिक्समधले पुढचे दालन आकलनाच्या कक्षेत आले. निसर्गातील वेगवेगळ्या बलांना एकत्र आणून त्यांना एका सूत्रात गुंफण्याचा आइनस्टाइनचा प्रयत्न होता. ते त्याचे काम रिचर्ड फाइनमनननी पुढे नेले. कॅलक्युलसमधील प्रावीण्यामुळे भौतिकशास्त्रातील गहन गणिते त्यांना सहजपणे सोडवता येत.

रिचर्ड फाइनमन यांना चित्रकला, ड्रमचे वादन, हे छंद होते. ते थोडे खोडकर, खट्याळ होते. इतरांच्या फिरक्या घेण्यात त्यांना मजा वाटे. आपल्याला काही कळत नाही असे दाखवून ते इतरांना बोलायला लावत; अडचणीचे प्रश्न विचारून गोंधळात टाकत. जपानमध्ये सेमिनार्ससाठी गेल्यावर त्यांनी जपानी भाषा शिकण्यासाठी शिकवणी लावली. पण जपानी माणसांच्या बोलण्याच्या पद्धतीने ते चकित होत. दुसऱ्याला नेहमी मोठेपणा देऊन कोणताही विषय वा प्रश्न मांडावा– या जपानी लोकांच्या कौशल्याचे आणि मानसिकतेचे सूक्ष्म पैलू आपल्या परखड व्यक्तिमत्त्वाला आणि वृत्तीला मानवणार नाहीत हे त्यांच्या लक्षात आले आणि जपानी शिकण्याचा बेत त्यांनी रद्द केला.

दरवर्षी समरमध्ये विद्यापीठाला सुटी असे तेव्हा ते वेगवेगळ्या विद्यापीठात समर कोर्सेस शिकवण्यासाठी जात. विद्यार्थ्यांच्या शंकांना आणि प्रश्नांना उत्तरे देण्याच्या प्रयत्नात नवनव्या कल्पनांना चालना मिळे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावत.

कॅल्टेकमध्ये त्यावेळी वॅटसन आणि क्रिक यांचे डीएनए संबंधातील संशोधन कार्य चालू होते. डीएनएची रचना, अस्तित्व, कार्य याचा मूलगामी शोध घेतला जात होता. जीवशास्त्राचे बॉब इडगर यांनी रिचर्डना फेज या विषाणूचा अभ्यास करण्याविषयी सूचना केली. फेज या विषाणूतील डीएनएचा रेणू विषाणूंवर हल्ला करतो. या प्रकाराचा छडा लावताना फाईनमन यांना फिजिक्स आणि गणितातील ज्ञानाची खूप मदत झाली.

फाइनमन हे ज्यू होते; परंतु ते कडवे, ऑर्थोडॉक्स ज्यू नव्हते. तलमूद हा ज्यूंचा धर्मग्रंथ. पवित्र आणि पूज्य. चांगला धर्मोपदेशक होण्यासाठी आपण विज्ञानाचाही

उपयोग करून घेण्याची गरज त्यांना वाटत होती. हे बघून फाइनमन यांना समाधान वाटले. मात्र तलमूदचा अर्थ योग्य प्रकारे लावण्यासाठी धर्मोपदेशकांना विज्ञानाचे ज्ञान आवश्यक होते, याचे त्यांना आश्चर्य वाटले.

रिचर्ड फाइनमन यांनी लॅटिन अमेरिकेतील मय संस्कृतीचाही सखोल अभ्यास केला होता. मय संस्कृतीतील लिपी, विशिष्ट संकेतचिन्हे, ग्रहांच्या परिभ्रमण कक्षा, ग्रहांच्या कला यांच्याशी निगडीत असणारी निरीक्षणे अभ्यासून काही निष्कर्षही काढले होते. मय चित्रलिपीत वरचेवर येणारी ५८४ ही संख्या त्यांना कोड्यात टाकणारी ठरली. शुक्राला सूर्याभोवती फिरण्यासाठी ५८३.९२ दिवस लागतात हे लक्षात आल्यावर त्यांनी मय संस्कृतीतील अनेक समज व संकेत उकलून दाखवले. मय संस्कृतीचा त्यांचा अभ्यास हा केवळ छंद म्हणून चालला होता हे विशेष.

फाइनमन यांना शासकीय यंत्रणांबद्दल अजिबात आस्था नव्हती. पेटंट घेण्याचीही ते टाळाटाळ करीत. सह्या करण्याचा त्यांना कंटाळा वाटे. केवळ एका डॉलरच्या मोबदल्यात त्यांनी आपल्या शोधांचे हक्क सरकारला 'विकले.' आण्विक शक्तीने चालू शकणाऱ्या रॉकेट प्रोपेल्ड विमानाचे पेटंटही त्यात होते.


१९६५मध्ये त्यांना फिजिक्समध्ये नोबेल पुरस्कार मिळाला. त्यावेळी रशियन राजदूत शोलोखोव्ह यांना दुभाष्या म्हणून त्यांच्या शेजारी बसण्याची मुभा तत्कालीन प्रोटोकॉलमुळे मिळाली.

चॅलेंजर या अमेरिकन यानाचा १९८६मध्ये अवकाशातच स्फोट झाला. त्या चौकशी कमिटीत फाइनमन यांनी रॉकेटच्या सिलिंडरसारख्या भागांना जोडण्यासाठी वापरण्यात आलेल्या रबराच्या 'ओ-रिंग'च्या करामतीकडे निर्देश करून शास्त्रज्ञांना निर्दोष ठरवले. फाइनमन यांच्या विज्ञानक्षेत्रातील कामगिरीची, कर्तृत्वाची आणि व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण माहिती देणारे हे छोटेखानी पुस्तक रिचर्ड फाइनमन या नावाबद्दल आपल्या मनात मैत्रभाव निर्माण करील. नावाप्रमाणे फाइनमॅन, चांगला माणूस, सज्जन आणि सत्प्रवृत्त होते हे मनावर कायमचे ठसवेल.

❐


**सूचना**

'मृत्युंजय' आणि 'छावा' या पुस्तकांचे प्रकाशनाचे सर्व हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे आहेत. इतर प्रकाशकाने प्रकाशित केलेली ही पुस्तके विकणे बेकायदेशीर आहे. अशा पुस्तकांची विक्री त्वरीत थांबवावी. अशी पुस्तके आढळल्यास ती जप्त करण्यात येतील याची नोंद घ्यावी.




आगामी

# जीव जिथे असे गुंतलेला...

मूळ लेखक : **अतुल गवांदे**

अनुवाद : **नीला चांदोरकर**

डॉ. गावंडे यांच्या भाषेला एक प्रकारचा धारदारपणा आहे. शस्त्रक्रियेच्यावेळी ज्या अचूकपणे, काटेकोरपणे ते सुरीने छेद देतात, त्याच अचूकतेने ते तिचे वर्णन करतात. त्यांच्या शब्दांमधून त्यांच्या स्वभावातला धाडसीपणा प्रतिबिंबित होतो, पण ते कधीही बेदरकारपणे विधाने करत नाहीत. खरं सांगायचे, तर आपले अंतरंग त्यांनी उघडं केल्यानंतरच त्यांच्यातल्या अंगभूत देणगीची आपल्याला पुरेपूर कल्पना येते... जॉर्ज ऑर्वेलची पुस्तकं वाचताना जो अनुभव येतो, ज्ञानात भर पडल्याचीच प्रचीती येते, शिवाय मनोरंजन झाल्याचेही जाणवते. आपण बदललो आहोत असे समाधान लाभते.


– अब्राहम वर्गीज,
'माय ओन कन्ट्री' आणि 'द टेनिस पार्टनर या पुस्तकांचे लेखक

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक नियमित वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता पोस्टकार्डद्वारे अथवा ई-मेलद्वारे कळवावा.
ई-मेल - info@mehtapublishinghouse.com




# भविष्यकालीन घटनांची सूचना देणारा गूढविद्येतील ज्ञानग्रंथ आहे का?

**हिमालयाच्या अंतर्भागातील एक गूढगहन दैवी सत्तापीठ शोधण्यासाठी एका अमेरिकन पत्रकार महिलेने केलेली अचाट साहसयात्रा**




**टॉम मार्टिन**

अनुवाद

**उदय भिडे**

पृष्ठे **३८४।** ३८० रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

‘विश्वसत्ता’ या नावाने टॉम मार्टिनच्या ‘किंगडम’ या कादंबरीचा मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकताच प्रसिद्ध केला आहे. टॉम मार्टिनची या आधीची पिरॅमिड ही कादंबरी गेल्या वर्षीच मराठी वाचकांना वाचायला मिळाली होती. त्यामुळे त्याच्या लेखनशैलीची आणि कथाकथन कौशल्याची कल्पना आपल्याला आहेच.

‘किंगडम’ ही कादंबरी तब्बल ३८० पृष्ठांची असून तिच्यात किमान तीन उपकथानकांची गुंतागुंत आहे. त्या तीन उपकथानकांबरोबर तिबेट नेपाळची पार्श्वभूमी, दिल्ली-बीजिंग म्हणजे भारत-चीन यामधील गुप्तहेर यंत्रणांमधील स्पर्धेची आणि दुसऱ्या महायुद्धातील नाझी जर्मनीतील आर्य श्रेष्ठत्वाची पार्श्वभूमी आहे. हिमालयात अंतर्भागी गुप्तपणे जागतिक शांतता सुखाची आणि युद्ध संघर्षाची कार्यक्रमपत्रिका ठरविण्यात पुढाकार घेणाऱ्या दैवी पुरुषांच्या शांग्रिला या गूढगहन देशाची, भविष्यकालीन घटनांची सूचना देणाऱ्या गूढविद्येतील ज्ञानग्रंथाची जोड देऊन वाचकांची मती भ्रमित करण्यात कुठलीही कसूर ठेवण्याचे टाळले आहे.

या कादंबरीचे एक प्रमुख सूत्र म्हणजे तिबेटवर संपूर्ण कब्जा करण्यासाठी चीनने चालवलेले प्रचंड जुलूम जबदस्तीचे दहशतीचे धोरण. त्यामुळे दलाई-लामाला चीनमधून पलायन करून भारतात आश्रय घेणे प्राप्त ठरले. १९५९ मध्ये तिबेटमधील ४००० मठ चीनने उद्‌ध्वस्त केले. तेथील लामांना ठार केले. तरीही तिबेटी जनतेने आपले स्वत्व व सत्त्व, मनोधैर्य आणि श्रद्धा-धर्मकारण टिकवून धरले. आपले हेरांचे जाळे तिबेटमध्ये घरोघर गुफूंन चीनने विरोधकांना चिरडून टाकले. हिमालयातील शांग्रिला या गुप्त देशाचा छडा लावून तेथील ज्ञानग्रंथ हस्तगत करण्यासाठी गुप्तहेरांची मोठी यंत्रणा उभी केली. हे गुप्त राज्य ऐहिक पारलौकिक जगाच्या सीमेवर आहे अशी चीनची धारणा आहे.

या कादंबरीचा आरंभ होतो तो न्यूयॉर्क हेरॉल्ड ट्रिब्यून या अमेरिकेतील अग्रगण्य आणि मान्यतापात्र वृत्तपत्राची प्रतिनिधी म्हणून तरुण पत्रकार नॅन्सी केली ही राजधानी दिल्लीत येऊन पोचल्यावर. दक्षिण आशियाई कार्यालयाची प्रमुख म्हणून तिने सूत्रे घ्यायची असतात.

तिच्या आधी दिल्लीत प्रतिनिधी म्हणून काम करणारा बुजुर्ग पत्रकार अन्तोन हरझोग (वय ६०) हा भारत-चीन आशिया यांचा एक अभ्यासक व तज्ज्ञ मानला जात असतो. काहीही पूर्वसूचना न देता तो तिबेटमध्ये जातो आणि दोन महिने झाले तरी त्याचा ठावठिकाणा नसतो. तो गायब झालेला असतो. त्याच्या मागावर भारतीय आणि चिनी हेरखाते असते.

नॅन्सी विमानतळावरून सरळ ट्रिब्यूनच्या अतिथीगृहात येते. आंघोळ करून झोपते, तेवढ्यात दारावर थाप पडते.

ती दार उघडते. समोर पोलीस ऑफिसर असतो. ''मी कॅ. हुंदलानी. तुमचे सहकारी अन्तोन भारत तिबेटमध्ये असण्यामागचे कारण आणि ते आता कुठे आहेत याचा तपास आम्ही करीत आहोत. आपणास आमच्याबरोबर यावे लागेल.''

''मी आताच तर न्यूयॉर्कहून आले आहे. उद्या आले तर–?''

''दहशतवाद व हेरगिरी कायदा २००५; प्रकरण कलम ७ नुसार आपल्याला नॉन बेलेबल सुनावणीविना १३० दिवस कारावासात मी टाकू शकतो. तेव्हा-''

''मला एक वकील हवा आहे. मी पत्रकार आहे. ही काय कामाची पद्धत आहे?''

कॅ. हुदलानी तिला हातकड्या घालत म्हणतो, ''आमच्या कार्यपद्धतीवर अमेरिकन व्यक्तीने केलेली टीका मी ऐकून घेणार नाही.''

''मी अन्तोनला फारशी ओळखत नाही. मला त्याच्या जागी पाठवलंय एवढंच.''

तेवढ्यात वकील अरमुगम येतो.

इन्स्पेक्टर लाल तिला एक छोटे पार्सल देतात. त्यावर प्रेषक म्हणून अन्तोन याचे आणि घेणारा म्हणून नॅन्सी केली हिचे नाव असते. ''एका भिक्षूकडे हे पार्सल तुम्हाला द्यावे म्हणून देण्यात आले. ते तुम्ही उघडून दाखवा.''

वीस इंच लांबीचे एक हाड– तुतारीसारखे– वर स्वस्तिकचे चिन्ह, काही मजकूर– विचित्र सांकेतिक चिन्हे. लिपी अनाकलनीय. पार्सल पाठवल्याची तारीख १७ जून. ते निरखून बघितल्यावर इ. लाल म्हणाले,

''हे हाड एखाद्या प्राण्याचे असावे. तुमचा मित्र अंतोन जिवंत आहे. दोन महिन्यांपूर्वी ते पिमाको भागात शिरले. त्यानंतर त्यांचा ठावठिकाणा नाही.''

''मला याची काहीही माहिती नाही. मला आपण अडकवून ठेवले तर मात्र मी अमेरिकन राजदुतांना फोन-'' नॅन्सी बजावते.

''ठीक आहे. मी तुम्हाला येथे अडकवून ठेवत नाही. चौकशी चालू राहील. काही कळले तर संपर्क साधा.''

नॅन्सी आपला बॉस, संपादक डॅन फिशर याला फोन करते. ''मला काहीच पूर्व कल्पना न देता येथे पाठवले. त्यामुळे बराच ताप झाला. तेथून आपल्या येथील राजदूतांना याची कल्पना दे... सीआयए कडूनही सूत्रे हलवा. माझा पाठलाग होत आहे–''

सकाळी ती ऑफिसला जाते. अकबर स्ट्रीटवरील ट्रिब्यूनच्या कचेरीतील अन्तोनच्या टेबलावरच्या फाइल्स बघते. वेबसाइटवरून त्याची माहिती मिळवते. पुलिट्झर प्राइझ मिळवणारी दलाईलामा-तिबेटवरील त्याची स्टोरी वाचते. तिबेटशी त्याचे भावबंध जुळलेले असतात. त्यासाठी तो बदली आणि बढती नाकारतो.

ऑफिसातील तिचा मदतनीस कृष्णास्वामी याला ती विचारते. ''अन्तोन पिमाको भागात कशासाठी गेला, त्याने नंतर संपर्क का ठेवला नाही, हे हाड आणि त्यावरचा मजकूर कशासंबंधी आहे, त्याबद्दल कोणा तज्ज्ञाची मदत घेता येईल का? या प्रश्नांची उत्तरे मिळायला हवीत. कृष्णा, तिबेटी पुराणवस्तू संदर्भात अन्तोनचा कोणी जाणकार मित्र होता का?''

कृष्णा म्हणतो, ''हो. आहे एक असा माणूस. जॅक ॲडम्स. अमेरिकनच आहे तो. अन्तोनची आणि त्याची जवळीक होती. तो पुराणवस्तूंची खरेदी विक्री करतो. मानवी संस्कृतीच्या उगमासंबंधीचा तो अभ्यासक आहे. तो पिमाकोला नुकताच जाऊन आला होता. तेथे परदेशी लोकांना मज्जाव आहे. पब्लिक सिक्युरिटी ब्युरोची, चीनची परवानगी लागते. तेथेच चीन आणि भारत यांची सीमारेषा आहे. तो प्रदेश म्हणजे बॉन धर्माचे मूलपीठ आहे असे म्हणतात. हा बॉन धर्म बौद्ध धर्मापेक्षा जुना आहे. अन्तोनला या धर्माबद्दल आणि पिमाको प्रदेशाबद्दल बरीच माहिती होती.''

''हा ॲडम्स एकदम तज्ज्ञ आहे का?''

''असेल. तो येती टूर्स नावाची प्रवासी कंपनी चालवतो. श्रीमंत अमेरिकनांना हिमालयातील दुर्गम भागात फिरवून आणतो. उत्पत्तिशास्त्र आणि मानवी संस्कृतीच्या उत्पत्तिविकासाच्या अश्मीभूत अवशेषांबद्दलच्या विषयातील दोन डॉक्टरेट त्याने येल विद्यापीठाकडून मिळवलेल्या आहेत. तो उतावळा आणि बेधडक काम करणारा, जरूर तर तिरकस आणि उपरोधिक बोलणारा– पण आपल्या विषयात तज्ज्ञ आहे. असे अन्तोन-साहेब म्हणत.''

''मग तो येती टूर्स का चालवतो?''

''तो कफल्लक झालेला आहे. पुराणवस्तूंचे दुकान तो चालवतो. पण खरे तर आपल्या संग्रहातील कोणतीही वस्तू विकायला तो राजी नसतो. वस्तूच्या सत्यतेचा पुरावा नसेल तर ती आंतरराष्ट्रीय बाजारात विकता येत नाही. त्याच्याकडे खूप दुर्मिळ वस्तू आहेत.''

नॅन्सी कृष्णास्वामीला सांगते, ''मला प्लीज त्याच्याकडे घेऊन चल.''

काश्मिरी गेटजवळच्या वस्तीमधील जुन्या बाजारातल्या जेम्सच्या दुकानात नॅन्सीला तो नेतो. आपली ओळख देऊन ती म्हणते, ''मला पिमाकोला जायचे आहे. काय खर्च येईल?''

''दहा दिवसांच्या टूरला पन्नास हजार डॉलर्स.''

''मी साधी वार्ताहर. एवढे पैसे मजजवळ नाहीत.'' ती त्याला ते तुतारीसारखे हाड दाखवते.

''हे याकचे हाड आहे. वीस हजार वर्षांपूर्वीचे तरी असेल. ओठाजवळ धरून फुंकर सोड. विचित्र आवाज येईल. हा आवाज ही तुतारी तंत्रविद्येसाठी वापरतात.

यावरील खंजीर आणि स्वस्तिक हे सिम्बॉल आहेत.''

''अन्तोन कसले संशोधन करीत होता?'' नॅन्सीचा प्रश्न.

''तो खजिना शोधतोय. अतिप्राचीन ज्ञान आपल्यापर्यंत घेऊन येणाऱ्या पुरातन माध्यमाचा शोध घेतोय. सगळ्या जगाचे संचालन करणाऱ्या राजसत्तेचे जे मूळ केंद्रस्थान आहे, त्याचा शोध घेतोय.''

''अन्तोन कुठे आहे?''

''ते हाड मला द्या. ते बघून मी काही लक्षात येते का बघतो. जर हे हाड मला देत असाल तर तुला मी दहा हजार डॉलर्समध्ये पिमाकोला घेऊन जाईन. योगायोगाने आज रात्रीच माझा एक मित्र विमानाने पिमाकोकडे जाणार आहे. त्यातून मी तुला नेऊ शकेन.'' नॅन्सी त्याची ऑफर स्वीकारते.

अन्तोनचा एक फोटो त्याच्या ऑफिसच्या टेबलावर दिसतो. त्यात एक स्त्री असते. नॅन्सीला कृष्णा सांगतो, ''अन्तोन मायाशी लग्न करणार होता.'' नॅन्सी कृष्णाकडे मायाला भेटण्याची इच्छा प्रकट करते. मायाच्या घरी ती जाते. ती गरोदर असते. अन्तोनची चौकशी करते. तिच्याजवळचे एक पाकिट ती कृष्णाला देते. ''मी दोन महिन्यात परत आलो नाही तर हे पाकिट उघडून आतील मजकूर वाचावा.'' अशी सूचना तिला अन्तोनने दिलेली असते. त्या पाकिटात अन्तोनचे मृत्युपत्र, पदके, फोटो आणि पत्र असते.

त्या पाकिटातील एक फोटो पन्नाशीतल्या एका व्यक्तीचा असतो. त्याखाली ''आईच्या वाढदिवसाला आलेला फेलिक्स, बी.ए.१९५७.'' असा मजकूर असतो. फोटोच्या पार्श्वभूमीवर ब्युनोज आयर्स हॉटेल असे हॉटेलचे नाव असते. नॅन्सी ट्रिब्युनच्या संपादकाला फोन करून फेलिक्सची माहिती मिळते का हे शोधायला सांगते. मायाचा ती निरोप घेते. फोटोतला फेलिक्स कोएनिग म्हणजे अन्तोनचे वडील हे नंतर स्पष्ट होते. फेलिक्स कोएनिग यांनी नाझी जर्मनीच्या सैन्यात दाखल होऊन तिबेटमध्ये आर्य वंशाच्या राजांकडील दैवी पुरुष घडवण्याचे गूढ ज्ञान लिहिलेला ज्ञानग्रंथ शोधण्याची कामगिरी अंगावर घेतलेली असते. जर्मनीतील गूढविद्यातज्ज्ञ रुडॉल्फ व्हॉन सॅबोटेनडॉर्फ याने १७ ऑगस्ट १९१८ रोजी थूल संस्थेची स्थापना करून आर्य लोकांच्या मूळ संस्कृतीचा उगम शोधण्याचे ठरवले. त्याच्या या प्रयत्नाला धनाढ्य जर्मन प्रकाशक दी गिच एकार्ट याने भरपूर निधी उपलब्ध करून दिला. त्यासाठी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एक संशोधक पथकही तिबेटला पाठवले. परंतु त्या नाझी पथकाला तो तिबेटी ज्ञानग्रंथ सापडला नाही.

...नॅन्सी केली अनपेक्षितपणे या ज्ञानग्रंथाच्या आणि हिमालयातील त्या अज्ञात शांग्रीला राज्याच्या संशोधनकार्यात गुंतत जाते. ती अन्तोनलाही भेटते. अन्तोनला पुन्हा राजधानी दिल्लीत आणण्याचा प्रयत्न करते. परंतु त्याची तब्येत फारच


बिघडल्याने त्याला भीषण जंगलात सोडून राजधानीत सुखरूप पोहोचते. न्यूयॉर्कला परतल्यावर जॅक तिला भेटतो. तो तिला तिबेटमधून पाठवण्यात आलेली एक कवटी आणि चिठ्ठी दाखवतो. ती कवटी आधुनिक मानवाची पुरातन काळातील असते. पंचवीस लाख वर्षांपूर्वीची. दुर्मिळ अत्यंत मौल्यवान आणि नॅन्सीला एक चिठ्ठी देतो– शांग्री-लाचा राजा अनेकोत्तम शुभेच्छा देत आहे.''

ही कादंबरी अनेक उपकथांमधून तिबेटच्या नि हिमालयाच्या विलक्षण निसर्ग वैभवाचे दर्शन घडविते. एक वेगळा, फँटसीचा अनुभव देते. दि लॉस्ट होरॉयझन (जेम्स हिल्टन) या कादंबरीत शांग्री-ला या काल्पनिक राज्याचे वर्णन येते. तीच शांग्रीलाची स्वप्नभूमी येथे निराळ्याच दृष्टिकोनातून आपल्याला भेटते. झपाटून टाकते. अनेक उपकथानकांची सांगड घालताना टॉम मार्टिनने दाखवलेली चिकाटी आणि हिमालयातील दुर्गम निसर्गाची वर्णने करताना दाखवलेली काव्यात्मक शैली वाचकांना झपाटून टाकते. विचारप्रवण करते.

**-शंकर सारडा**

❐


**३ री आवृत्ती**




## प्रतिकूलतेवर मात

**ए.जी. कृष्णमूर्ती**

अनुवाद - **सुप्रिया वकील**


किंमत ८०/-रु. । पोस्टेज २५/-रु.

धीरुभाई अम्बानींनी स्वप्नपूर्तीच्या मार्गात आलेल्या अनंत अडथळ्यांवर मात करत 'रिलायन्स'चं भव्य साम्राज्य उभारलं. धीरुभाई व रिलायन्सचं यश इतकं अपूर्व आहे, की बऱ्याच जणांना त्यांच्या संपत्तीच्या झगमगाटापलीकडचं पाहताच येत नाही. पण त्यांचं यश असं सहजी लाभलेलं नव्हतं. ते कष्टसाध्य होतं. या कहाणीतून वाचकांना केवळ स्वप्नं पाहण्याची स्फूर्तीच नव्हे, तर त्यावर पकड मिळवण्याचं धाडसही लाभेल. त्याचबरोबर प्रत्येक स्वप्नाची किंमत चुकवावीच लागते याची जाणीवही होईल.

# पुस्तक परिचय

प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण,
आधुनिक इतिहास,
राजकारण, कल्पनाविलास

## परदेशातील वैचित्र्यपूर्ण विलक्षण अनुभवांची चटकदार कोल्हापुरी मिसळ




**उमेश कदम**

पृष्ठे **१९८।** २०० रु. पोस्टेज २५रु./ सभासदांना सवलतीत

उमेश कदम हे आपले वडील बाबा कदम यांच्या लेखनाचा वारसा समर्थपणे पुढे चालवणार आहेत हे त्यांच्या 'दूरची माती, जवळची नाती' आणि 'केवळ मैत्रीसाठी' या कथासंग्रहांवरून चोखंदळ वाचकांच्या लक्षात आलेच आहे. या दोन्ही पुस्तकात त्यांनी आपल्या परदेशातील वास्तव्यातील अनुभवांच्या हकीकती मोकळेपणाने, गोष्टीवेल्हाळ शैलीत सांगितल्या आहेत. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसच्या वतीने काम करताना आशिया आणि आफ्रिका खंडांतील वेगवेगळ्या देशांमध्ये त्यांना भ्रमंती आणि जरूर तर वास्तव्य करावे लागले. त्याआधी आंतरराष्ट्रीय कायद्याचे अध्ययन करण्याच्या निमित्ताने त्यांनी यूरोप-अमेरिकेत काही काळ घालवला. कुठल्याही देशात गेल्यावर तेथील प्रेक्षणीय स्थळे बघण्यासाठी साइटसीइंग टूर्स घ्यायच्या, घाईगर्दीत त्या ठिकाणांचे जमेल तेवढे ज्ञान गाईडच्या पोपटपंचीतून मिळवायचे आणि आपण त्या देशाचा दौरा केल्याचे पुण्य प्राप्त केले असे समजायचे हा हौशी टूरिस्टचा फंडा उमेश कदमांना कधीच रुचला नाही. कोठेही गेल्यावर तेथील सर्वसामान्य लोकांचे आचारविचार समजून घ्यायचे, निरीक्षण करायचे, तेथील संस्कृतीचे शक्य तेवढे पैलू जाणून घ्यायचे, तेथील खाद्य पदार्थांची चव घ्यायची, तेथील कलादालने बघायची, तेथील लोकांचे प्रश्न समजावून घ्यायचे– असा त्यांचा कटाक्ष असायचा. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसचे अधिकारी म्हणून ते त्या देशात जात असल्याने तेथील उच्चपदस्थ अधिकारी, मंत्री, राष्ट्राध्यक्ष, नेते, विविध खात्यांचे प्रमुख, कायदेपंडित यांच्याशी भेटीगाठी, चर्चा व्हायच्या, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन समस्यांवर तोडगा काढायचा यासाठी मोठेच संभाषण कौशल्य आणि बिनतोड युक्तिवाद यांची गरज असते. त्याचबरोबर त्या त्या अधिकाऱ्यांशी मैत्रीचे, आत्मीयतेचे, सौहार्दाचे भावबंध निर्माण करून त्यांचा विश्वास संपादन करण्याचे चातुर्यही आवश्यक असते. वंश, जात, वर्ण, धर्म, सीमा यांची कृत्रिम बंधने मनीमानसी न आणता, आपल्यासारखाच एक समानधर्मी माणूस म्हणून त्याच्याशी आत्मीयतेने जवळीक साधण्याची मानसिकता अंगी बाणवावी लागते. उमेश कदम यांना ही हातोटी साधली आहे हे त्यांच्या कथांवरून लक्षात येते. कारण परदेशात त्यांना भेटलेल्या व्यक्ती, आलेले अनुभव यांच्यावर या कथा बेतलेल्या आहेत.

''प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण, आधुनिक इतिहास, राजकारण, कल्पनाविलास यांचे कमीअधिक प्रमाणात मिश्रण करून'' उमेश कदम यांनी ही चटकदार कोल्हापुरी मिसळ तयार केली आहे.

'एक होता मित्र' या त्यांच्या तिसऱ्या कथासंग्रहात विदेशातील अशा अनोख्या अनुभवांवर आधारलेल्या २४ कथांचा समोवश आहे.

उमेश कदम यांना या वेगवेगळ्या देशात चमत्कृतिपूर्ण अनुभव आले. प्रत्येक देशातले वातावरण वेगळे, शासकीय नियंत्रणाचे स्वरूप वेगळे, प्रस्थापित-

विस्थापितांमधील अंतर कमीजास्त. वाहनव्यवस्थेचा अपुरेपणा, करमणुकीची साधने आणि खाद्यपदार्थांची खासियत वेगळी. उमेश कदम यांना या सर्व बाबींबद्दल वाटणारी जिज्ञासा आणि मित्र-परिचितांकडून माहिती मिळविण्याची कल्पकता. त्यामुळे त्यांच्या अनुभवांमधले नाट्य आणि विरोधाभास मनावर छाप पाडतात.

मे २००२मध्ये बँकॉक कार्यालयातील सहाय्यक एकाराद त्यांना पट्टायामधील टिफिनी शो नावाच्या नृत्याच्या कार्यक्रमाला नेतात. त्यातील नर्तिकांची कमनीयता आणि नृत्यकलेतील उन्मादक सहजता पाहून कदम प्रभावित होतात. शो संपल्यावर त्या नर्तिका प्रेक्षकांशी जवळीक साधतात. तेव्हा कदम यांना कळते त्या नर्तिका या पुरुष असून त्यांनी लिंगबदलाची शस्त्रक्रिया करून घेतली आहे. लिंगबदलाबरोबर शल्यविशारद संपूर्ण शरीरावरच प्लॅस्टिक सर्जरी करून व्यक्तीचे सुडौल, कमनीय बांध्याच्या तरुणीमध्ये रूपांतर करतात. त्यांचा आवाज मात्र बदलता येत नाही. काही महिन्यांनी बँकॉकला परत गेल्यावर एकारादवर नाजूक शस्त्रक्रिया झाल्याने तो रजेवर असतो, असे कळते. तेव्हा लेखक त्यांना भेटून त्यांनी 'तसली'– पट्टायाच्या नर्तिकांसारखी शस्त्रक्रिया तर करून घेतली नाही ना, अशी चौकशी करतात तेव्हा एकाराद खो खो हसून म्हणाले, ''कदम साहेब, पुढच्या महिन्यात मी व आपल्या कार्यालयातील सहायिका सुचिथा लग्न करणार आहोत.'' त्याच्यावर झालेली शस्त्रक्रिया वेगळी होती. हे कळल्यावर लेखकाचा जीव भांड्यात पडला! (पट्टाया ललना)

एकदा जिनिव्हाला गेल्यावर लेखकाला रस्त्यावर, हॉटेलजवळ, विमानतळावर भीक मागणाऱ्या मायलेकी दिसल्या. आई चाळिशीची, उंच, गोरेली, नाकेली. मुलगी दहा-बारा वर्षांची. भुरे केस, लांब वेणी, निळे डोळे, लालसर गोरा वर्ण, मोहक-निरागस चेहरा. लिल्याना तिचे नाव. त्या दोघी बस-ट्रम स्टॉपवर भीक मागत होत्या. हातात कागदी प्याला किंवा प्लॅस्टिक कटोरा.

लेखक अंत्वान या सहकाऱ्याला विचारतो, ''या खेपेला जिनिव्हात मला पहिल्यांदाच भिकारी दिसले.''

''खरं आहे. स्वीस सरकारने काही निर्वासितांना आश्रय देण्याचे धोरण मानवतावादी दृष्टिकोनातून स्वीकारलेय. ह्या लोकांना रोजगारातून पुरेसे पैसे मिळत नाहीत. काहीजण भीक मागत फिरतात. लिल्याना आणि तिची आई हेच करतात.''

एकदा जवळच्या हॉटेलमधून कर्मचाऱ्याने लिल्यानाला काही खाद्यपदार्थ दिल्याचे लेखकाला दिसले. एकदा विमानतळाकडे जाताना लिल्यानाला आपल्याजवळ उरलेले स्विस चलन व चॉकोलेट देण्याचे ठरवतो, पण ते सुटकेसमधून काढायला वेळ नसतो. तेव्हा त्याला लिल्यानाच्या नजरेतली आशा आणि कारुण्य बघून खजिल झाल्यासारखे वाटते. (लिल्याना)



**उमेश कदम** जन्म – २६ मार्च १९५६. शिक्षण बार्शी, जयसिंगपूर, कोल्हापूर येथे. इंग्लंडमधील लंडन विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय कायद्याचे उच्च शिक्षण. हॉलंड, स्वित्झर्लंड, ग्रीस येथे राष्ट्रकुल शिष्यवृत्तीमुळे पदव्युत्तर प्रशिक्षण. १९८० ते १९९४ या काळात लॉ कॉलेजमध्ये अध्यापन. १९९४ मध्ये बेंगलूरच्या नॅशनल लॉस्कूलमध्ये प्राध्यापक. १९९८मध्ये आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसच्या दक्षिण आशिया विभागाचे कायदा सल्लागार म्हणून नेमणूक. दिल्लीतील विभागीय कार्यालयात सहा वर्षे काम केल्यावर मलेशियातील क्लालालंपूरच्या विभागीय कार्यालयात पूर्वेकडील १५ देशांचे कायदाविषयक वरिष्ठ सल्लागार म्हणून बदली. इ.स. २००४ ते २००८ पर्यंत इथियोपिया येथे काम. ''रेडक्रॉसमध्ये काम करताना उच्चपदस्थांशी चांगले संबंध ठेवायचे पण ते केवळ व्यावसायिक पातळीवर. राजकीय पुढारी आणि नेते यांच्याबरोबरीने वैयक्तिक पातळीवरील मैत्री आमच्या नि:पक्षपाती व तटस्थतेने काम करण्याच्या आड येते. त्याबद्दल आचारसंहितेत काही स्पष्ट निर्बंध नाहीत, पण आम्ही स्वसंयमाखातर काही गोष्टी टाळतो. वर्ज्य मानतो.'' असे पथ्य उमेश कदम आपल्या या नोकरीत आवर्जून पाळतात.

लेखक एकदा उत्तर कोरियाच्या प्यांग वांग पासून ४० किलोमीटर अंतरावरील कृत्रिम अवयव केंद्राला भेट देण्यासाठी जातो. तेथे नामवंत धावपटू व फुटबॉल खेळाडू सोलकिम दिसतो. त्याचा एक पाय कापलेला असतो. का? त्याच्या पायाला दुखापत झालेली असताना त्या केंद्रावरचे प्लॅस्टर संपलेले होते; त्याला भयंकर वेदना होत होत्या. तेव्हा डॉक्टरांनी त्याचा दुखणारा पाय चक्क कापून टाकला. (पेनल्टी स्ट्रोक)

केनियाची राजधानी नैरोबी. तेथे नव्याने नेमणूक झालेली. लेखकाला बजावण्यात आले, सायंकाळी सातनंतर बाहेर जायचे नाही. १४ टोळ्यांतले गुंड, लुटारू प्रवाशांना अडवून त्यांच्या मौल्यवान वस्तू, मोबाईल, पैसे, कॅमेरे घेऊन त्याला मारहाण करतात... पहिल्याच दिवशी रात्री फास्टफूड बर्गर खायला लेखक बाहेर

पडतो. तर त्याला तीन आडदांड लोक अडवतात. ''मोबाइल, घड्याळ काढ.'' लेखक म्हणतो, ''ते हॉटेलात ठेवून आलोय.'' पण मला मारू नका. मी तुम्हाला पाचशे शिलिंग देतो. पण एक अट आहे. मला तुम्ही हॉटेलपर्यंत सोडायला हवे. नाहीतर तुमचे दुसरे मित्र येऊन मला मारतील. ''आश्चर्य म्हणजे ते गुंड त्याप्रमाणे करतात. (नैरोबीचे नवे नाव)

मलेशियाची लोकसंख्या २ कोटी ८० लाख. त्यात मलय मुस्लीम ६५ टक्के, चिनी २५ टक्के, भारतीय ८ टक्के, भारतीयांना फारच हलक्या दर्जाची कामे करावी लागतात. त्यांच्यावर हल्ले होतात. त्यांचा छळ केला जातो. तेथे हिंदू सहाय्य कृती सेना ही एक जहाल संघटना तीव्र आंदोलन करण्याची तयारी करीत होती. २००७ मध्ये तिने हजारो लोकांचा मोर्चा काढला. पोलिसांनी अश्रुधूर, लाठीहल्ला, पाण्याचा मारा केला. हे दृश्य टीव्हीवरून सर्वत्र दाखवले गेले. त्यानंतर पाचसहा महिन्यांनी के. मनोहरन या पंचविशीतल्या तमीळ तरुणाने मलय सरकारवर दडपण आणण्यासाठी संसदेसमोर आत्मदहन करण्याची घोषणा केली. पोलिसांनी त्याला वेढले. बारा वाजता मनोहरने आपल्या एका कार्यकर्त्याला जवळ बोलावले. पोलिसांनी त्याच्याजवळ काही ज्वालाग्राही पदार्थ नाही याची खात्री करून घेऊन त्याची भेट होऊ दिली. थोड्या चर्चेनंतर मनोहरने पोलिसांना सांगितले, ''मी माझी मागणी मागे घेत आहे. मला खूप तहान लागली आहे. थोडे पाणी द्या.'' पोलीस पाणी आणण्यासाठी गेले. तेवढ्यात शर्टाच्या आत दडवलेली पेट्रोलची बाटली अंगावर मोकळी करून सिगारेट लायटरने स्वतःला पेटवून घेतले. सिलिंडर सोडण्याआधीच मनोहरन बहुतांश जळून गेला. त्यानं इच्छापत्रात लिहिलं होतं. ''अहिंसक उपक्रम पुढे चालू ठेवावा.'' तमीळ तरुणांना त्याने एक विनंतीही केली आहे.

*पुष्पपितृगणांजलीची धन्य अन पवित्र धरती*
*माझी प्रेमळ जनक आणि जननी*
*विखरा मम रक्षा तिच्या पदरात*
*विलीन होईल हा पुत्र त्या भूमीच्या उदरात. (भूमिपुत्र)*

१९९० पासून सोमालिया देशातील काही लोक जवळच्या समुद्रात चाचेगिरी करून लुटालूट करतात. चाचेगिरीसाठी आधुनिक साधने, यंत्रे वापरतात. सोमालीत गरीबी खूप आहे. हे चाचे मिळालेल्या लुटीचा बराचसा भाग गरीबांना वाटतात. दरमहा १ आणि १५ तारखेला विशिष्ट ठिकाणी हे वाटप होते. रॉबिनहूड प्रमाणे हे सोमाली चाचे श्रीमंतांना लुटून गोरगरीबांना मदत करतात. त्यामुळे लोकांना ते आवडतात. (सोमाली रॉबिनहूड)

तैवान आणि चीन या दोन देशात युद्ध झाले तर कोणकोणत्या मानवतावादी कायद्यांची गरज पडेल या विषयावरचे एक चर्चासत्र इ.स. २००६ मध्ये तैवानच्या तायपे या राजधानीच्या शहरात झाले. त्यावेळी कोलंबिया विद्यापीठात शिकलेल्या मा विंग जौ या तैवानच्या नेत्याने अनेक अडचणीचे प्रश्न विचारले. त्या प्रश्नांना उत्तरे देताना कदम यांना तारेवरची कसरत करावी लागली. चर्चासत्र संपल्यावर मा विंगने कदमांना म्हटले, ''तू प्रोफेसर होण्याऐवजी मुत्सद्दी व्हायला हवे होतेस. रात्री आपण बरोबर जेवू.'' दिन नाम फंग हॉटेलमध्ये जेवताना दोघेही पट्टीचे खवय्ये असल्याने त्यांचे चांगले मेतकूट जमते. त्यावेळी माशाचे सूप समजून कदम यांनी चक्क सापाचे सूप खाल्ले. पोर्कचा खिमा आणि डपलिंग चाखला. पुढे मा विंगने तैवानच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवली. जिंकली. बहुमत मिळवले. कदम यांना तायपेला सत्तांतराच्या समारंभाचे निमंत्रण दिले. पण मला बालीला जायचे आहे असे सांगून कदम यांनी दिलगिरी व्यक्त केली. पुढे कदम म्हणतात, ''रेडक्रॉसच्या अधिकाऱ्याने उच्चपदस्थांशी औपचारिक संबंधांची सीमा पाळायची असते. म्हणून मी ती सबब सांगितली.'' (एक होता मित्र)

'अश्राप आश्रयदाता' मध्ये मकावच्या कॅसिनोला कदम भेट देतात. त्याचा मालक मि. हुआन हा गडगंज श्रीमंत. त्याने आपली सर्व संपत्ती रेडक्रॉसला मृत्युपत्राद्वारे दिली. पुढे अडचणीत आल्यावर वृद्धाश्रमात आश्रय घेतला.

मंगोलिया हा भारताएवढा देश. पण लोकसंख्या फक्त २९ लाख. राजधानी उलान बतोर. तेथील दोन तरुण बंगलोरला लॉ कॉलेजात उच्च शिक्षणासाठी १८९०मध्ये येतात. कदम यांचे लाडके विद्यार्थी ठरतात. पदवी घेऊन जाताना आमच्या देशात आल्यावर जरूर भेटा असे सांगतात.

२००९ मध्ये कदम उलान बतोरला जातात तेव्हा त्या दोघांशी ई-मेलवरून संपर्क साधतात. तुरे दोर्ज एका बँकेचा डायरेक्टर असतो. तुरे दोर्ज हा शाकाहारी असतो. त्याने आपल्या मुलाचे नाव अर्जुन ठेवलेले असते, त्याच्या घरी कदमांसाठी छोले फुलके, जिरा पुलाव, मटरपनीर, कांदा रायता– असा बेत असतो.ओद बायर विदेश मंत्रालयात कायद्याचा सल्लागार असतो. राजकारणात भाग घेतो. विमानतळावर तो कदमांबरोबर जातो. त्यांना निरोप देतो. त्याला कायदेमंत्र्याची शपथ घ्यायला जायचे असते. (दोन विद्यार्थी)

असे कितीतरी लोकविलक्षण अनुभव आणि किस्से या पुस्तकातून समोर येतात आणि आपल्याला परदेशातील माणसांमधून मानवतेची आणि आपुलकीची

साक्ष पटवतात. त्यांच्यातील दुरावा दूर करतात.


एक चोखंदळ खवय्या म्हणूनही उमेश कदम यांची ओळख या कथांद्वारे अधिक गडद होते.

सेलांगतीचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री जब्बार अली जंग यांनी तायकुकू हॉटेलमध्ये खाल्लेले पदार्थ सामन सुशी, कोबे बीफची तेप्पनयाकी आणि ट्युना साशिमी हे होते. जपानमध्ये मिळणाऱ्या दुर्मीळ फुगू या माशाविषयीही त्यांना कुतूहल होते. त्याच्या यकृतात व त्वचेत एक प्रकारचे विष असते. ते साफ केल्याशिवाय मासा खाल्ला तर मृत्यूचीही शक्यता असते.

तायपेमध्ये थाई, मलेशियन, भारतीयच, मेक्सिकन, इटालियन, जपानी, कोरियन वगैरे देशातील चविष्ट पदार्थ उपलब्ध करून देणारी उपाहारगृहे होती. सेलांगतीतले बीफ केमुबू, चिकनजेरिक, मटण, दाबोंग, भाताचे मिरांग, सिंपांग व निबोंग हे खाद्यपदार्थ कदम यांना आवडतात. चाँगचिंगच्या हॉटपॉट उपाहारगृहात हॉटपॉटमध्ये, टेबलावरच्या भांड्यातील चरबीत, चिकन स्टॉक मध्ये आपल्या आवडीच्या कच्च्या भाज्यांचे वा वस्तूंचे तुकडे टाकायचे आणि ते भाताबरोबर खायचे असा प्रकार लोकप्रिय आहे. कलिंगडाचे लाल त्रिकोणी काप, कबुतरे, बेडुक, बैलाच्या बॉल्सच्या चकत्या, डुकराची चरबी, वांब मासे हेही हॉटपॉटमध्ये टाकले जातात. ही चरबी पुन:पुन्हा वापरण्यात येते, तशी पदर्थांची चव वाढत जाते, असे तिकडे मानले जाते.

उमेश कदम यांच्या बरोबरचा हा परदेशातील फेरफटका असा अनेक दृष्टींनी आस्वाद्य असल्याने मनात रेंगाळत राहतो.

❑



**१० वी आवृत्ती**

# ताजमहालमध्ये सरपंच

**शंकर पाटील**

किंमत १००/-रु. । पोस्टेज २५/-रु.

आगामी




# ॲन्ड देअरबाय हँग्ज अ टेल

मूळ लेखक

**जेफ्री आर्चर**

अनुवाद- **डॉ. देवदत्त केतकर**

दिल्लीच्या एका ट्रॅफिक सिग्नलजवळ थांबलेले असताना जामवाल आणि निशा प्रेमात पडतात...

या पंधरा कथांपैकी एकीची ही सुरुवात. जेफ्री आर्चर यांना त्यांच्या जगभराच्या भ्रमंतीतून मिळालेल्या गोष्टींचा हा सहावा लघुकथासंग्रह

'अ गुड आय' ही गोष्ट जर्मनीत घडते. एक अमूल्य तैलचित्र एका कुटुंबात दोनशे वर्षं असतं. पण एके दिवशी...

'मेंबर्स ओन्ली' या खाडीतल्या बेटावरच्या एका तरुणाला नाताळच्या पोतडीत गोल्फ बॉल मिळतो, आणि त्याचं आयुष्यच बदलून जातं.

इटलीत, 'नो रूम ॲट द इन'अशा स्थितीत हॉटेलात खोली घ्यायला गेलेला एक तरुण थेट तिथल्या रिसेप्शनिस्टच्या बिछान्यात पोचतो. इंग्लंडमध्ये घडणारी 'हाय हील्स' बुटांचे जोड सहजासहजी का जळून जाऊ शकत नाहीत, हे एक स्त्री तिच्या नवऱ्याला सांगते.

काही गोष्टींनी तुम्हाला हसू येईल... काहींनी डोळ्यांत पाणी येईल... पण त्या तुम्हाला खिळवून ठेवतील, हे नक्की.

**आगामी**




# हे सर्व आपल्याला कोठे नेणार?

मूळ लेखक- **अरुण शौरी**

अनुवाद - **अशोक पाध्ये**

''आग लागलेल्या घरात गडबड व गोंधळ माजतो. चौकीदार आणि इतर लोक आग विझवण्यात गुंतलेले असताना घरातील वस्तू चोरण्याची संधी चोर साधू शकतो... युद्धकाळात संकटाला तोंड देणारा किंवा घसरणीला लागलेला देश अगदी त्या आग लागलेल्या घरासारखा असतो. अशा स्थितीतील देशावर हल्ला केल्यास अर्ध्या प्रयत्नात दुप्पट यश मिळते....'' 'The Wiles of War'

''जेव्हा अधिकाऱ्यांमध्ये गटबाजी होते, प्रत्येक जण आपल्या मित्राला वर आणण्याच्या प्रयत्नात असतो, चांगल्या व हुशार लोकांना डावलून बदमाश लोकांच्या नियुक्त्या करतो, स्वत:च्या फायद्यासाठी लोकांकडे पाठ फिरवतो, सहकाऱ्यांना बदनाम करतो – ह्याला अंदाधुंदीचा 'उगम' म्हणतात.

''जेव्हा कारस्थानी दुष्ट लोकांना शक्तिशाली घराणी गोळा करतात, तेव्हा ते कोणतेही अधिकारपद नसतानासुद्धा प्रख्यात होतात आणि त्यांच्या ताकदीमुळे लोक चळाचळा कापतात. लोकांची बारीक-सारीक कामे करून ते झाडाला विळखा घालणाऱ्या वेलीप्रमाणे त्यांना कायमचे अंकित करून घेतात; अधिकारपदावरील लोकांचे अधिकार बळकावून सामान्य माणसाला नाडतात. देशात गदारोळ माजतो, पण सरकारी मंत्री तो झाकून ठेवतात आणि त्याची माहिती देत नाहीत – ह्याला अंदाधुंदीचे 'मूळ' म्हणतात.

''जेव्हा चांगल्या लोकांना 'चांगले' म्हणून मान्यता दिली जाते, पण त्यांना पदोन्नती दिली जात नाही; जेव्हा दुष्ट लोकांना ओळखूनसुद्धा बाहेर काढले जात नाही; जेव्हा भ्रष्टाचारी सत्तेत असतात आणि चांगल्या लोकांना देशोधडीला लावले जाते; तेव्हा देशाचे भयानक नुकसान होते.''

'The Book of Three Strategies'


# National Humour Month


The month of April is celebrated as *'National Humour Month'* every year.

National Humour Month was founded in 1976 by best selling humorist Larry Wilde, Director of The Carmel Institute of Humour. It is designed to heighten public awareness on how the joy and the rapeutic value of laughter can improve the health, boost morale, increase communication skills and enrich the quality of one's life.

"Since April is often bleak and grim and taxes are due on the 15th, it can be one of the most stressful times of the year", says Wilde, author of 53 books on the subject of humour. "Besides adds Wilde, "it's the only month that begins with All Fools Day - a day which has sanctioned frivolity and pranks ever since the 1500's"

The idea of laughing and the use of humour as a tool lift ailing spirits is growing. Scientific research now indicates that the curative power of laughter and its ability to relieve debilitating stress and burnout may indeed to be one of the great medical discoveries of our times.




The amazing adventures of an ordinary woman. Together in one collection are Lisa's wildly popular Philadelphia Inquirer columns that show the humorous side of life, from a women's perspective. Filled with seventy charming and hilarious vignettes, its trademark Scotto line.

Reading WHY MY THIRD HUSBAND WILL BE A DOG is like visiting with an old friend. Lisa lets her hair down, roots and all, to write about her ordinary, extra ordinary adventures. You will laugh at Lisa's stories and recognize yourself or a loved one in her, Mother Mary, Brother Frank, Daughter Francesca, or BFFs Franca and Laura. No topic is off-limits and thanks to Lisa, nothing is ever really ordinary.


❒



## Sofie Laguna

*Sofie Laguna* has previously written for children and young adults *(Bird and Sugar Boy, My Yellow Blankie, Too Loud Lily and Bad Buster*). She is also an actor. One Foot Worng is her first adult novel. she lives in Melbourne.

# Book Review









Imagine leading life in a parallel universe where your only friends are inanimate objects like a spoon or broom; where every small thing is linked to the concept of good and evil; and where abuse forms a part of day-to-day existence. The life of Hester Wakefield – protagonist of the book 'One oot Wrong' - is exactly this and more. Held captive in one small room in the house by her reclusive religious parents who think that 'the outside is dangerous because it has no walls to let

you know where to stop', Hester is clueless about the outside world till one day she decides to slip out as her curiosity gets the better of her. Till then, Hester grows up with one book (the children's Bible) for company and at the mercy of her parents who are rightly called the Sack and Boot. With the ideas of heaven and hell deeply rooted in their heads – albeit in the warped manner – Sack and Boot mete out an inhuman treatment to Hester, going as far as conveniently categorising her to be mentally unstable and thus unfit to be let out of the house! She is made to do all the housework, chop wood for the fire, cook, clean etc. Despite her best efforts, she ends up getting beaten up for the smallest 'mistakes' and is condemned by her mother for being born too late and making her life hell. Her cooped-up existence leaves Hester with little choice but to conjure up the outside world juxtaposing the fanatical concepts sowed in her head by the parents with the images that pop out of the Bible she has. Being the intelligent girl she is, Hester does a fairly good job of the same, which in turn


## Backlist



Call Center



Novgorod Diary



Never to Return



Like A
Willow Tree

helps her find her feet in the real world when she finally manages to sneak a peek outside!

Hester's boxed-in existence becomes even more conspicuous and thus hard-hitting whilst reading about her reactions to the things she experiences after stepping outside. Till then, having survived by creating a make-believe world where the vessels and chairs and tables talk to her; Hester initially gets overwhelmed and then greedily drinks in the sights and sounds that rush onto her as she sneaks outside thanks to her friend 'handle' aka the door-knob! Naturally, the parents are utterly displeased by Hester's 'rebellion' and reward her with another lashing. But soon after, Hester's life of misery receives a ray of hope as the State Welfare department orders the parents to enrol her in a school. The amazement with which she reacts to mundane things such as a paintbrush or a blackboard; and the way she keeps following orders to the extreme despite her teachers telling her she has done more than needed, give the readers a stark idea of the trauma that the child has suffered all these years. The story is best read than told to understand the complexities of Hester's life and how she manages to go on to the more normal, free life.

The gist of the story makes it no secret that the narrative is dark and overwhelming for the reader. The obsessive compulsive cleaning that Hester is made to do at home; the way she is mentally tortured about whether any boy talks to her at school; or the way she is ill-treated for being 'dirty' after getting her first periods, portray a heart-


wrenching picture of the miserable life she leads. But despite the dark content, author Sofie Laguna's expertise in writing novels for children, comes handy in interspersing the right amount of child-like innocence and hope in the same. These two factors work beautifully in balancing out what would otherwise have been a very lopsided dark story. The narrative is written in Hester's 'voice', thus making it come more alive than ordinary. Hester's hurt, pain, confusion, wonderment et al come alive with the narrative 'speaking' to the reader in her tone and language. Initially, the book does seem to run a bit awry as inanimate objects are accorded voices. It becomes confusing to hear Hester talk to them. But as one flows into the few initial pages, the rigour of the story and the starkness of Hester's life become too captivating to be able to put the book down.

Definitely a keeper!


- Reshma S. Kulkarni

❒


## Forthcoming





Healthy Habits
For A Hit Family




Mr Two Bomb





The Art
Of Ageing




The Sky
Is Changing

**५वी आवृत्ती**




# आवरण

मूळ लेखक : **एस.एल.भैरप्पा**

अनुवाद : **उमा कुलकर्णी**

**किंमत : २५०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**

विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या
मायेला आवरण' म्हणतात...
मला कळायला लागल्यापासून सत्य-असत्याचा प्रश्न' हा छळणारा प्रश्न आहे... हीच समस्या आवरण'मध्ये समूह आणि संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवर उफाळून आली आहे..
...मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी आजचे जबाबदार नाहीत हे तर खरंच, पण मागच्यांशी नातं जोडून आपण त्यांचेच वारसदार' या भावनेत आपण अडकणार असू, तर त्यांनी केलेल्या कर्माची जबाबदारी स्वीकारावी लागेल.
इतिहासाकडून मिळवण्याइतकंच, त्याच्याकडून सोडवून घेणं हे परिपक्वतेचं द्योतक आहे. प्रत्येक धर्म, जाती आणि व्यक्तीला लागू पडणारी गोष्ट आहे ही...




# शिवाजी सावंत : 'मृत्युंजय' ते 'युगंधर'

आपल्या पहिल्याच कलाकृतीने रसिकांना आकृष्ट करून स्वत:कडे लक्ष वेधून घेणारे कलावंत धुमकेतूप्रमाणे फार दुर्मिळ असतात. मृत्युंजयकार शिवाजी सावंत हे अशा दुर्मिळ कलावंतांपैकी होते. वयाच्या अवघ्या पंचविशीत महाभारतातील कर्ण या उपेक्षित व्यक्तिरेखेची कड घेऊन तिला केंद्रीभूत मध्यवर्ती स्थान देऊन ज्या ताकदीने व आग्रहीपणे शिवाजी सावंतांनी वाचकांपुढे उभे केले आणि त्यानिमित्ताने संपूर्ण महाभारताचेच एक वेगळे रूप खुले केले; त्यामुळे मूळ महाभारताशी अंशत:च परिचित असलेल्या वाचकांना सुखद धक्काच बसला. महाभारतात नव्याने त्यांना रस वाटू लागला आणि एक हिरो म्हणून, उपेक्षित जननायक म्हणून कर्ण हा मराठी वाचकांच्या हृदयसिंहासनावर आरुढ झाला, मूळ महाभारतातील कर्ण हा सावंतांच्या मृत्युंजयमधील कर्णापेक्षा वेगळा आहे आणि सावंतांनी त्याचे अनाठायी उदात्तीकरण केले आहे अशी टीका प्राचार्य अनंतराव आठवले (स्वामी वरदानंद) प्रभृतींनी केली; परंतु सावंतांनी 'मूळ महाभारतीय व्यापक व व्यामिश्र चौकटीतून अलग काढलेले' 'नियतिशरण, समाजशरण, कुटुंबशरण व मृत्यूशरण' अशा सर्व संग्रामातूनही अजिंक्य ठरवून 'मृत्युंजय' बनवून, सर्वच उपेक्षितांच्या, रास्त हक्कांना, वंचित झालेल्या संवेदनशील तरुणांचे प्रतीक म्हणून 'बिन गुंतागुंतीच्या विवेकाचे' अधिष्ठान बहाल केले. प्रा. रा. ग. जाधव यांनी या कादंबरीच्या विक्रमी लोकप्रियतेची मीमांसा करताना मार्मिक विधान केले आहे, ''शिवाजी सावंतांच्या मृत्युंजयमध्ये आजचा संवेदनशील, क्षात्रतेजपूजक व दुर्दैवी पण दुर्दम्य मराठी माणूस कर्ण-प्रतिमेतून वावरताना दिसतो. त्यामुळे त्या रीतीने वर्तमान जगणाऱ्या वाचकांना आज, उद्या आणि परवाही मृत्युंजय कादंबरी हवीहवीशी वाटेल. मनुष्य, नियती, गुणवत्ता व कर्तृत्व यांचा व त्यांच्या रीतसर व विपरीत फलितांचा खेळ हे मनुष्य जीवनाचे सनातन वास्तव आहे. या वास्तवाचे अधोरेखन 'मृत्युंजय' नामक ही कादंबरी

सशक्तपणे करीत जाते. म्हणूनच तिला जरणमरण नाही.''

गेल्या ५६ वर्षांत 'मृत्युंजय'च्या मराठीत २९ आवृत्त्या निघाल्या, लाखावर प्रती खपल्या; एवढेच नव्हे तर अनेक भारतीय भाषांमध्येही तिचा बोलबोला झाला. याचा एक अर्थ सर्वच भारतीय तरुणांची जी आजची मानसिकता आहे, तिच्याशी मृत्युंजयमधील कर्णाची नाळ कुठेतरी जुळत असावी. साठोत्तरी काळातील भारतीय तरुणाच्या मानसिकतेशी, त्याच्या जीवनभानाशी, त्याच्या संवेदनशीलतेशी तादात्म्यता अनुभवणे व त्या युगधर्माचा स्वर कर्णाच्या 'मृत्युंजय' या प्रतिमेद्वारे प्रकट करणे- शिवाजी सावंत यांना ऐन पंचविशीत जमून गेले, आणि कर्णाच्या व्यक्तिरेखेद्वारे 'भारतीय परंपरेतील लोकप्रिय व मान्यताप्राप्त नियतिवादाचे, विपरीत नियतीच्या महालळिताचे, मनुष्य- नियती द्वंद्वाचे केले गेलेले हे ठसठशीत सादरीकरण भारतीय मनालाही स्पर्श करू शकले असा 'मृत्युंजय' या कादंबरीचा सार्वत्रिक स्वागताचा अन्वयार्थ लावता येईल. रा. ग. जाधव यांनी तो तसा बिनतोडपणे लावलाही आहे.

मूळ महाभारतातील कर्ण आणि सावंत यांनी रंगवलेला 'मृत्युंजय कर्ण' यांच्यातील तुलनेपेक्षा सावंतांच्या कर्णाचे वेगळेपण हेच गृहीत धरून, त्याचे आकलन करणे इष्ट ठरेल.

मूळ महाभारतातील 'कर्ण' हा नायक होऊच शकत नाही. महर्षी व्यास त्याला कुठेही अधिनायकत्व देत नाहीत. सावंतांच्या या कादंबरीने कर्णाला नायकत्व देऊन संपूर्ण महाभारताचीच पुनर्मांडणी केली आहे. 'मूळ महाकाव्य आणि सद्य:कालीन भारत यांच्या संदर्भांचा विपर्यास करून निर्माण झालेली, दोन भिन्न संदर्भव्यूहांचा परस्पर विनिमय (उलटापालट) करून कर्णाच्या रूपाने एक वेगळीच मूल्यप्रणाली मांडली आहे. मूळ महाभारतातील कर्णाच्या तुलनेने सावंतांचा कर्ण हा अधिक ठसठशीत आणि उठावदार वाटतो. तो सध्याच्या भारतीय तरुणाच्या पराधीनतेचे, पराभूततेचे प्रतीक म्हणून समोर येतो; पण तेथेच थांबत नाही तर नियतीने जरी सूड उगवला तरी शेवटी तो लाक्षणिक अर्थाने मृत्युंजयच ठरतो असा दिलासाही ही कादंबरी देते. वाचकांना ती भारावून टाकते.

एक कादंबरीकार म्हणून सावंत यांचे मोठेपण 'मृत्युंजय' वर केंद्रीत झाले आहे. त्यानंतरच्या छावा आणि युगंधर या कादंबऱ्याही मृत्युंजयच्याच वाटेने जाणाऱ्या आहेत. 'छावा'मध्ये संभाजीराजांचे आणि 'युगंधर'मध्ये श्रीकृष्णाचे सावंतांना भावलेले त्या त्या नायकाचे चित्र प्रकट होते. चरित्रात्मक तपशील भरपूर गोळा करण्यात सावंत कसूर करीत नाहीत. जनमानसात संभाजीराजांची 'व्यसनी, लंपट, संतापी व अविचारी' अशी प्रतिमा रुजलेली आहे, ती बदलण्याच्या दृष्टीने सावंतांनी घटनांचा अन्वय बदलून, धीरोदात्तपणा, बाणेदारपणा प्रकट करणाऱ्या प्रसंगांची योजना केली. पितापुत्रसंबंधात गैरसमजांमुळे निर्माण झालेले ताणतणाव, अमात्यांचा आडमुठेपणा

व पाताळयंत्रीपणा, सोयराबाईंचा सावत्रपणा, ज्येष्ठपुत्र म्हणून असणारे रास्त हक्क डावलण्याचा कट झाल्याने स्वीकारावा लागलेला कठोरपणा यावर भर देऊन संभाजीच्या वर्तनातील व मानसिकतेतील 'नकारात्मक' जागा भरून काढल्या आहेत. कर्णाप्रमाणेच एक नायक म्हणून संभाजीला सद्य:कालीन राजकीय संदर्भांनी अद्ययावत, आजचा, आपला वाटतो. संभाजीचे दु:ख हे जन्मरहस्याचे नाही तर एका जाणत्या राजाच्या पोटी येऊनही सतत गैरसमजामुळे होत गेलेल्या अन्यायाचा बळी ठरल्याचे आहे, असे म्हणता येईल. 'युगंधर' मधील कृष्ण हा देखील शिवाजीरावांना आपल्या समकालीन सामाजिक-राजकीय संदर्भातच भेटतो. आरंभीची गोकुळ वृंदावनाची वर्णने वाचताना कोल्हापूर परिसरातच आपण वावरत आहोत असे वाटते. ''उभ्या गोकुळाला वेळूचं व मेसकाठ्याचं, सागाच्या खांबांना रामेठ्याच्या सालींच्या बांधांनी करकचून आवळलेले भरभक्कम संरक्षक कुंपण होतं... प्रमुख संरक्षक कुंपणाला उगवतीला एक व मावळतीला एक अशी दोन भक्कम व उंचच उंच लाकडी महाद्वारे... खांबासारखे गोल, कोरीव व प्रचंड अडणे... घरं साधीच, मातीची. स्वच्छ व कौलारु... भिंती कावेनं सारवलेल्या.'' हे वर्णन उत्तर भारतातील एखाद्या गावापेक्षा आपल्या कोल्हापूर-सांगली परिसराला जास्त शोभून दिसते.

सावंत यांच्या तीन कादंबऱ्यांच्या तुलनेत विखेपाटील व कामगारनेते मनोहर कोतवाल यांच्यावरच्या 'लढत' व 'संघर्ष' या चरित्र कहाण्या काहीशा निष्प्रभ ठरतात. त्यांचे इतर ललित लेखन, व्यक्तिचित्रणात्मक लेखन हेही प्रासंगिक ठरते. त्यांना आत्मचरित्रात्मक लेखन करायचे होते. मी लोकमतच्या रविवार पुरवणीचे संपादन करीत असताना या संकल्पित आत्मचरित्राची प्रकरणे क्रमश: प्रसिद्ध करता येतील का असे त्यांनी विचारले होते. आठदहा आठवड्यांचा मजकूर लिहून झाला की आपण ठरवू असे मी म्हटले होते. परंतु त्यानंतरच्या दीड-दोन वर्षांत सावंतांनी सभासंमेलनांची आमंत्रणे स्वीकारण्याचा धडाका लावला होता. 'युगंधर'ने दहा वर्षे फार ताण दिला होता. त्यातून सैलावण्यासाठी सभासंमेलनातील कौतुकाचा व हारतुऱ्यांचा उतारा आल्हादकारक वाटणे स्वाभाविक होते. त्यामुळे लेखनाची बैठक जमणे जड जात असावे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाने त्यांना नवा जोम आला असता. परंतु तो योग नव्हता. 'मृत्युंजय' योग त्यांना आधीच लाभला होता. तेव्हा कदाचित इतर कशाची मातब्बरी काय- असा प्रश्न नियतीला पडला असावा.

शिवाजी सावंत यांच्या 'मृत्युंजय'चे वेगळेपण प्रथम वाचनातही जाणवलेले होते. त्यांच्या भाषेचे लालित्य खांडेकरी वळणाचे; जीवनदर्शनातले ठसठशीतपण शाहिरी वळणाचे आणि वातवरणनिर्मितीतील संदर्भ समकालीन आधुनिक मानसिकतेच्या वळणाचे त्यामुळे एक जबरदस्त प्रभाव उमटत होता. त्या वर्षीच्या (१९६७) ललित पुरस्कार समितीचा मीही एक सदस्य होतो. 'मृत्युंजय'ची निवड त्या वर्षी

झाली होती. पुढे अनेक पुरस्कार या कलाकृतीला मिळाले, त्याची ही नांदी होती...

## आगाऊ मानधनाचे मायाजाल

अमिष त्रिपाठी या तरुणाने भगवान शिवशंकरांच्या जीवनावर तीन कादंबऱ्यांची एक मालिका लिहून पूर्ण केली. या कादंबरीला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. गेल्या आठवड्यात 'दि ओथ ऑफ वायुपुत्र' ही शिवशंकर त्रयीतील तिसरी कादंबरी बाजारात आली. तिच्या ५ लाख प्रती तीन चार दिवसात विकल्या गेल्या, आणि वेस्टलँड या भारतीय प्रकाशन संस्थेने त्याच्या पुढच्या कादंबरी त्रयीच्या मुद्रित प्रकाशनाचे, ऑडिओ आणि ई पब्लिशिंग हक्कापोटी, तेही फक्त दक्षिण आशियाई क्षेत्रासाठी, पाच कोटी रुपायांचे आगाऊ मानधन देण्याची तयारी दाखवली आहे. भारतातील हा सर्वात जास्त मानधनाचा करार असून इतकी रक्कम या आधी कोणालाही देण्यात आली नव्हती. अमिशचा एजंट म्हणून अनुज बाहरी हा काम पाहतो. तो रेड इंकलिटरी एजन्सीचा प्रमुख आहे. वेस्टलँड प्रकाशनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौतम पद्मनाभन हे असून त्यांनीच शिवचरित्राच्या त्रिखंडात्मक कादंबरीचे प्रकाशन केले आहे. या ३ कादंबऱ्यांच्या दहा लाखापेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या आहेत. त्यावरील चित्रपट, टीव्ही मालिकांचे हक्क विकले गेले आहेत. 'दि इम्मॉर्टल्स ऑफ मेलुहा' ही प्रारंभीची कादंबरी २० प्रकाशकांनी नाकारली होती. परंतु वेस्टलँडच्या पद्मनाभनने ती काढण्याचा निर्णय घेतला. भाषांतर, चित्रपट, परदेशी आवृत्यांचे करार वगैरे हक्कांचीही बोलणी आता चालू आहेत. चेतन भगत प्रमाणेच अमिष त्रिपाठी हे समकालीन लेखकांमध्ये आता अग्रगण्य नाव ठरले आहे. भरपूर आगाऊ मानधनाची आता भारतीय प्रकाशकांनाही सवय होत आहे. विक्रम सेठ यांच्या 'ए सुटेबल बॉय च्या पुढच्या भागासाठी पेंग्विनने १० लाख पौंडांची ऑफर दिली होती. इतिहासकार रामचंद्र गुहा यांना ७ पुस्तकांसाठी पेंग्विनने ९७ लाख रुपयांचे मानधन दिले. अमिताव घोष यांना पेंग्विने त्रिखंडात्मक कादंबरीसाठी ५५ लाख रुपयांचे मानधन दिले. नंदन नीलेकनी यांना 'इमॅजिनिंग इंडिया'साठी २५ लाख रुपये देण्यात आले. एकूण लेखकांना आता बऱ्यापैकी मान आणि धन मिळण्याची स्वप्ने पडायला हरकत नाही.

## रीडर्स डायजेस्टची दिवाळखोरी

ई-बुक्स, डिजिटल तंत्रज्ञान, स्मार्टफोन, टॅब्लेट, आयपॅड वगैरे साधनांच्या सार्वत्रिक प्रसारामुळे पारंपरिक मुद्रित पुस्तके, नियतकालिके, दैनिक-साप्ताहिक-मासिके यांचे महत्त्व आणि स्थान माहिती व ज्ञानक्षेत्रात वेगाने उतरणीला लागले आहे. युरोप अमेरिकेत वृत्तपत्रांचे खप मंदावले आहेत. मासिके बंद पडत आहेत.


न्यूजवीक साप्ताहिकाने आता नियमित प्रकाशन थांबवले असून फक्त इंटरनेटवर डिजिटल स्वरूपात वाचकांच्या भेटीला जाण्याचा मार्ग स्वीकारला आहे. 'रीडर्स डायजेस्ट' या एके काळी तीस-चाळीस लाख प्रतींचा खप असणाऱ्या आणि अनेक भाषांतून निघणाऱ्या जागतिक कीर्तीच्या मासिकावर दिवाळखोरी जाहीर करून प्रकाशन बंद करायची नामुष्की ओढवली आहे.विक्री विभागातील ९५ कर्मचाऱ्यांना रजा देण्यात आली असून मासिकांची पुनर्रचना करणे हाही एक पर्याय अजून विचाराधीन आहे. त्यासाठी कोणी गुंतवणूकदार पुढे आला तर तोडगा निघू शकेल.

**- शंकर सारडा**

मो. ९८२३२६१०२३

❑


**९वी आवृत्ती**




# स्पीडपोस्ट

लेखक - **शोभा डे**

**अनुवाद - अपर्णा वेलणकर**

**किंमत : २७५/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

आई आणि मुलांमधला रक्तबंध आदिम... शरीराने आणि मनानेही काळजाशी घट्ट बांधलेला!

सुंदर, निरामय जीवनमूल्यांना पैशाच्या दावणीशी बांधून मानवी नात्यांमधला प्राणच शोषू पाहणाऱ्या आधुनिक अर्थसत्तेने आई मुलांच्या नात्याला नवं परिमाण दिलं आहे... हादरे आणि आव्हानही दिलं आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या ख्यातनाम लेखिका शोभा डे यांनी आधुनिकतेच्या झंझावातात जगणाऱ्या आपल्या सहा मुलांना लिहिलेली ही पत्रं.. जगातल्या कुठल्याही आईला आपलीच वाटतील अशी!

अभिप्राय




# पालकत्वाची बाराखडी

लहान मूल असलेल्या पालकांसमोर संगोपनाच्या संदर्भात नित्य नवे प्रश्न उभे राहत असतात. पालकत्व निभावताना मुलांची वर्तवणूक, शिस्त, आहार, झोप सवयी, शिक्षण, खेळ अशा अनेक बाबतींत नेमकी कुठली भूमिका घ्यायची, याबाबत ते काहीसे संभ्रमावस्थेत असतात. रोज उभ्या राहणाऱ्या नवनव्या अडचणींच्या वेळी अनुभवाचे बोल सांगणारी मोठी माणसे आजूबाजूला असतातच असेही नाही. अशा वेळेस बालसंगोपनाबाबत हसतखेळत सल्ला देणारे पुस्तक पालकांच्या मदतीला येऊ शकते. डॉ. ख्रिस्तोफर ग्रीनलिखित 'हसतखेळत बालसंगोपन' या मंजूषा आमडेकर यांनी अनुवादित केलेल्या पुस्तकात चार वर्षांपर्यंतच्या अपत्याचे संगोपन कसे करायचे, हे सोप्या पद्धतीने सांगितले आहे.

मुलांच्या वाढीदरम्यान पावलोपावली उद्‌भवणाऱ्या समस्यांमुळे (ज्या नंतर आपल्याला तितक्याशा महत्त्वाच्या वाटत नसतीलही!) पालक काळजीने त्रस्त होतात. मुलांचा व्रात्यपणा, चंचलपणा, स्वच्छतेच्या सवयी, त्यांच्या मनातील भीती, असुरक्षितता अशा अनेक बाबतीत प्रश्न उभे राहतात. यासंबंधातील सविस्तर मार्गदर्शन या पुस्तकात करण्यात आले आहे. नोकरी करणारे पालक, एकेरी पालकत्व निभावणारे पालक यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर स्वतंत्र प्रकरण बेतले आहे. त्याखेरीज पूर्वप्राथमिक शिक्षण, भावंडांशी संबंध, अपंग मुलांचे वर्तन आणि शिस्त तसेच मुलांचे आजार याबाबतही साकल्याने मार्गदर्शन केलेले आहे.


मुलांच्या वाढीतील महत्त्वाचे टप्पे, लसीकरणाचे वेळापत्रक, घरात लहान मूल असेल तर कशाकशाची खबरदारी घ्यावी, यासंबंधातही सविस्तर माहिती या पुस्तकात दिलेली आहे. थोडक्यात, लहान मुलांना केवळ वळण लावण्याच्या पलीकडे जात मुलांची निकोप वाढ व्हावी आणि त्यांना हसतखेळत वाढविण्याची वा सांभाळण्याची कला साध्य व्हावी, यासाठी हे पुस्तक पालकांना उपयुक्त ठरेल.

'हसतखेळत बालसंगोपन'– डॉ. ख्रिस्तोफर ग्रीन
अनुवाद – मंजूषा आमडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,
पृष्ठे – ४३०, मूल्य ३४० रुपये. (लोकसत्ता २५ फेब्रुवारी २०१३)

❒




## * ज्येष्ठ संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यांचे निधन



ज्येष्ठ पत्रकार आणि 'किर्लोस्कर', 'स्त्री', आणि 'मनोहर'या मासिकांचे माजी संपादक मुकुंदराव शंकर किर्लोस्कर (वय ९१) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि. २९ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्यामागे तीन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे.

मुकुंदराव किर्लोस्कर यांचा जन्म तीन मार्च १९२१ रोजी किर्लोस्करवाडी (जि. सांगली) येथे झाला.

सोलापूरच्या हरीभाई देवकरण प्रशाला येथून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र हे विषय घेऊन एम. ए. पदवी संपादन केली. १९४३ मध्ये 'शंवाकि'यांनी स्थापन केलेल्या 'किर्लोस्कर' मासिकामध्ये ते रुजू झाले. शंवाकि निवृत्त झाल्यानंतर १९५८ मध्ये मुकुंदराव या मासिकाचे संपादक झाले.

अफाट लोकसंग्रह असलेले मुकुंदराव हे वाचकांच्या पत्रांना आवर्जून उत्तरे देत असतं. त्यांच्या पत्नी शांताबाई किर्लोस्कर या 'स्त्री' मासिकाच्या संपादक होत्या. ह. मो. मराठे, विद्या बाळ, श्री. भा. महाबळ, दत्ता सराफ, एकनाथ बागूल, सुधीर गाडगीळ यांसारखे पत्रकार आणि लेखक 'किस्त्रीम'च्या तालमीत तयार झाले. १९७३ मध्ये 'मनोहर' मासिकाचे साप्ताहिकामध्ये रूपांतर झाले, त्याचे वाचकांनी स्वागत केले.

मुकुंदरावांनी लिहिलेल्या संपादकीयांचा 'पेरणी'हा संग्रह प्रसिद्ध आहे. प्रवास

आणि फोटोग्राफी हे त्यांचे आवडते छंद होते. डॉ. अनिल अवचट, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, राजन खान, मिलिंद बोकील, भानू काळे, सदानंद देशमुख, मुकुंद टाकसाळे, देवयानी चौबळ, निळू दामले, अशोक पाध्ये यांसारख्या लेखकांचे पहिलेवहिले लेखन त्यांनी प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि 'अंतर्नाद' मासिकातर्फे १७ फेब्रुवारी रोजी झालेल्या नियतकालिकांच्या संपादकांच्या बैठकीला मुकुंदराव आवर्जून उपस्थित होते. 'प्रतिकूल परिस्थितीवर मात करूनही आपण नियतकालिक यशस्वीपणे पुढे नेऊ शकतो.' असा विश्वास देत त्यांनी सर्व संपादकांना मार्गदर्शन केले होते.

## * सुहास भालेकर यांचे निधन



मराठी सिने-नाट्यसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सुहास भालेकर (८३) यांचे २ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्यावर बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात मुलगा नाट्य, दिग्दर्शक, हेमंत भालेकर, पाच मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे.

साठ वर्षांहून अधिक काळ भालेकर यांनी नाटक, मालिका आणि चित्रपटांमधून मराठी रसिकांना खिळवून ठेवले. शाहीर साबळे पार्टीकडून त्यांनी मुक्त नाट्य आणि लोकनाट्ये सादर केली. त्या काळात, कशी काय वाट चुकला, माकडाला चढली भांग, कोंडू हवालदार, फूट पायरीचा सम्राट ही नाटके गाजली.

अजब न्याय वर्तुळाचा या विजया मेहता दिग्दर्शित नाटकात त्यांची प्रमुख भूमिका होती. जर्मनीला गेलेले हे पहिलेच मराठी नाटक. त्यानंतर त्यांनी एकच प्याला, तुझे आहे तुजपाशी, अमंलदार, फुलाला सुगंध मातीचा, राजकारण गेले चुलीत ही नाटके केली. व्ही. शांताराम यांच्या 'चानी' या चित्रपटातून त्यांचा सिनेसृष्टीत प्रवेश झाला.

सुशीला, सौभाग्यवती, नीलांबरी हे त्यांचे मराठी सिनेमे गाजले. अर्थ, सारांश, गहराई, शक, चक्र, सडक, चायना गेट या सिनेमांमध्ये त्यांनी व्यक्तिरेखा साकारल्या. भाकरी आणि फूल या मालिकेतील त्यांची मुख्य भूमिका गाजली. तर 'असंभव' मधील सोपानकाका ही त्यांची शेवटची भूमिका ठरली.

***  रूपा बजाज यांचे जर्मनीत निधन**

उद्योगपती राहुलकुमार बजाज यांच्या पत्नी रूपा बजाज (वय ७४) यांचे  दि. २७ फेब्रुवारी रोजी लाईपाझिग (जर्मनी) येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर लाईपझिगमधील रुग्णालयात हृदयाची झडप बदलण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना हृदयविकाराचा त्रास होता. यापूर्वी २००४ मध्येही अमेरिकेत त्यांच्या हृदयाची झडप बदलण्याची शस्त्रक्रिया झाली होती. रूपा यांच्या मागे, पती, मुलगे राजीव व संजीव आणि विवाहित कन्या सुनयना असा परिवार आहे.

मुंबई पोर्ट ट्रस्टचे माजी अध्यक्ष लक्ष्मण घोलप यांच्या कन्या असलेल्या रूपा घोलप यांनी कला शाखेचे पदव्युत्तर शिक्षण घेतले होते. त्यांनी त्या काळात सौंदर्यसम्राज्ञीचा किताब पटकावला होता. मुंबईत ब्रीच कँडी परिसरात वास्तव्यास असताना जवळच  राहणाऱ्या राहुलकुमार बजाज यांच्याशी त्यांचा परिचय झाला व १९६१ मध्ये त्याचे रूपांतर प्रेमविवाहात झाले.

***  कुसुम रानडे यांचे निधन**

मुंबई आकाशवाणीच्या माजी वृत्तनिवेदिका आणि मुंबई मराठी पत्रकार संघाच्या ज्येष्ठ विश्वस्त कुसुम रानडे वय ८० यांचे पुणे येथील दीनानाथ रुग्णालयात हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात्त पती माधव रानडे, मुलगा कौस्तुभ, प्रज्ञा आणि चतुरा या दोन विवाहित कन्या असा परिवार आहे. मुंबई आकाशवाणीवर एकेकाळी कुसुम रानडे, शरद चव्हाण आणि ललिता नेने हे वृत्तनिवेदकांचे त्रिकूट गाजले होते. मुंबई आकाशवाणीच्या वृत्तविभागाच्या स्थापनेपासून त्या तेथे कार्यरत होत्या. निवेदन, योग्य आवाज आणि स्पष्ट शब्दोच्चारण या त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे वृत्तनिवेदक म्हणून त्यांनी जनमानसावर चांगलाच ठसा उमटविला. आकाशवाणी, फिल्म्स डिव्हिजनमध्ये काम करत असताना महाराष्ट्र शासनाच्या चित्रपट विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या असंख्य माहितीपटांचे लेखन आणि निवेदन त्यांनी केले आहे.

❒

# बालनगरी

## ★ लाकडी बाहुल्याची करामत ★

पिनोकिओ. बोलका ढलपा,
एक बाहुला. लाकडाचा.
लांब नाकाचा. शेलाट्या अंगाचा.
चमत्कारिक झगा घातलेला, फुलाफुलांच्या कॉलरचा.
गुडघ्यावर येणारी चड्डी. लांबसडक बोटे.
हा बाहुला गेली शंभरवर वर्षे जगभरच्या छोट्यामोठ्या मुलांचा दोस्त बनून



राहिलेला आहे.

स्नोव्हाइट, टॉम सॉयर, टारझन, मिकी माऊस, डोनाल्ड डक, अग्ली डकलिंग, सिंड्रेला, ॲलिस (इन वंडरलँड), यासारख्या बालमित्रांच्या दोस्तांमध्ये पिनोकिओ हा बोलका बाहुलाही कसा मजा उडवून देतो!

या पिनोकिओचा जन्म कसा झाला?

अगदी अपघाताने.

कार्लो लोरेन्झिनी हा इटलीमधला एक सरकारी नोकर. तो नेहमी पैशाच्या अडचणीत असायचा. कधी कधी तो गोष्टी लिहायचा आणि मासिकाच्या संपादकांना त्या विकून पैसे मिळवायचा.

त्याने एका लाकडी बाहुल्याची गोष्ट लिहिली आणि एका मुलांच्या मासिकाच्या संपादकाला नेऊन दिली. संपादकाला ती आवडली, ''तुला पैसे देतो. परंतु ही कथा वाढवून दे. दर अंकात एकेक हप्ता देऊ. चालेल ना?''

कार्लोने आनंदाने होकार दिला.

मुलांच्या मासिकात आलेला या गोष्टींवर मुलांच्या तर उड्या पडल्याच, मोठी माणसेही पिनोकिओच्या बाललीलांवर भन्नाट खूष झाली. त्या मासिकाच्या पुढच्या अंकाची वाट बघू लागली. मागणी वाढू लागली.

आता बोलणारा लाकडी बाहुला. त्याच्या जीवनात घडून घडून किती घटना घडणार? पंधराव्या हप्त्यात गोष्ट संपवावी असे कार्लोने ठरवले आणि एक कोल्हा व मांजर मिळून त्या बाहुल्याला फासावर चढवून ठार करतात असा शेवट केला.

परंतु त्या बरोबर बालवाचक आणि पालक संपादकांवर व लेखकावर एकदम रागावले, रुसले, या पिनोकिओला अशा प्रकारे इतक्या लौकर ठार मारू नका. त्याच्या आणखी गमतीजमती आम्हाला हव्या आहेत अशी सगळ्यांनी मागणी केली.

संपादक कार्लोला म्हणाले, ''पिनोकिओच्या आणखी काही गोष्टी लिहाच. पाहिजे तर मी पैसेही जास्त देईन.''

कार्लो म्हणाला, ''अहो, पण मी त्याला आता गोष्टीत ठार करून टाकले आहे. तेव्हा त्याच्यावर आणखी गोष्टी कशा लिहिणार? मेलेल्या बाहुल्याच्या गोष्टी लिहिल्या तर वाचकच शिव्या देणार.''

''ते काही नाही, आणखीन गोष्टी हव्यातच.''

''म्हणजे पिनोकिओला परत जिवंत करायला हवे तर!''

''बरोबर. तू त्याला पुन्हा जिवंत कर.''

आणि कार्लोने खरोखरच निळ्या कपड्यातल्या दयाळू परीला बोलावले आणि पिनोकिओला तिने आपल्या जादूच्या कांडीने परत जिवंत केले. असे सांगून पिनोकिओच्या गमती जमती रंगवल्या.

**शेकडो भाषांत भाषांतरे**

कार्लोने त्यावर आणखी २१ प्रकरणे लिहिली. त्यामुळे वाचक मंडळी खूष झाली. आता ही गोष्ट मुळात प्रसिद्ध होऊन चांगली सव्वाशे वर्षं झाली आहेत. परंतु अजूनही जगभर बालवाचकांची पिनोकिओशी दोस्ती आहे.



वॉल्ट डिस्नेने पिनोकिओवर १९४० मध्ये काढलेला चित्रपट खूप गाजला. इतरही किमान आठ चित्रपट या कथेवर निघालेले आहेत.

केवळ इटलीमध्येच या पुस्तकाच्या ७२ प्रकाशकांनी काढलेल्या निरनिराळ्या अडीचशेवर आवृत्त्या उपलब्ध आहेत. इंग्लिशमध्येही सुमारे १२० वेगवेगळ्या आवृत्त्या उपलब्ध आहेत. बायबलच्या खालोखाल खपणारे पुस्तक म्हणून पिनोकिओचा उल्लेख अभिमानपूर्वक केला जातो. जगातल्या ८० वर भाषांतून त्याची रूपांतरे झालेली आहेत. (मराठीत बोलका ढलपा या नावाने हे पुस्तक मिळते.) भारतासारख्या गरीब देशातल्या मुलांनाही हा पिनोकिओ आवडतो. कारण तो लहानपणी गरीब अशा एका सुताराच्या घरी राहत असतो; आणि चांगले संपन्न श्रीमंती थाटाचे जीवन जगण्याची स्वप्ने बघत असतो. त्यामुळे गरीब मुलांनाही हा छोटेखानी लंबू टंगू बाहुला आपला लाडका दोस्त वाटतो. आणि बाहुल्याप्रमाणेच आपणही एके दिवशी मोठ्या पदावर जाऊ, श्रीमंत बनू अशी स्वप्ने पडू लागतात. या पिनोकिओच्या पराक्रमांची तऱ्हाच अशी लोकविलक्षण आहे की लहान मुलांप्रमाणेच अगदी केस पांढरे झालेल्या आणि दातांचे बोळके झालेल्या म्हाताऱ्यांनाही त्यामुळे खुदकन् हसू फुटते. कार्लोला मात्र पिनोकिओच्या खोड्या म्हणजे केवळ गंमतच वाटत असे.

**शतसांवत्सरिक महोत्सव**

कार्लो लोरेंझिनी याने पिनोकिओमध्ये जे. खेडेगावचे चित्र रंगवले आहे ते त्याच्या जन्मगावचे आहे. कोलोडी हे ते गाव. वस्ती फक्त १८००. कोलोडी हे नाव कार्लोने आपल्या नावाशी जोडले आणि अमर केले. त्याचे बरेचसे बालपण याच गावात गेले. त्याचे पुढचे आयुष्य फ्लॉरेन्स शहरी गेले. तेथेच तो मृत्यू पावला. एका

टेकडीच्या पायथ्याशी वसलेल्या कोलोडी गावातील लोकांनी 'पिनोकिओ'या गोष्टीच्या प्रकाशनाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून १९८१ मध्ये एक आगळा शतसांवत्सरिक उत्सव साजरा केला. 'पिनोकिओ उद्यान' उभारून त्यात इटलीमधील नामवंत बड्या शिल्पकारांना व कलावंतांना पिनोकिओमधील काही कथांवर आधारलेली शिल्पे मुद्दाम करायला लावली. पिनोकिओचा पालक गेपेट्टो कारपेंटर, हसणारा सर्प, रेड क्रॉफिशच्या खानावळीत पिनोकिओला ठार मारण्याचा कट शिजवणारे कोल्हा व मांजर वगैरे या उद्यानातील शिल्पे पिनोकिओमधील अनेक प्रसंग साकार करतात. या गावकऱ्यांनी साजऱ्या केलेल्या शतकमहोत्सवात सुमारे १२ हजार पर्यटकांनी भाग घेतला. यावरून या गोष्टीची लोकप्रियता अजमावता येईल.

या गावकऱ्यांनाच आपल्या आवडत्या लेखकाचे एक गावकरी म्हणून कौतुक केले असे नाही. इटलीमध्ये सर्वत्रच त्याची दखल घेतली गेली. इटलीच्या सोकर संघाने आपल्या युरोपीय संघाचे बोधचिन्ह म्हणून पिनोकिओची निवड केली होती.

**पिनोकिओच्या लोकप्रियतेचे रहस्य**

पिनोकिओच्या तोंडीही आपल्या गावचे कौतुक कार्लोने प्रसंगोपात टाकलेले आहे. बोलणाऱ्या क्रिकेट पक्ष्याला पिनोकिओ सांगतो. 'आमचं गाव मोठे रमणीय आहे. फुलापाखरांचा पाठलाग करावा, झाडांवर चढावं, पक्ष्यांची घरटी धुंडाळावी, नाजूक इवलाले पक्षी बघताना देहभान हरपावे, ते उडू लागले की कोण मजा वाटते!'


पिनोकिओ केवळ बालवाचक व प्रौढ यांना एक गमतीदार गोष्ट म्हणूनच प्रिय आहे असे नव्हे. काही ख्रिश्चन धर्मपंडितांनी पिनोकिओच्या साधेपणात ख्रिस्ताचे दर्शन घडते असे म्हटले आहे. पिनोकिओचा पुनर्जन्म आणि ख्रिस्ताचे पुनरुत्थान हा काही जणांच्या श्रद्धेचा विषय आहे. मार्क्सवादी टीकाकारांनीही पिनोकिओ म्हणजे दीनदरिद्री जनतेचा प्रतिनिधी व हीरो म्हणून पिनोकिओचे महत्त्व अधोरेखित केले आहे. फ्राइडच्या मनोविश्लेषण शास्त्राच्या आधारे कोणी त्यातील कामविषयक प्रतीकांचाही उलगडा केला आहे. लाकडी बाहुल्याचा येथे खराखुरा मुलगा होण्याचा प्रयत्न चाललेला आहे आणि तेही साधेसुधे मूल होण्यात त्याला रस नाही, त्याला व्हायचेय् हुशार मूल. लोकांना चक्रावून सोडणारे. चकित करणारे. त्यामुळेच त्याच्या कथेला प्रतीकात्मकतेचे अनेक पदर लाभलेले आहेत. मुलांना गमतीदार वाटणारी ही गोष्ट मोठ्यांना प्रतीकात्मक वाटते आणि तिच्यातील अर्थविभ्रम मोह घालतात.

**- शंकर सारडा**

ई-१०, पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, पुणे-४११००४

❐

२ री आवृत्ती




# म्हणे कबीर दिवाणा


मूळ लेखिका : **ओशो**
अनुवाद : **भारती पांडे**

**किंमत : १५०/-रु. ।**
**पोस्टेज : २५/-रु.**

'सत्य काय आहे हे मला माहीत आहे असं मानणं म्हणजे संदेह आणि माझा अनुभव खूप लहान आहे. सत्य याहून खूप मोठं असू शकतं. माझं अंगण छोटंसं आहे. हे अंगण म्हणजे संपूर्ण आकाश नव्हे. माझी खिडकी छोटी आहे. परंतु खिडकीची चौकट म्हणजे आकाशाला घातलेली चौकट नव्हे. मी खिडकीतून बाहेर पाहू शकतो हे खरं असलं तरीही खिडकी म्हणजे आकाश नव्हेच हे जाणून घेणं म्हणजे श्रद्धा'.
कबीरासारखे वेडे फार क्वचित भेटतात, हाताच्या बोटांवर मोजता येतात आणि त्यांचं वेडही असं आहे की त्यांच्या सुरईतल्या मद्याचा एक थेंब जरी तुमच्या वाट्याला आला तरी स्वतःचं अहोभाग्य समजा.

# ओळखा पाहू

**भगवान शिवशंकरावर कांदबरीत्रयी लिहिणारा, पुढील पुस्तकांसाठी ५ कोटींचे मानधन मिळविणारा तरुण भारतीय लेखक**



विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल. ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ मे २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल जून २०१३ च्या अंकात जाहीर होईल.

## 'फेब्रुवारी' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

यंदाचा लाभसेटवार पुरस्कार मिळालेले कवी - प्रा. इंद्रजीत भालेराव

स्पर्धेचे विजेते **- प्रा. डॉ. पीतांबर सरोदे -**
कल्पतरू, माणिक नगर, नंदुरबार- ४२५४१२

## 'फेब्रुवारी' अंकातील 'चित्रकोडे'चे उत्तर

१) अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड २) अबोली ३) ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स ४) आदिपर्व ५) बाई, बायको, कॅलेंडर ६) अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम ७) बऊठाकुरानीर हाट ८) स्टीव्ह जॉब्ज ९) स्थुलतेला करा टाटा १०) सुकेशिनी ११) टर्निंग पॉइंट्स १२) धिंड १३) डोंगरी ते दुबई १४) दिग्विजय १५) स्पिचेस् दॅट रिशेपड् द वर्ल्ड १६) स्लमगर्ल ड्रीमिंग

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत

| एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २०% | २५% | ३०% |


१ वर्षाची वर्गणी रु १५०/-

३ वर्षाची वर्गणी रु ३५०/-

५ वर्षाची वर्गणी रु ५००/-

३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तके भेट!

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.








३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी'** - मंजूषा आमडेकर आणि **'लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या'** - चारुता पुराणिक

ही प्रत्येकी ३० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-




५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'** - गायत्री सेवक व **'चला जाणून घेऊ या चक्रं आणि नाडी'** - सुभाष जोशी

ही प्रत्येकी ४० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-

भेट पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 April 2013

# चित्रकोडे

**खालील चित्रांवरून पुस्तक ओळखा व मिळवा आकर्षक भेट!**

उत्तरे पाठवताना चित्रांवरील नंबर व मोबाईल नंबर आवश्यक आहे.




सदर स्पर्धा तुम्ही फेसबुकवरही उपलब्ध आहे.

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.